रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक १३७ । पृष्ठे १० ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. २५ ऑक्टोबर २०२५

किंमत ४ ₹


## अलिबाग पोलीस चौकशीच्या फेऱ्यात

**अलिबाग :** बनावट नोटाप्रकरणातील मयत आरोपी भूषण पतंगे यांच्या मृत्यूप्रकरणी सीआयडी चौकशी सुरु झाली आहे. शुक्रवारी सायंकाळी सीआयडीचे पथक अलिबागमध्ये दाखल झाले. त्यांनी तेथील अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी केली. भूषण पतंगे यांच्या घरात अलिबाग पोलिसांनी छापा टाकला होता. या छाप्यात बनावट नोटा आढळून आल्या. त्याप्रकरणी त्याच्याविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. पोलीस कोठडीत असताना त्याची प्रकृती खालावल्याने त्याला अलिबागहून जे.जे. रुग्णालयात दाखल केले होते. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. भूषणचा मृत्यू निमोनियाने झाला पान २ वर

## परतीच्या पावसाचा मुक्काम वाढला

**मुंबई :** राज्यातून मान्सूनने अधिकृत माघार घेतली असली, तरीही वातावरण पावसाला पोषक झाले आहे. त्यामुळे पुढील काही दिवस महाराष्ट्रात पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. रायगडसह मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशीम आणि नागपूर या जिल्ह्यांना येलो अलर्ट जारी केला असून, पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घटना उघडकीस

# वाळीत प्रथा थांबेना!

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**रायगड जिल्ह्यात सामाजिक बहिष्काराचे आणखी एक प्रकरण समोर आले आहे. मुरुड तालुक्यातील चोरढे गावातील एका समाजाने फिर्यादीच्या कुटुंबाला मंदिराच्या जागेच्या वादातून पंच कमिटीने बहिष्कृत केले असल्याची तक्रार रेवदंडा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. त्यानुसार २३ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील जात पंचायती आणि गाव पंचायतीच्या जाचाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.**

रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चोरढे येथेदेखील वाळीत तथा सामाजिक बहिष्काराचे प्रकरण समोर आले आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, चोरढे गावातील एका समाजातील ग्रामस्थांनी गावातील जुन्या हनुमान मंदिराच्या जागेत नवीन मंदिराचे बांधकाम केले. त्या मंदिरालगत असलेली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाची जागा बदलून १३ फेब्रुवारी २०२५ मध्ये ते स्मारक फिर्यादीच्या मालकीच्या जागेत तसेच येण्या-जाण्याच्या मुख्य रस्त्यात वाहनांना अडथळा निर्माण होईल, अशा ठिकाणी बांधले. ही जागा बदलावी, यासाठी एका समाजाच्या पंचांबरोबरच शासनाकडे तक्रार केली होती. तसेच बांधकामाविरोधात दिवाणी न्यायालयात दावा दाखल केली होती. या गोष्टीचा राग धरून चोरढे गावातील त्या समाजाचे पंच मंडळाचे पदाधिकारी, सदस्य अशा एकूण २३ जणांनी एप्रिल ते मे या कालावधीत गावातील हनुमान मंदिरात गावकाची सभा घेतली, असे फिर्यादींचे म्हणणे आहे. या सभेत फिर्यादीच्या हजेरीचा पुकार न करणे, पाठविलेली वार्षिक वर्गणी न स्वीकारणे, फिर्यादीच्या कुटुंबाशी कोणीही संबंध पान २ वर

**23 जणांविरोधात गुन्हा दाखल**

**जागेवरुन वाद**

ग्रामस्थांनी जुन्या हनुमान मंदिराच्या जागेत नवीन मंदिराचे बांधकाम केले. त्या मंदिरालगत असलेली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाची जागा बदलून १३ फेब्रुवारी २०२५ मध्ये ते स्मारक फिर्यादीच्या मालकीच्या जागेत बांधले आहे.



> वाळीत प्रकरणाच्या घटना घडू नये, यासाठी वारंवार ग्रामपंचायतीला सूचना करण्यात आल्या आहेत. गावबैठकांच्या माध्यमातून याबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. चोरढे येथील वाळीत प्रकरणाची घटना उघड झाल्यावर तात्काळ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याबाबत तपास अधिक सुरु आहे.
>
> – श्रीकांत किरवले, सहाय्यक पोलीस निरीक्षक, रेवदंडा

## वेधक

### मनोज जरांगे आता शेतकऱ्यांसाठी लढणार

**मुंबई :** मराठा आरक्षणासाठी राज्यात रान पेटवणारे मराठा आंदोलक मनोज जरांगे आता शेतकऱ्यांच्या मदतीसाठी मैदानात उतरले आहेत. अतिवृष्टीमुळे राज्यातील २९ जिल्ह्यांमध्ये झालेल्या मोठ्या नुकसानीनंतरही शेतकऱ्यापर्यंत मदत पोहोचली नसल्याने, जरांगे पाटलांनी शेतकऱ्यांच्या न्यायासाठी आंदोलन उभारण्याचा इशारा सरकारला दिला आहे. पाण्याखाली, तर नदीकाठच्या जमिनी वाहून गेल्या आहेत. शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले असून, सरकारने जाहीर केलेल्या मदतीच्या पॅकेजचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत अद्याप पोहोचलेला नसल्याने त्याविरोधात आवाज उठविण्यात येणार असल्याचे जरांगेंनी सांगितले.

### वाढवण बंदराला परवानगीच नाही

**ठाणे :** पालघरकरांचा तीव्र विरोध असताना केंद्र सरकार वाढवण बंदर रेटण्याचा प्रयत्न करत असून, याविरोधात गेल्या अनेक वर्षांपासून संघर्ष सुरू आहे. असे असतानाच जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाने या बंदराला सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिल्याचा दावा केला आहे. मात्र, वाढवण बंदरविरोधी संघर्ष समितीने हा दावा फेटाळत वाढवण बंदरच्या उभारणीला न्यायालयाने कोणतीही परवानगी दिली नसल्याचे सांगितले आहे. वाढवणमध्ये सद्यःस्थितीला सिमेंटेशन प्रायव्हेट लिमिटेड या ठेकेदार कंपनीकडून किनाऱ्यावर बोरवेल करून मातीचे परीक्षण करण्याचे काम सुरू आहे. याविरोधात नागरिक एकवटले आहेत.

### गुळसुंदे येथून मायलेक बेपत्ता



**रसायनी :** गुळसुंदे येथे भाड्याने राहणारी अनिता मनिप गोंड (२५) ही तिच्या तीन वर्षांच्या मुलास घेऊन बेपत्ता झाल्याची घटना घडली. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात पती मनिप रिंकू गोंड याने हरविल्याची तक्रार केली आहे. अनिता गोंड ही कोणास काहीएक न सांगता आर्यनला घेऊन गेली आहे. याबाबत कोणास अधिक माहिती असल्यास महिला पोलीस सोनम शेळके ८७९३१६३३४३, रसायनी पोलीस ठाणे ८५३०४४९६९५ यांच्याशी संपर्क साधावा.





# भेकर मांस प्रकरण भगतांना भोवणार?

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

भेकर जातीच्या संरक्षित वन्यजीव प्राण्याचे मांस बाळगल्याप्रकरणी राष्ट्रवादीचे जयेंद्र भगत यांच्याविरोधात अलिबाग व मांडवा पोलिसांनी संयुक्त कारवाई केली. या कारवाईत घरातील स्वयंपाकघरातील फ्रिजमध्ये मांस आढळून आले. याबाबत वन विभागाने शोध सुरू केला आहे. भगत यांची चौकशी सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे भेकर मांसप्रकरण जयेंद्र भगत यांना भोवण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जयेंद्र भगत यांच्या घरात भेकर या संरक्षित वन्य प्राण्याचे मांस असल्याची माहिती रायगड पोलिसांना मिळाली. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली पथक तयार करण्यात आले. मांडव्याचे पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे, अलिबाग पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक सरिता मुसळे, पोलीस हवालदार प्रदीप देशमुख, जितेंद्र चवरकर, पोलीस शिपाई गणेश पारधी, सागर गोळे या पथकाने गुरुवारी (दि.२३) सायंकाळी जयेंद्र भगत यांच्या घरावर छापा टाकला. घराची झाडाझडती सुरु करण्यात आली. किचनमधील फ्रिजमध्ये एक किलो वजनाचे भेकर जातीच्या संरक्षित वन्य प्राण्याचे मांस आढळून आले. तो मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, पुढील कारवाईसाठी जप्त मुद्देमाल अलिबागमधील वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याकडे देण्यात आला आहे. पान २ वर

**भेकरप्रकरण महाळुंगे कनेक्शन?**

फणसाड परिसरातील महाळुंगे परिसरातील काही धनदांडग्यांची फार्महाऊस आहेत. यातील एका व्यक्तीकडे विनापरवाना बंदूक असल्याची चर्चा आहे. त्यामुळे भेकर मांस प्रकरण महाळुंगे कनेक्शन असल्याची चर्चा आहे. यात आणखी कितीजण सहभागी आहेत, हे वनविभागाच्या तपासानंतर निष्पन्न होईल. त्यानंतर वनविभाग काय तपास करणार याकडे लक्ष लागून राहिले आहे.

**चौकशी सुरु**

भेकर मांसप्रकरणी जयेंद्र भगत यांची वन विभागामार्फत चौकशी सुरु करण्यात आली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत भगत यांच्यावर चौकशीचा फेरा सुरु झाला आहे. शुक्रवारी चार तासांपासून वन विभागमार्फत चौकशी सुरु केली असल्याची माहिती वनविभागाकडून देण्यात आली आहे.

## महिला डॉक्टरनं संपवलं जीवन

**पोलिसांच्या अत्याचाराला कंटाळून उचललं टोकाचं पाऊल**

**। सातारा । प्रतिनिधी ।**

सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयातील डॉ. संपदा मुंडे यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी त्यांनी हातावर पेनाने सुसाईट नोट लिहून पोलीस उपनिरीक्षक गोपाल बदाने यांनी चार वेळा बलात्कार केल्याचा आणि अन्य एकाने शारीरिक व मानसिक छळ केल्याचा आरोप केला. यामुळे साताऱ्यासह राज्यभरात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेमुळं गृहखात्याची अब्रू तर वेशीवर टांगली गेली असून, पोलीसच असा अत्याचार करत असतील, तर महिलांनी न्याय मागण्यासाठी जायचं कुठं, असा प्रश्न उपस्थित होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, डॉ. संपदा मुंडे या फलटण उपजिल्हा रुग्णालयात डॉक्टर म्हणून सेवा देत होत्या. त्यांनी गुरुवारी रात्री शहरातील एका हॉटेलमध्ये टोकाचे पाऊल उचलत गळफास घेऊन आपले जीवन संपवले. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. जीवन संपवण्यापूर्वी संपदाने हातावर मृत्यूसाठी जबाबदार असलेल्या पोलिसांची नावंदेखील लिहून ठेवली होती. पोलीस उपनिरीक्षक पान २ वर

## राजा केणी राष्ट्रवादीच्या वाटेवर?

**आमदारांनी दूर केल्याची राजकीय वर्तुळात चर्चा**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आमदार दळवी यांनी सध्या दिलीप भोईर यांना जवळ केल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे राजा केणी यांना शिंदे गटातून उमेदवारी मिळणार की नाही, असा प्रश्न जनमानसातून उमटत आहे. परिणामी, राजा केणी यांचे शिंदे गटात राजकीय भवितव्य धोक्यात आल्याची चर्चा सुरु आहे. त्यात आदिती तटकरे पालकमंत्री झाल्यावर ते राष्ट्रवादीतदेखील जातील, अशीही चर्चा आहे. आमदार दळवी यांचे अगदी जवळचे असणारे राजा केणी सध्या आमदारांपासून दूरच असल्याची चर्चा जोर धरत आहेत. त्यामुळे शिंदे गटातील अंतर्गत कलह हळूहळू उघड होत असल्याचे बोलले जात आहे.

आमदार दळवी आणि दिलीप भोईर हे एकमेकांचे कट्टर राजकीय शत्रू होते. दळवी यांचा कार्यकर्ता झिराडमध्ये दिलीप भोईर यांना डोईजड ठरत होता. दळवी यांच्या मदतीने तो भोईर यांना वेगवेगळ्या पद्धतीने त्रास देण्याचा प्रयत्न करीत होता. दिलीप भोईर भाजपमध्ये असताना अलिबाग-रोहा रस्त्यावरून श्रेयवाद झाला. या वादावरून भाजप आणि शिंदे गटात चांगलेच राजकारण तापले होते. आमदारकीच्या निवडणुकीत महायुतीच्या विरोधात जात दिलीप भोईर यांनी दळवी यांच्याविरोधात दंड थोपटले होते. दरम्यान, भाजपने दिलीप भोईर पान २ वर

**केणींच्या बंडखोरीने महायुतीत गोंधळ**

राजा केणी यांनी बंडखोरी करीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या निमित्ताने उमेदवारी जाहीर केल्याने महायुतीत धुसफूस सुरू आहे. आतापासून आपणच उमेदवार अशा बतावण्या ते वेगवेगळ्या माध्यमातून मारत सुटले आहेत. त्यामुळे महायुतीमध्ये गोंधळाचे वातावरण आहे. महायुतीमधील घटक पक्ष असलेले भाजप, राष्ट्रवादी सोबत आले नाही, तर आम्ही एकटे लढू, असा दिखावा शिंदे गटाकडून केला जात आहे. मात्र भाजप, राष्ट्रवादीला सोबत घेतल्याशिवाय शिंदे गटाला पर्याय नाही, अशीही चर्चा सुरु आहे.

## रायगडात औषध उद्योगाला चालना

**दिघी बंदरातील फार्मा पार्कसाठीची निविदा मंजूर**

**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील फार्मा पार्क विकसित करण्यासाठी खासगी विकसकाची महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने नेमणूक केली आहे. त्यामुळे दिघी बंदराच्या विकासाला चालना मिळाली असून, औषध उद्योगाला चालना मिळाली आहे.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात रायगड जिल्ह्यातील रोहा आणि मुरूड परिसरात बल्क ड्रग पार्क व्हावे, यासाठी प्रयत्न करण्यात आले होते. मात्र, केंद्र सरकारकडून प्रकल्पाला मंजुरी मिळाली नाही. त्यामुळे राज्य सरकारच्या माध्यमातून प्रकल्प उभारण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

**प्रकल्पाची माहिती**

केंद्र : 5,469 कोटी

संपादित क्षेत्र : 61.97 हेक्टर

रोजगार: 1,14,183

दिघी बंदर औद्योगिक क्षेत्रासाठी रोहा, माणगाव तालुक्यातील ६४६२.१२ हेक्टर जमीन संपादित केली आहे. यापैकी ३९२२.७७ हेक्टर क्षेत्र एमआयडीसीमार्फत विकसित करण्यात येत आहे.

दिघी बंदर औद्योगिक विकास क्षेत्रात बल्क ड्रग पार्क उभारण्याचा निर्णय मार्च २०२३ मध्ये राज्य सरकारने घेतला. पान २ वर

**एक लाख रोजगारनिर्मिती**

मे २०२५ मध्ये एमआयडीसीच्या तिसऱ्या निविदा प्रक्रियेस प्रतिसाद मिळाला आहे. या प्रक्रियेत रामके इन्फ्राट्रक्चर लिमिटेड, रामक्रिशी इन्फ्राट्रक्चर प्रायव्हेट लिम्टेड आणि ब्रीज गोपाल कन्स्ट्रक्शन कंपनीच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या, तर जमिनीची अपेक्षित किंमत ७१० कोटी रुपये ठरवली आहे. रायगड जिल्ह्यातील माणगाव, रोहा, मुरूड तालुक्यातील आगरदांडा, म्हसळा तालुक्यात केंद्राने ५,४६९ कोटी दिले आहेत. या प्रकल्पाची गुंतवणूक क्षमता तब्बल ३८ हजार कोटींची आहे. या क्षेत्राच्या माध्यमातून एक लाख १४ हजार १८३ जणांना रोजगार मिळणार आहे.

## तहसील कार्यालयात शुकशुकाट

**शेतकरी मेटाकुटीला, अधिकारी-कर्मचारी रजेवर**





**। पाली/वाघोशी । प्रतिनिधी ।**

ऐन गरजेच्या वेळी शासकीय कर्मचाऱ्यांच्या सुट्ट्यांचा फटका सुधागडमधील शेतकऱ्याला बसला आहे. दिवाळीची सुट्टी संपून कामाचा दिवस सुरु होऊनही सुधागड येथील तहसील कार्यालयात शुक्रवारी अनेक अधिकारी व कर्मचारी गैरहजर असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

अतिवृष्टी आणि नैसर्गिक आपत्तीमुळे आधीच नुकसानग्रस्त झालेला शेतकरी मदतीच्या पान २ वर

### सरकारी खुर्च्या रिकाम्या, अधिकारी मात्र मौजेत

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील शासकीय कार्यालयं आज 'जनतेसाठी' नव्हे तर 'अधिकाऱ्यांच्या सुखसोयीसाठी' उघडी ठेवली जातात, असा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. कारण, सध्या कार्यालयं रिकामी, अधिकारी गायब आणि जनतेच्या समस्या मात्र धूळ खात आहेत, अशी परिस्थिती आहे. गेल्या काही महिन्यांपासून लोकप्रतिनिधी नसल्याचा फायदा घेत अधिकारीवर्गाने प्रशासकीय कारभाराचे तीनतेरा वाजवल्याचे बोलले जात आहे.

पंचायत समिती, नगरपालिका, महसूल, आरोग्य व इतर शासकीय कार्यालयांमध्ये सारखीच परिस्थिती आहे. जबाबदार अधिकारी दिवसभर दिसत नाहीत. आले तर फक्त सही करून पळ काढतात. आजही अनेक ग्रामस्थ आपल्या तक्रारी घेऊन उरण पंचायत समितीत पोहोचले, पण तेथील दृश्य पाहून तेच हादरले. संपूर्ण कार्यालयात जबाबदार अधिकारी गायब असल्याचे दिसून आले. याबाबत विचारणा केली असता पान २ वर

**पाच मीटर खोलवर वाहिन्या टाकण्यास परवानगी | सीईटीपी प्रकल्पाच्या खर्चातही वाढ**

# तरंगत्या हॉटेलमुळे सांडपाण्याला आडकाठी

दीपक घरत

**। पनवेल ।**

तळोजा औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक कारखान्यांमधून बाहेर पडणारे रासायनिक सांडपाणी थेट समुद्रात सोडण्यासाठी खाडीपात्रातून सांडपाणी वाहिन्या टाकण्याचे काम सुरु होते. नवी मुंबई विमानतळाशेजारी तरंगते हॉटेल सुरु करण्याच्या योजनेमुळे हे काम रखडले असून, खर्चातदेखील वाढ होणार असल्याने तरंगते हॉटेल तळोजा औद्योगिक वसाहतीमधील सांडपाणी वाहिनीच्या कामात अडथळा ठरत आहे.



एमआयडीसीधील रासायनिक कारखान्यांमधून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी औद्योगिक वसाहतीत प्रक्रिया केंद्र बांधण्यात आले आहे. या केंद्रात सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याची खोल समुद्रात विल्हेवाट लावण्यात येते. याकरिता कासाडी नदी पात्राकिनाऱ्यावरून वाघिवली खाडीपर्यंत सांडपाणी वाहिनी टाकण्यात आली आहे. मात्र, ही वाहिनी जुनी आणि जीर्ण झाल्याने ठिकठिकाणी गळती लागून नदी आणि खाडी पात्रातील पाणी प्रदूषित पान २ वर

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे पनवेलला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. यामुळे या ठिकाणी फाइव स्टार आणि सेवन स्टार हॉटेल निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. नवी मुंबई विमानतळाशेजारी वाघिवली खाडीत तरंगते हॉटेल बांधण्याचा प्रस्ताव यामुळे पुढे आला आहे. हॉटेलच्या बांधकामाकरिता सांडपाणी वाहिनी अडथळा ठरण्याची शक्यता असल्यानेच सांडपाणी वाहिनी आणखी काही मीटर खोल टाकण्याची सूचना मुंबई मेरीटाईम बोर्डकडून एमआयडीसीला करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

> **नियमानुसार पाच मीटर खालूनच वाहिन्या टाकण्याचे काम करणे आवश्यक होते. मात्र, तसे न झाल्याने हे काम अडले आहे.**
>
> **– अरविंद म्हात्रे, माजी नगरसेवक**

## पनवेलमध्ये दोन ठिकाणी आग

**अग्निशमन विभागाच्या तत्परतेने जीवितहानी टळली**

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल परिसरात शुक्रवारी एकाच दिवसात दोन ठिकाणी आगी लागण्याच्या घटना घडल्या. दरम्यान, अग्निशमन विभागाच्या तत्परतेने एका इसमाचा जीव वाचला आहे.

पनवेलजवळील पळस्पे फाटा परिसरात एका गळ्याला अचानक आग लागून मोठे नुकसान झाले आहे. पळस्पे येथील दत्ता स्नॅक्सजवळ असलेल्या पीके वाईन्सशेजारील या गळ्याला आग लागल्याची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली. आगीमुळे या परिसरात दाट धुराचे लोट पसरले होते, ज्यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान



तातडीने घटनास्थळी रवाना झाले. त्यांनी शर्थीचे प्रयत्न करून काही वेळातच आग आटोक्यात आणली, अन्यथा मोठे संकट ओढवले असते. तर दुसऱ्या घटनेत नवीन पनवेल सेक्टर-४ मधील कॉटेज एन.जी. प्लॉट क्र. ८९ येथील इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर शुक्रवारी दुपारी आग लागण्याची घटना घडली. सदर आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन विभागाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी पोहोचल्यावर गॅलरीतून मोठ्या प्रमाणात ज्वाळा आणि धूर बाहेर पडत असल्याचे दिसून आले. परिस्थिती गंभीर असल्याने दरवाजा हातोड्याच्या सहाय्याने तोडून जवानांनी घरात प्रवेश केला. पाणी मारून आग नियंत्रणात आणली. दरम्यान, किचनमध्ये पान २ वर

# स्मार्ट मीटरविरोधात उचलणार कडक पाऊल

## शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांचा इशारा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

ग्राहकांना विश्वासात न घेता अनेक ठिकाणी स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. स्मार्टमीटर सर्वसामान्यांसाठी डोकेदुखी बनत आहे. तिपटीने वीज बिलांसह रिडींगची योग्य माहिती उपलब्ध होत नाही. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक हैराण झाले आहेत. महावितरण कंपनीचा हा मनमानी कारभार शेतकरी कामगार पक्ष कदापि सहन करणार नाही, स्मार्ट मीटरविरोधात कडक पाऊल उचलणार, असा इशारा शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी दिला.



स्मार्ट मीटर सक्तीचे करू नका, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाने केल्यानंतर शासनाने स्मार्ट मीटर सक्ती नाही, असे सांगितले. मात्र, महावितरण कंपनीचे काही अधिकारी व कर्मचारी यांनी अलिबाग तालुक्यातील विशेष म्हणजे रामराज परिसरातील अनेक गावे, वाड्यांमध्ये जाऊन स्मार्ट मीटर बसविले. नागरिकांची कोणताही परवानगी न घेता मीटर बसविण्यात आले. महावितरणने सुरु केलेल्या या मनमानी कारभारामुळे नागरिकांना भरमसाठ वीज बिल येत आहेत. काहींना वीज बिलच आले नाही, तर काहींच्या मीटर वापराची माहितीच उपलब्ध झाली नाही.

महावितरणच्या या मनमानी कारभारामुळे सर्वसामान्य नागरिक हैराण झाला आहे. भरमसाठ वीज बिलामुळे नागरिक मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. वीज बिल कमी करण्यासाठी महावितरण कंपनीच्या कार्यालयात हेलपाटे मारण्याची वेळ नागरिकांवर येत आहे. महावितरणच्या या भूमिकेविरोधात शेकापमार्फत मोठा लढा पुकारण्यात येणार आहे. स्मार्ट मीटर काढून त्या ठिकाणी पूर्वीचे मीटर बसविण्यासाठी महावितरणला भाग पाडले जाणार आहे, नागरिकांची दखल तात्काळ घ्या, असा इशारा सुरेश घरत यांनी दिला आहे.

## मनोहर पाटील यांचा सत्कार

**रेवदंडा** : रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुडकोली, तालुका अलिबाग शिक्षक मनोहर महादेव पाटील यांना सन २०२५/ २६ या वर्षाचा रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत देण्यात येणारा आदर्श शिक्षक पुरस्कार मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आहे. याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. समाजाच्या विहित स्तरातून या उल्लेखनीय कामगिरीबद्दल कौतुक करून त्यांना सन्मानित करण्यात आले. ग्रामस्थ मंडळ दिवी पारंगी, ग्रामस्थ मंडळ सुडकोली, माझेरी विभाग अठरा गाव आगरी संघटना चिंचोटी, शाळा व्यवस्थापन समिती सुडकोली, पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लिमिटेड पेण यांच्याकडून त्यांचा सत्कार करून सन्मानित करण्यात आले. यावेळी विविध स्तरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## लघु व्यवसाय प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद

**। महाड । प्रतिनिधी ।**

आलेकर बदर्स आयोजित लघु उद्योग करणाऱ्या महिलांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक येथे लहान व्यवसाय प्रदर्शन घेण्यात आले. यामध्ये महिलांनी सहभागी होत उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला.

आलेकर ब्रदर्स चे दुसरे वर्ष असून, सालीम आलेकर, फहीम आलेकर, इमरान कौचाली, मुन्सिफा आलेकर आणि त्यांचे सर्व सहकारी यांच्या संकल्पनेतून आयोजित केलेल्या या प्रदर्शनात एकूण ३५ स्टॉल्स होते. यामध्ये वेगवेगळ्या वस्तू तसेच घरगुती पदार्थ याचा समावेश होता.

विशेष आकर्षण म्हणजे, या प्रदर्शनात बच्चेकंपनीसाठी हस्ताक्षर, चित्रकला स्पर्धा घेत २०० मुलांनी सहभाग नोंदवला. तसेच महिलांसाठी मेहंदी आर्ट, पाककला स्पर्धा अशा आगळावेगळ्या या प्रदर्शनास परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आलेकर बदर्स आणि संपूर्ण टीमचे तोंड भरुन कौतुकदेखील केले.

## खोपोलीसह साजगाव पंचक्रोशीत वीज गायब

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

भाऊबीजेच्या दिवशी संध्याकाळी पावसाची सर येताच खोपोली शहरासह सांजगाव पंचक्रोशीत तब्बल चार ते पाच तास विजपुरवठा खंडीत होता. महावितरणच्या बेजबाबदार कारभारामुळे दिवाळी सण अंधारात साजरा करण्याची वेळ सर्वसामान्यांवर आली. वीजपुरवठा खंडीतमुळे सांजगाव पंचक्रोशीतील कंपन्यांना आर्थिक फटका बसला आहे. दिवाळीत अंधार राहणार नाही, या दृष्टिकोनातून महावितरणकडून कसल्याच उपाययोजना केल्या नसल्याचे समोर आले आहे. महावितरणच्या गाफील कारभारामुळे सर्वसामान्यांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

खोपोलीत विजपुरवठा खंडित होणे, ग्राहकांना अवाजवी भरमसाठ वीज देयके येणे यामुळेच वीज ग्राहक अक्षरश: मेटाकुटीला आले आहेत. महावितरण साहय्यक अभियंत्यांनी अनेकवेळा शटडाऊन घेऊन दुरुस्ती चीकामे केलीत. सणाच्या दरम्यान वीजपुरवठा खंडित होणार नाही यासाठी काळजी घेणे गरजेचे असताना महावितरणकडून यासंदर्भात कारवाई केली नसल्याचे सूत्रांनी सांगितले. दिवाळी हा सण प्रत्येकाच्या घरी आनंद घेऊन येतो. घरावर व परिसरात विद्युत रोषणाई करुन परिसर उजळतो. यामुळे वातावरण प्रसन्न होते. परंतु या वेळेस सर्वसामान्यांच्या आनंदावर विरजण टाकण्याचे काम महावितरणकडून केले जात असल्याचे दिसून येत आहे.साजगाव औद्योगिक पट्ट्यांतील दोनशे ते अडीशे कारखान्यांना विजेच्या लपंडावाचा फटका बसला.

## वैजाळीला पूर्णवेळ ग्रामसेवक द्या

### हाशिवरे सरपंचांसह ग्रामस्थांची मागणी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील वैजाळी ग्रामपंचायतीला पुर्णवेळ ग्रामसेवक नसल्याने ग्रामविकासाला अडथळा येण्याची भिती सरपंच शैला पाटील यांनी व्यक्त केली आहे. गावाच्या विकासासाठी कायम स्वरुपी ग्रामसेवकांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी पाटील यांनी केली आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी, ग्रामपंचायत उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना शुक्रवारी (दि. २४) निवेदन देण्यात आले आहे.

शैला पाटील यांच्या म्हणण्यानुसार, वैजाळी ग्रामपंचायतीची लोकसंख्या अंदाजे पाच हजार असून, मतदार तीन हजारांपेक्षा अधिक आहेत. या ग्रामपंचायतीवर मागील दीर्घकाळापासून कायमस्वरुपी ग्रामसेवकांची नेमणूक करण्यात आलेली नाही. तात्पुरत्या स्वरुपात ग्रामसेवकांकडे गावांचा कारभार सोपविण्यात आला आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीचे दैनंदिन कामकाज ठप्प होत असून, शासनाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीला अडथळा निर्माण होत आहे.

ग्रामपंचायतीचा सचिव व कार्यकारी अधिकारी म्हणून ग्रामसेवक ग्रामपंचायतीचे कामकाज पाहतात. बैठका घेणे, सभांचे कार्यवाही पुस्तिका लिहिणे, शासनाच्या योजना राबविणे, नोंदी ठेवणे, कर्मचाऱ्यांचे पगार देणे, महसूल संकलन व प्रशासनाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्याची जबाबदारी ग्रामसेवकांची असते. ही सर्व कामे ग्रामसेवकांअभावी विस्कळीत झाली आहेत.

पूर्णवेळ ग्रामसेवक नसल्याने शासकीय योजना, ग्रामविकास कामे, लाभार्थी निवड, लेखा परीक्षण आदी कामांमध्ये गंभीर स्वरुपात विलंब होत आहे. शुक्रवारी झालेल्या ग्रामसभेत ग्रामसेवक गैरहजर राहिले. त्यामुळे गावांचा विकास आराखडा तयार करणे शक्य झाले नाही. या निष्काळजीपणामुळे नागरिकांमध्ये संताप निर्माण झाला आहे.

जोपर्यंत ग्रामसेवकांची नियुक्ती केली जात नाही, तोपर्यंत असहकार तत्त्व अवलंबून ग्रामपंचायतीला प्रतिकात्मक टाळे लावण्यात यावे, असा ठराव संतप्त ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे तातडीने कायमस्वरुपी ग्रामसेवकांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थ व सरपंच शैला पाटील यांनी केली आहे.



## मेंढपाळांचे कळप कोकणात दाखल

### शेतीची कामे खोळंबल्याने निवाऱ्याचा प्रश्न कायम

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

दिवाळी सणांची सण सुरु झाला की, घाटमाथ्यावरील मेंढपाळ मोठ्या संख्येने कोकणात दाखल होत असतात. दरवर्षी दिवाळीपूर्वी भातकापणी सुरु होत असते. मात्र, यावर्षी परतीच्या पावसाच्या लपंडावामुळे शेतीची कामे खोळंबळी असून, घाटमाथ्यावरुन येत असलेले मेंढपाळ आपले बिऱ्हाड घोड्यांच्या खांद्यावर टाकून कोकणाकडे प्रस्थान करण्यास सुरुवात झाली आहे. सोबत मुले आणि आपला संसार घोड्याच्या पाठीवर टाकून आपल्या कुटुंबातील सदस्य आणि मेंढ्यांचे पोट भरण्यासाठी येत आहे. मात्र, तुरळक ठिकाणी भात कापणी झाली असून, मेंढ्या कुठे बसविणार, हा एकच प्रश्न डोके वर काढत आहे.

माळरानावर आपला संसार थाटण्याची लगबग सुरु झाली असून, मात्र या ठिकाणी सध्या मोठ्या प्रमाणावर गवत आहे. विविध सरपटणाऱ्या सापांची भीतीमुळे मेंढपाळ हवालदिल झाला आहे. भातशेती कापली की शेतात मुबलक प्रमाणात जागा मिळत असते. यामुळे मेंढ्यांच्या निवाऱ्यासमवेत चारापाण्याचा प्रश्न मार्गी लागत असतो. शिवाय भात कापणी झाल्यामुळे भातशेतीला येणारे गवत हा सकस आहार मेंढ्यांना मिळत असतो. मात्र, ते चित्र सध्या दुर्मिळ झाले आहे.

शेकडो मैल अंतर कापून पावसाची चाहूल लागताच पुन्हा आपल्या परतीच्या प्रवासाला जाणे हे अनेक वर्षे चाललेले समीकरण आहे. मात्र, कोकणाकडे आपल्याजवळ असलेल्या मेंढ्या घेऊन येताना मेंढपाळांना जणू तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यातच भात कापणी झाली नसल्यामुळे मेंढ्यांना निवारा कुठे द्यायचा या विचाराने मेंढपाळ चिंताग्रस्त झाले आहेत. परतीच्या पावसाच्या भीतीने भात कापणी खोळंबली आहे. तोपर्यंत मेंढ्या कुठे बसविणार? चाऱ्याचा प्रश्न जरी मार्गी लागत असला तरीसुद्धा निवारा मात्र वाऱ्यावरच राहिला आहे.




## दीपावलीनिमित्त गरजूंना मिठाई, कपडे वाटप

**। उरण । प्रतिनिधी ।**

लहूचीवाडी,कल्ले येथे मिठाई वाटप करून जनजाती बांधवांचे दिवाळी गोड करण्याचा कार्यक्रम बुधवारी (दि.२२) आयोजित करण्यात आला.

लहूचीवाडी, कल्ले येथील वनवासी कल्याण आश्रमचे कार्यकर्ते सुदाम पवार यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. ॲड. आकाश शहा यांनी लहान मुलांचे खेळ घेतले. निकेतन ठाकूर यांनी पसायदान म्हणून कार्यक्रमाची सुरुवात केली.

वनवासी कल्याण आश्रम उरण तालुका अध्यक्ष मनोज ठाकूर यांनी वनवासी कल्याण आश्रमबद्दल आणि आश्रमातर्फे सुरू असलेल्या विविध उपक्रमाबद्दल उपस्थित वाडीवरील बांधवांना माहिती दिली आणि ज्या मुलाची आश्रमात राहून शिकण्याची इच्छा आहे त्याला पुढील अभ्यासासाठी कल्याण आश्रम खर्च करेल, असे सांगितले.

पाड्यात वयस्कर आजी आजोबांना मिठाई देताना त्यांच्या डोळ्यातील भाव पाहून फारच समाधान वाटले. उपस्थित ३० भगिनींना नवीन साड्या, शाळेत जाणाऱ्या २५ मुलांना टोप्या, तसेच उपस्थित ३० बांधवांना टीशर्ट देण्यात आले. या कार्यक्रमासाठी सुदाम पवार, वनवासी कल्याण आश्रम उरण अध्यक्ष मनोज ठाकूर, कार्यकर्ते ॲड. आकाश शाह, अर्णव ठाकूर, निकेतन ठाकूर, सुरेश नायडू ही मंडळी वाडीवरील आपल्या जनजाती बांधवांना आनंद देण्यासाठी उपस्थित होते.

## निधीच्या वाटपात पक्षपातीपणा

**मुंबई** : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आल्या तर सत्ताधारी पक्षाच्या आमदारांना भरमसाठ निधी देण्यात आला आहे. पण, विरोधी पक्षाच्या आमदारांच्या मतदारसंघातील विकासासाठी पैसा उपलब्ध करून दिला जात नाही. हा कसला न्याय, असा संतप्त सवाल मुंबई काँग्रेस अध्यक्षा खासदार वर्षा गायकवाड यांनी केला आहे. लोकशाही मूल्य पायदळी तुडवून सरकार विकास निधीच्या वाटपामध्ये वारंवार पक्षपातीपणा करत आहे. हे घटनाबाह्य आणि बेकायदेशीर आहे, असेही त्या यावेळी म्हणाल्या. लोकप्रतिनिधी हा जनतेचा असतो तो कुठल्या पक्षाचा नसतो. निधी देताना विरोधकांना डावलून सरकार जनतेची फसवणूक करत आहे. महायुती सरकार सत्तेत आल्यापासून अनेक चुकीचे पायंडे पाडत आहे. हा अन्याय नाही का, असा संतप्त सवाल त्यांनी केला.

## वडगाव येथे नामफलकाचे अनावरण

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

पेण शहरालगत असलेल्या आणि नवीन वसाहत निर्माण झालेल्या मळेघर ग्रामपंचायत अंतर्गत वडगाव येथे अनेक कुटुंब एकत्र येऊन सोसायटी स्थापन करण्याचा निश्चय केला आणि श्री साई समर्थ रहिवासी सेवा संघाची स्थापना करण्यात आली.

दरम्यान, या नव्याने स्थापन केलेल्या सोसायटीच्या नामफलकाचे उद्घाटन माजी नगरसेवक शोमेर पेणकर, शिवसेना पेण शहर प्रमुख सुहास पाटील, मधुकर पाटील यांच्या उपस्थितीत श्री साई समर्थ रहिवासी सेवा संघ



या सोसायटीच्या नामफलकाचे फीत कापून अनावरण करण्यात आले. यावेळी सोसायटीचे अध्यक्ष वासुदेव म्हात्रे, उपाध्यक्ष शशिकांत कोळी, सेक्रेटरी चेतन मोकल, खजिनदार राहुल निंबळे, पदाधिकारी धनाजी घरत, पद्माकर मोकल, राहुल म्हात्रे, कोळी सर यांच्यासह अनेक सभासद उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनाजी घरत यांनी केले.

पान १ वरून

## अलिबाग पोलीस चौकशीच्या फेऱ्यात

असल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, त्याच्या मृत्यूप्रकरणी चौकशी सुरु झाली आहे. मागील आठवड्यात सीआयडीचे पथक अलिबागमध्ये दाखल झाले होते. जिल्हा कारागृहात जाऊन त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी केली होती. शुक्रवारी पुन्हा पथक अलिबागमध्ये दाखल झाल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. अलिबाग पोलीस ठाण्यात जाऊन संबंधित अधिकाऱ्यांची त्यांनी चौकशी केली. त्यामुळे अलिबाग पोलीस सीआयडीच्या चौकशीच्या फेऱ्यात सापडल्याचे चित्र आहे.

## वाळीत प्रथा थांबेना!

न ठेवणे, पीडित कुटुंबाशी संबंध ठेवणाऱ्यास प्रत्येकी रूपये पाच हजार रूपये दंड ठेवण्यात येईल, असा ठराव करून सामाजिक बहिष्कार टाकण्यात आला आहे. या घटनेमुळे रायगड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

वाळीत प्रकरणावर अंकुश ठेवण्यासाठी रायगड जिल्ह्यात पोलीस दलामार्फत मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली होती. त्यानंतर काही प्रमाणात सामाजिक बहिष्काराच्या घटना रोखण्यात आल्या. मात्र, पुन्हा एकदा जिल्ह्यामध्ये विशेष म्हणजे रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाळीत प्रकरणे वाढत असल्याचे चित्र समोर आले आहे. आता चोरढेमध्ये सामाजिक बहिष्काराची घटना घडली असून, हे प्रकार थांबेनात, असे चित्र दिसून येत आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये सामाजिक बहिष्काराच्या घटना मागील काही वर्षांपूर्वी मोठ्या प्रमाणात झाल्या होत्या. समाजातून वगळण्याचे प्रकार वाढले होते. सामाजिक, आर्थिक, मानसिक व शारीरिक त्रास दिला जात होता. सामाजिक बहिष्काराची ४७ प्रकरणे झाली होती. त्याची दखल राज्य शासनाला घ्यावी लागली. अखेर त्यावर कायदा तयार करण्यात आला. जिल्ह्यातून वाळीत प्रकरण हद्दपार करण्यासाठी रायगड पोलिसांनी कंबर कसली होती. जनजागृतीपर उपक्रम राबविले जात होते. वाळीत टाकणाऱ्यांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले होते. यानंतर काही प्रमाणात हे प्रकरणांवर अंकुश राहिला. मात्र, रायगड जिल्ह्यात पुन्हा सामाजिक बहिष्कार प्रकरणाने डोके वर काढण्यास सुरुवात केली आहे.

## महिला डॉक्टरनं संपवलं जीवन

गोपाल बदने याने माझ्यावर चार वेळा अत्याचार केला, तर पोलीस प्रशांत बनकर याने मला मानसिक त्रास दिला, असे संपदाने हातावर लिहून ठेवले आहे. या प्रकरणाने उपजिल्हा रुग्णालयात खळबळ उडाली असून, पोलिसांनी या घटनेचा तपास सुरू केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील या घटनेची दखल घेतली असून, महिला डॉक्टरने ज्या पोलिसांच्या नावाचा उल्लेख केलाय, त्यांना तात्काळ निलंबित करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. आरोपींवर कठोर कारवाई करण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत.

## रायगडात औषध उद्योगाला चालना

यासाठी जमीन निश्चितीचे कामही गेल्या दीड वर्षांपासून सुरू होते. देशांतर्गत औषध उद्योगाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने चार मोठे बल्क ड्रग पार्क उभारण्याचा निर्णय घेतला होता. एमआयडीसीने २७ ऑक्टोबर २०२३ रोजी दिघी बंदराभिमुख औद्योगिक क्षेत्रात हायटेक फार्मा पार्क विकसित करण्याचा निर्णय मंजूर केला होता. यासाठी व्यवहार सल्लागार नेमून निविदा काढण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार दिघी बंदराभिमुख औद्योगिक क्षेत्रात हजार हेक्टर क्षेत्रात आरक्षित झाले. अखेर मे. रामकी इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांची ७१३.४२ कोटींची रकमेची निविदा प्राप्त झाली.

**२२ गावांचा विकास**

दिल्ली–मुंबई औद्योगिक कॉरिडॉर अंतर्गत दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र होणार असले. रायगड जिल्ह्यातील रोहा, माणगावमधील जवळपास नऊ गावांचा समावेश होणार आहे. नऊ गावांचा विकास एमआयसीडीसी करणार असून, १३ गावांचा विकास एमआयडीसी करणार आहे. संपादित झालेल्या क्षेत्रात ६१.९७ हेक्टरवर पादत्राणे आणि चर्मोद्योग क्लस्टर प्रकल्पाची एक हजार हेक्टरवर बल्क ड्रग पार्कची उभारणी होणार आहे, तर उर्वरित दोन हजार ४६० हेक्टरवर केंद्रीय औद्योगिक कॉरिडॉर विकास महामंडळाच्या माध्यमातून औद्योगिक क्षेत्र विकसित केले जाणार आहे.

## तरंगत्या हॉटेलमुळे सांडपाण्याला आडकाठी

होऊन जैवविविधता धोक्यात येत असल्याने होणारे हे प्रदूषण रोखण्यासाठी खाडी पात्रातून रबरी पाईप टाकण्याचे काम एमआयडीसीच्या माध्यमातून हाती घेण्यात आले होते. याकरिता नदी पात्रातील अडीच मीटर जमिनीखालून ६३० व्यासाची नवीन वाहिनी टाकण्याची योजना हाती घेण्यात आली होती. याकरिता ८४ कोटी रुपये खर्च अपेक्षित होता. सायन–पनवेल महामर्गावर कोपरा गावापर्यंतच्या खाडीत हे काम पूर्ण झाले आहे. मात्र, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पार्श्वभूमीवर पुढे तरंगते हॉटेल प्रस्तावित आहे. त्यामुळे महाराष्ट्र सागरी महामंडळाने पाईपलाईन आणखी दुपटीने खोल टाकण्याचे सूचित केले आहे. त्यामुळे हा प्रकल्प रखडला असून, त्याच्या खर्चातसुद्धा वाढ झालेली आहे. साडेअकरा कोटी रुपये आणखी खर्च करावा लागणार असल्याची माहिती एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

## भेकर मांसप्रकरण भगतांना भोवणार?

जयेंद्र भगत यांच्या घरात भेकरचे मांस सापडल्याने खळबळ उडाली आहे. वन विभागाच्या माहितीनुसार, भेकर जातीचे प्राणी फणसाड परिसरात आहेत. त्याठिकाणी भेकरची शिकार कशी केली, असा सवाल उपस्थित केला जात आहे. फणसाड परिसरात वन विभागामार्फत सुरक्षा राखली जाते. तरीदेखील त्या परिसरात भेकरची शिकार झाल्याने वन्य प्राण्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी काय करीत होते, अशा अनेक प्रकारच्या चर्चेला उत आला आहे. याबाबत वन विभागाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यांनी याबाबत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिला नाही.

## राजा केणी राष्ट्रवादीच्या वाटेवर?

यांच्याविरोधात कारवाई करीत पक्षातून हकालपट्टी केली. भाजपमधून हकालपट्टी झाल्यावर दिलीप भोईर यांनी अखेर शिंदे गटात पक्ष प्रवेश करून आमदार दळवी यांच्यासोबत काम करण्यास सुरुवात केली. दिलीप भोईर यांच्या शिंदे गटातील आगमनाने राजा केणी यांच्या मार्गात अडथळा निर्माण झाल्याची चर्चा सुरु झाली. आमदारांच्या वेगवेगळ्या कार्यक्रमात राजा केणी दूरच असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अंतर्गत कलह असल्याची चर्चा आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या निवडणुकीची हालचाल प्रशासनाकडून सुरू झाली आहे. शिंदे गटातील जिल्हा प्रमुख, आमदार दळवी यांचे अगदी जवळचे म्हणून ओळखळे जाणारे राजा केणी सध्या उमेदवारीचे बाशिंग बांधून उभे आहेत. वेगवेगळ्या माध्यमातून ते उमेदवारीची जाहिरात करीत आहेत. दळवी यांना विश्वासात न घेता ते प्रचार करीत असल्याची चर्चा आहे. पक्षश्रेष्ठींकडून उमेदवारांची यादी जाहीर झालेली नसताना, राजा केणी यांच्याकडून उमेदवारीचा प्रचार सुरू करण्यात आला आहे. त्यांच्या या प्रकारामुळे ते एकला चलो रे असे चित्र दिसून येत आहे. राजा केणी राष्ट्रवादीच्या वाटेवर असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. आदिती तटकरे पालकमंत्री झाल्यावर ते राष्ट्रवादी जाणार असल्याचेदेखील बोलले जात आहे. त्यामुळे राजा केणी राष्ट्रवादीच्या वाटेवर असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. मात्र, पालकमंत्रीपदानंतरच हे चित्र स्पष्ट होणार असल्याचे बोलले जात आहे.

## तहसील कार्यालयात शुकशुकाट

आणि शासकीय कामांसाठी तहसील कार्यालयाच्या दारात येत आहे. अनेक शेतकरी नुकसान होऊन मेटाकुटीला आले असताना, दुसरीकडे जनतेचे सेवक म्हणवणारे शासकीय अधिकारी व कर्मचारी मात्र बिनधास्तपणे सुट्ट्या उपभोगताना दिसत आहेत. दिवाळीची सुट्टी संपल्यावरही कार्यालयात शुकशुकाट असल्याने शेतकऱ्यांची कामे खोळंबली असून, त्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या या असंवेदनशील कारभारावर सामाजिक कार्यकर्ते केतन म्हस्के यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. ''शेतकरी मदतीसाठी कार्यालयात हेलपाटे मारत असताना, अधिकारी व कर्मचारी रजेवर असणे हे अत्यंत गंभीर आहे. जनतेच्या कामांपेक्षा कर्मचाऱ्यांसाठी सुट्टी महत्त्वाची आहे का? प्रशासनाने या प्रकाराची तातडीने दखल घेऊन गैरहजर कर्मचाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी,'' अशी मागणी म्हस्के यांनी केली आहे.

कर्मचाऱ्यांच्या या सामूहिक सुट्टीमुळे तहसील कार्यालयातील कामाचा बोजा वाढला असून, याचा थेट परिणाम सर्वसामान्य नागरिकांच्या आणि विशेषतः नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या कामांवर होत आहे. तातडीची कामे पूर्ण होत नसल्याने नागरिकांमध्ये प्रशासनाविरोधात नाराजी वाढत आहे.

सद्यःस्थितीत शेतकऱ्यांची कामे आणि शासकीय कामकाज सुरळीत चालण्यासाठी, तहसील कार्यालयातील रजेवर असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तातडीने कामावर हजर व्हावे आणि वरिष्ठांनी या गैरहजेरीची गंभीर दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी सुधागडमधून जोर धरू लागली आहे.

## ...अधिकारी मात्र मौजेत

नेहमीचा राग आणणारा बहाणा 'साहेब रजेवर आहेत.' लोकांना न्याय हवा असताना साहेब मात्र 'रजेचा' आनंद घेत आहेत! सुट्ट्यांचा बहाणा करून काही अधिकारी थेट 'कुटुंब सहलींना' रवाना झाल्याचे आतल्या कर्मचाऱ्यांनी सांगितले आहे.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी लेखी पत्राद्वारे चौकशीचे आदेश दिले तरी त्यावर धूळ साचली आहे. वरून अधिकारी 'चौकशी सुरू आहे' असं सांगून जनतेला फसवतात. उरणकर मात्र आज पेटले आहेत. गावोगावी संतापाची लाट उसळली आहे. 'असे गैरहजर, गैरजबाबदार आणि भ्रष्ट अधिकारी तात्काळ निलंबित करा,' अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा उरणमध्ये जनतेचा महाआक्रोश मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा स्थानिक कार्यकर्त्यांनी दिला आहे.

## पनवेलमध्ये दोन ठिकाणी आग

एक पुरुष बेशुद्ध अवस्थेत आढळून आला. जवानांनी कोणताही विलंब न करता त्याला सुरक्षित बाहेर काढत रुग्णवाहिकेच्या मदतीने तातडीने पुढील उपचारासाठी रवाना केले. त्याचबरोबर इमारतीच्या वरच्या मजल्यावर अडकलेल्या एका कुत्र्याला ही अग्निशमन दलाने यशस्वीपणे रेस्क्यू करून सुरक्षित बाहेर काढले.

# अन्यथा... निवडणुकांवर बहिष्कार





| पाली | वार्ताहर |

सुधागड तालुक्यातील घोडगाव, गावठेवाडी, नवेवाडी, भागाची वाडी, ओवळ्याची वाडी, येथील ठाकूर आदिवासी समाज बांधवांनी चिखलगाव ते घोडगाव या मुख्य रस्त्याच्या दुरवस्थेसह वाड्यांमधील अनेक नागरी समस्या बाबत संतप्त आदिवासी बांधवांनी शुक्रवारी (दि.२४) पाली तहसील कार्यालयावर धडक देत निवासी नायब तहसीलदार भारत फुलपागारे यांना आपल्या समस्या बाबतचे निवेदन दिले.

याप्रसंगी सह्याद्री आदिवासी ठाकूर समाज संस्थेचे अध्यक्ष गोविंद लेंडी उपाध्यक्ष चंद्रकांत वरगुडे, ताया सिंगवा, मारुती डोके, महादू दोरे, धर्मा सिंगवा,चाऊ सिंगवा, परशुराम दोरे चंद्रकांत सिंगवा सुभाष सिंगवा जानू सिंगवा अनंता सिंगवा जानू मेंगाळ, आदी ग्रामस्थ शेकडोच्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी आदिवासी बांधवांनी नायब तहसीलदार यांना सांगितले की आमच्या समस्यांचे संबंधित विभागाकडून तत्काळ निवारण करावे अन्यथा आम्ही सर्व आदिवासी बांधव आगामी येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार टाकणार याला सर्वस्वी जबाबदार उदासीन प्रशासन आणि राजकीय पुढारी असतील, असा इशारा आदिवासी बांधवांनी दिला.

### आदिवासी वाड्यांमधील ग्रामस्थांना भेडसावणाऱ्या समस्या

- मुख्य रस्त्यासह अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था
- गटारे नसल्याने वाड्यांमध्ये दुर्गंधी
- स्मशानभूमीसह स्मशानभूमी रस्त्यांची दुरवस्था
- व्यायाम शाळेसह अंगणवाडीची दुरवस्था
- महावितरणच्या विद्युत वाहिन्यासह पोलची दुरवस्था

> गेली अनेक वर्षापासून सुधागड तालुक्यातील आमचे आदिवासी ठाकूर समाज बांधव शासकीय तसेच नागरी सुविधापासून वंचित आहेत. ठाकूर वाड्यांना रस्ते नसल्यामुळे आजारी तसेच गरोदर बायकांना झोली करून शहराचे ठिकाणी घेऊन जावे लागत आहे. निवडणुकांतून फक्त आश्वासन दिली जातात कामाची पूर्तता होत नाही. त्यामुळे या वाड्यांमधील ग्रामस्थांनी निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतलेला आहे. याला सर्वस्वी जबाबदार उदासीन प्रशासन आणि निष्क्रिय राजकीय पुढारी आहेत. – गोविंद लेंडी, अध्यक्ष, सह्याद्री आदिवासी ठाकूर समाज संस्था सुधागड

## पार्किंग केलेली कार तलावात कोसळली

**नवीन पनवेल :** पनवेल तालुक्यातील मोहो गावात पार्किंगची सोय अपुरी असल्याने तलावाभोवती अनेक जण वाहन पार्किंग करतात. मात्र, हीच सवय एका वाहनचालकासाठी चांगलीच धोकादायक ठरली. हँडब्रेक न लावता पार्किंग केलेली प्रवासी इको गाडी २२ ऑक्टोबर रोजी थेट खोल तलावात कोसळली. या घटनेची माहिती समजताच परिसरात मोठी गर्दी झाली. ग्रामस्थांच्या मदतीने आणि जेसीबीच्या सहाय्याने सुमारे दोन तासांच्या प्रयत्नांनंतर गाडी तलावातून बाहेर काढण्यात आली. गावातील मुख्य रस्त्यालगत असलेल्या या तलावाभोवती सुरक्षा कठडे नसल्याने अपघाताचा धोका कायम आहे. रस्ता वळणदार असल्याने विशेषतः नवीन वाहन चालकांना वळणाचा अंदाज येत नाही आणि त्यामुळे गंभीर अपघात होण्याची शक्यता वाढते. तलावाभोवती सुरक्षा कठडे उभारणे अत्यंत गरजेचे आहे. प्रशासनाने तातडीने कठडे उभारावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली.

## निवडक

### खांब-पालदाड मार्गावर कार घसरली

**खांब :** रोहा तालुक्यातील अपुऱ्या साईडपट्टीचा रस्ता म्हणून बहुचर्चेत असणाऱ्या खांब-पालदाड मार्गावर कार घसरल्याची घटना घडली आहे. याबाबत प्राप्त झालेल्या माहितीनुसार मुंबई येथून खांबवरून रोहाच्या दिशेने निघालेला कार चालक कार नं. ०५ ३५०७ हा चालक खांब वरुन रोहाकडे जात असताना धानकान्हे गावाच्या हद्दीत आला असताना व तिथून पुढे मार्गक्रमण करत असताना येथे असणाऱ्या अपुऱ्या साईडपट्टीचा अंदाज न आल्याने कारने साईड पट्टीची जागा सोडून कार सरळ बाजूच्याच शेतात कलंडली. सुदैवाने कार चालक व अन्य सोबत असणाऱ्या सहप्रवाशांना कोणतीही दुखापत झाली नसल्याचे सांगण्यात आले आहे. या मार्गावर असणारी अपुरी साईडपट्टी व वाढलेल्या प्रचंड झाडीझुडपांमुळे मार्गावर रोज कुठे ना कुठे तरी अपघातांच्या घटना या घडतच असतात.अपुऱ्या असणाऱ्या साईडपट्टीचा विषय पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.



### वेलशेत येथे दिवाळी पहाट साजरी

**नागोठणे :** नागोठण्याजवळील वेलशेत (रोहा) येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील शिवसंस्कार प्रतिष्ठान, वेलशेत यांच्या वतीने नुकतीच वेलशेत येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकातील शिव पुतळ्याचे पूजन करून संपूर्ण गावामध्ये तरुण व तरुणींनी मशाल फेरी काढली. तसेच शिवछत्रपतींच्या पुतळ्यासमोर मशाली हातात घेऊन फेर धरला व ज्याप्रमाणे शिवकाळात सणाला पोत नाचवला जायचा त्याचप्रमाणे वेलशेत गावातील तरुणाईने दिवट्या नाचवून दिवाळी साजरी केली. आणि छत्रपती शिवाजी राजांमुळेच आज मंदिराला कळस आणि दारात तुळस आहे. या जाणीवेने दीपावलीच्या पहाटे शिवछत्रपतींच्या चरणी दिव्यांची आरास करून दीपावली साजरी केली. यावेळी शिवचरित्र व इतिहास अभ्यासक प्रल्हाद पारंगे यांच्यासह गावातील तरुण तरुणी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### टोलनाक्यावर कारची दुभाजकाला धडक

**रसायनी :** पुण्याकडून मुंबईच्या दिशेने जात असताना खालापूर टोल नाका येथे चालकाला डुलकी लागल्याने त्याचे स्टेअरींगवरील नियंत्रण सुटले आणि कार दुभाजकाला धडकली. त्याचवेळी तेथे असलेल्या टोल कर्मचाऱ्याला ही धडक बसली. कारमधील वयस्कर आजी आजोबा गंभीर जखमी झाले असून, वाहन चालक त्याची पत्नी, त्याचा मुलगा आणि मुलगी यांना किरकोळ स्वरूपाच्या जखमा झालेल्या आहेत. जखमींना तातडीने कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल केले आहेत. यावेळी देवदूत यंत्रणा, आयआरबी पेट्रोलिंग, महामार्ग वाहतूक पोलीस यंत्रणा, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बलचे जवान, लोकमान्य ॲम्बुलन्स सर्विस आणि हेल्प फाउंडेशनच्या माध्यमातून या अपघातात मदतकार्य झाले. अपघात घडल्याची माहिती टोल कर्मचाऱ्यांनी तातडीने दिल्याने मदत कार्य वेगाने झाले. ही घटना खालापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडल्याने पोलीस निरीक्षक सचिन पवार यांचे मार्गदर्शनाखाली पुढील कार्यवाही सुरू आहे.



### नेरळकरांनी अनुभवली दिवाळी पहाट

**नेरळ :** दिवाळी साजरी होत असताना नेरळमध्ये स्वरानुभूती निर्मित आयोजित दिवाळी पहाट आयोजन केले होते. नेरळ ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात या दिवाळी पहाट कार्यक्रमाला मोठी गर्दी केली. नेरळ ग्रामस्थांसाठी आयोजित दिवाळी पहाट कार्यक्रम श्री लक्ष्मी पूजनाचे दिवाळी पहाट कार्यक्रम आयोजित केला होता. अवतरली ती सांगितिक मेजवानी घेऊन निमित्त होते श्री कुसुमेश्वर देवस्थानच्या प्रांगणात आयोजित केलेल्या स्वरानुभुती निर्मित स्वरबहार या दिवाळी पहाट ने रसिकांना खिळवून ठेवली. प्राप्ती दहीवलीकर, जान्हवी दहीवलीकर या भगिनींनी ओम नमो जी आद्या या गीताने छान सुरुवात केली. राम कृष्ण हरी... च्या गजरात सर्व तल्लीन झाले. अक्षय जोशी याने तू सुखकर्ता हे गीत सादर केले. या नंतर बाप्पा थोडे थांबाना..., बोलावा विठ्ठल..., संतांचिया गावी प्रेमाचा सुकाळ... राम रंगी रंगले... तुझे नाम आले ओठी... सोहम हर डमरू... तेजोनिधी लोहगोल... कानडा राजा पंढरीचा... दत्ताची पालखी... सुखाचे सुख चंद्रभागे तटी... शब्दा वाचून कळले सारे...आली माझ्या घरी ही दिवाळी... असे अवीट गोडीचे अभंग तसेच एकापेक्षा एक सरस गाणी सादर करून या त्रयींनी रसिक प्रेक्षकांना अक्षरशः खिळवून ठेवले. रितीकेश दळवी, तनय कामत, राकेश पवार आणि कार्यक्रमाचे संगीत संयोजक विवेक दहीवलीकर यांची उत्तम साथ आणि नम्रता खैरनार यांचे निवेदन याने हा कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला.

## पनवेल महापालिकेच्या स्वच्छतादूताच्या प्रामाणिकपणाचे होताहे कौतुक

| पनवेल | प्रतिनिधी |

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी पनवेल शहरातील मिरची गल्लीमध्ये एका व्यापाराचे दोन लाख ४६ हजार परत करून स्वच्छता दूताने प्रामाणिकपणाची संस्कृती दाखवून देत एक आदर्श वस्तूपाठ ठेवला.

आपल्या अवतीभवती प्रामाणिक माणसं खूप असतात याची प्रचिती अनेकदा येते. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी पनवेल शहरांमध्ये मिरची गल्लीत रात्री आठ वाजण्याच्या सुमारात एका प्लास्टिकच्या पिशवीमध्ये दोन लाख ४६ हजार रुपयांचा बंडल गुंडाळलेल्या अवस्थेत रस्त्यावर पडल्याचे दिसून आले. त्याचवेळी महानगरपालिकेची घंटागाडी त्या ठिकाणी कचरा संकलन करत होती. रस्त्यावर पडलेला प्लास्टिक पिशव्यांमधील नोटांचा जुडगा कचरा म्हणून स्वच्छता दूतांनी उचलला. मात्र तो जड असल्यामुळे त्यामध्ये नेमके काय आहे असा प्रश्न घंटागाडी कामगारांना पडला. त्यानुसार त्यांनी उघडून पाहिले असता त्यामध्ये पैशांचे बंडल आढळून आले. मात्र हे धन दुसऱ्याचे असून ही लक्ष्मी आपल्याला प्रसन्न होणार नाही हा प्रामाणिक विचार संबंधित स्वच्छता दूतांच्या मनाला शिवला. त्याच वेळी एक व्यापारी धाय मोकलून रडत असल्याचे घंटागाडी कामगारांच्या निदर्शनास आले. त्याला विचारले असता माझे पैसे पडल्याचे तो म्हणाला. किती पैसे हरवले आहेत अशी त्याला विचारणा केली असता त्याने रक्कम सांगितल्यानंतर हे पैसे त्याचेच आहेत हे खात्री स्वच्छता दूतांना पटली. त्यांनी लागलीच ही रोकड संबंधित व्यापाऱ्याला परत करत प्रामाणिकपणाचे दर्शन घडवले. संबंधित व्यापाऱ्याने त्यांचे आभार व्यक्त करत दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.



● सायंकाळच्या आल्हाददायक वातावरणात दिवेआगर समुद्र किनाऱ्यावर जेटस्की राईडचा मनमुराद आनंद घेताना पर्यटक. (छायाचित्र-अमेय नाझरे, बोर्ली पंचतन)

## कामोठ्यात उभारणार अग्निशमन केंद्र

| पनवेल | वार्ताहर |

पनवेल महापालिका क्षेत्रातील सर्वात मोठे अग्निशमन दलाचे केंद्र कामोठे उपनगरातील मानसरोवर रेल्वेस्थानकासमोरील चौकातील सुमारे ७ हजार चौरस मीटर जागेवर उभारले जाणार आहे. पनवेल महापालिका प्रशासनाने याबाबतच्या सर्व तांत्रिक बाबी पूर्ण केल्या असून २८ कोटी रूपये खर्च करून बांधल्या जाणाऱ्या अग्निशमन दल केंद्राची इमारत हायटेक पद्धतीची उभारण्यासाठी निविदा प्रक्रिया लवकरच पार पाडली जाईल.



सिडकोकडून मोक्याचा भूखंड मिळण्यासाठीपनवेलमहापालिकेचा पाठपुरावा सुरू होता. सिडकोकडून संबंधित भूखंड ताब्यात घेतल्यावर या भूखंडावर बांधण्यात येणाऱ्या केंद्राच्या आराखड्यानुसार खर्चाला पनवेल महापालिका प्रशासनाने नुकतीच मंजूरी दिली. याबाबतची निविदा प्रक्रिया पार पडल्यानंतर बांधकामाला सुरूवात होईल. कामोठे येथील हे अग्निशमन दलाचे केंद्र सुरू झाल्यावर येथे दोन अग्निशमन बंबासह ४० अग्निशमन दलाचे जवान तैनात करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे. या दलाच्या केंद्रामध्ये भविष्यात नवी मुंबई, सिडको मंडळ आणि पनवेल महापालिकेचे संयुक्त नियंत्रण कक्ष केंद्र यामध्ये उभारला जाईल. या केंद्रात आपत्ती व्यवस्थापनासह तीनही यंत्रणेचे अग्निशमन अधिकारी एकत्र बसू शकतील. नवी मुंबई विमानतळाची हॉटलाईनला सुद्धा याच केंद्रातून समन्वय साधला जाईल.

## आढळला मृतदेह

**पनवेल :** पनवेल परिसरात एका अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला आहे. सदर अनोळखी बेवारस इसम, अंगात पांढ-या रंगाचा शर्ट घातलेला, कपाळाला व नाकाला खरचटलेले, अंगाने मध्यम असे वर्णन आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे यांच्याशी संपर्क साधावा.

## अपघातात माकडाचा मृत्यू

**नवीन पनवेल :** नवीन पनवेल वाहतूक शाखेच्या हद्दीमध्ये मुंबई गोवा महामार्गावर कर्नाळा अभयारण्याजवळ काळ्या रंगाची होंडा कंपनीची युनिकॉन दुचाकी जात असताना दुचाकी समोर अभयारण्यातील माकड आडवे आले. हे माकड दुचाकीमध्ये अडकून दुचाकी रस्त्यावर पडून अपघात झाला. या अपघातामध्ये दुचाकी क्र. एम एच ०६ सीके ६४२५ वरील चालक किरकोळ जखमी झाला आहे व पाठीमागे बसलेला युवक गंभीररित्या जखमी झाला आहे.

नवीन पनवेल वाहतूक शाखेच्या अंमलदार यांनी या ठिकाणी ॲम्ब्युलन्स बोलावून जखमींना गांधी हॉस्पिटल पनवेल या ठिकाणी उपचारासाठी पाठवण्यात आले. या अपघातामध्ये माकडाचा मृत्यू झाला आहे.

## आदिवासी वाडीवर दिवाळी साजरी



**नवीन पनवेल :** कोकण विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, जिल्हाधिकारी रायगड किशन जावळे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे यांच्या मार्गदर्शनाखाली आदई कातकरीवाडी तालुका पनवेल येथे उपविभागीय अधिकारी पनवेल पवन चांडक, नायब तहसीलदार संतोष पाटील, मंडळ अधिकारी गोवर्धन माने, तलाठी प्रिया वैती, दीपक पाटील यांच्या हस्ते नवीन कपडे, दिवाळी फराळ आणि जातीचे दाखले वाटप करण्यात आले. सदरहू कार्यक्रम उरण सामाजिक संस्थेच्या माध्यमातून साकारण्यात आला. उरण सामाजिक संस्थेचे सचिव संतोष पवार, उपाध्यक्ष ॲड राजेंद्र मढवी, रायगड भूषण दत्ता गोंधळी, सामाजिक कार्यकर्ते नामदेव ठाकूर हे उपस्थित होते.

## माथेरान घाटात वाहतूक कोंडीचा तिढा

| माथेरान | प्रतिनिधी |

प्रत्येक सुट्ट्यांच्या हंगामात माथेरान घाटरस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीचा सामना पर्यटकांना करावा लागत असल्याने माथेरान पर्यटन स्थळाला भेट द्यावी की नाही अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे पर्यटक बोलत आहेत. मुळातच दस्तुरी नाक्यावर असलेली अपुरी पार्किंग व्यवस्था याला कारणीभूत असून या भागातील एमपी ९३ हा प्लॉट जोपर्यंत पार्किंगसाठी नगरपरिषदेच्या ताब्यात मिळत नाही तोपर्यंत पर्यटकांना असाच वाहतूक कोंडीचा सामना करावा लागण्याची शक्यता असून हा तिढा सुटणे अशक्यच असल्याचे बोलले जात आहे.

जेमतेम दहा हजार पर्यटकांची क्षमता असलेल्या या ठिकाणी मुंबई कडील पर्यटक जवळचे पर्यटनस्थळ असल्यामुळे सुट्ट्यांच्या हंगामात मोठ्या प्रमाणावर गर्दी करत असतात. त्यामुळे पर्यटकांच्या वाहनांची गर्दी वाढल्यास दस्तुरी नाक्यावर पार्किंग साठी सद्यस्थितीत जागा उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. मागील काळात यासाठी वनसमितीच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात आले होते. परंतु त्यांनी केलेला प्रयत्न यशस्वी होऊ शकला नाही.

> जून महिन्यात आम्ही याठिकाणी आलो होतो त्यावेळी सुध्दा घाटात प्रचंड प्रमाणात गर्दी होती.यावेळी वाटले की प्रशासनाने काहीतरी व्यवस्था करून हा प्रश्न मार्गी लावला असेल परंतु येरे माझ्या मागल्या अशीच परिस्थिती याहीवेळी आम्हाला अनुभवायला मिळाली ही खरोखरच दुर्दैवी बाब म्हणावी लागेल. – शंतनू कर्णिक, पर्यटक मुंबई

वाहतूक कोंडीचा तिढा कायमस्वरूपी संपुष्टात येण्यासाठी राजकीय पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांची मानसिकता असल्यास सहज शक्य आहे परंतु या स्थळाकडे नेहमीच दुर्लक्ष केले जात असल्याने ऐन सुट्ट्यांच्या हंगामात पर्यटकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे.एक दृष्टीने गर्दीच्या काळात माथेरानला भेट देण्याची शिक्षा असल्याचेही पर्यटकांमधून चर्चा होत आहेत.

सरकारी उदासीनतेचा फटका | पर्यावरण विभागाची धक्कादायक कबुली

## ९९ टक्के पाणथळ असुरक्षित!

| रायगड | प्रतिनिधी |

इस्रोने मॅप केलेल्या दोन लाखांहून अधिक पाणथळ जागांपैकी फक्त १०२ पाणथळ जागांना सरकारने कायदेशीररीत्या संरक्षण दिले आहे. म्हणजे ९९.९ टक्के ठिकाणांवर संरक्षणाचा अभाव आहे. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने माहिती अधिकाराच्या कायद्यान्वये ही धक्कादायक कबुली दिली आहे. यामुळे पर्यावरणवाद्यांनी याबाबत चिंता व्यक्त केली आहे.

पर्यावरण निरीक्षक नॅटकनेक्ट फाउंडेशनने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाणथळ जागांसाठी जलदगतीने कायदेशीर संरक्षण देण्याची सूचना केली होती. पूर नियंत्रित करणारे, भूजल पुनर्भरण करणारे आणि स्थलांतरित पक्ष्यांना आधार देणारी महत्त्वाची परिसंस्था म्हणून काम करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पाणथळ जागा विभागाने केंद्रीय पर्यावरण एक लाख ८९ हजार ६४४ पाणथळ जागा जमिनीवर पडताळण्यात आल्या आहेत. (भौतिकदृष्ट्या पडताळण्यात आल्या आहेत) आणि १,१६,४२५ सीमा राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी निश्चित केल्या आहेत; परंतु आतापर्यंत फक्त १०२ पाणथळ जागा संरक्षणासाठी औपचारिकपणे अधिसूचित करण्यात आल्या आहेत. नॅटकनेक्ट या संस्थेने मागितलेल्या माहितीतून हे स्पष्ट झाले आहे.

पाणथळ जागा पडताळण्याची प्रक्रिया सुरू आहे. पाणथळ जागा शास्त्रज्ञ पंकज वर्मा यांनी नॅटकनेक्टला लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे, की इतर पाणथळ जागा अधिसूचित करणे प्रगतिपथावर आहे आणि या प्रक्रियेवर मंत्रालयाकडून बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. तथापि याबाबत पर्यावरण जाणकारांनी काळजी व्यक्त केली आहे. कारण अधिकृत अधिसूचनेच्या अनुपस्थितीत शहरी नियोजक पाणथळ जागांकडे दुर्लक्ष करीत आहेत. पायाभूत सुविधांच्या विकासाच्या नावाखाली पाणथळ जागा नष्ट केल्या जात आहेत, असे फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी सांगितले.



### फुफ्फुसांना वाचवण्याचे आवाहन

पीएमओच्या सार्वजनिक तक्रार पोर्टलद्वारे दाखल केलेली कुमार यांची तक्रार आता औपचारिकपणे एमओईएफ अँड सीसीच्या वेटलँड्स विभागाकडे पाठवण्यात आली आहे. त्यांनी पंतप्रधानांना वैयक्तिकरीत्या हस्तक्षेप करून या फुफ्फुसांना वाचवण्याचे आवाहन केले आहे. मंत्रालयाने म्हटले आहे, की त्यांनी पाणथळ जागांचे समग्र संवर्धन आणि पुनर्संचयनात राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना बळकटी देण्यासाठी राष्ट्रीय जलीय परिसंस्थांच्या संवर्धन योजना (एनपीसीए) मार्गदर्शक तत्त्वे २०२४ तयार केली आहेत. या योजनेचा उद्देश एकात्मिक, बहुविद्याशाखीय दृष्टिकोनातून या महत्त्वपूर्ण परिसंस्थांचा ऱ्हास थांबवणे आहे.



कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



## हे तोंड चुकवणे कशासाठी?

एखाद्याकडून कर्ज काढावे आणि ते न फेडता येत असल्यामुळे देणेकऱ्याचे तोंड चुकवत फिरावे लागावे तशी भारताची अवस्था झाली आहे. वाईट बाब अशी आहे की, एरवी देशप्रेमाच्या गप्पा मारणारे आपले महान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळेच ही वेळ देशावर आली आहे. त्याहूनही वाईट असे की, भारताने कोणाचेही कर्ज थकवलेले नाही. तरीही त्याचे नेते नरेंद्र मोदी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे तोंड चुकवत सध्या फिरत आहेत. त्यांच्याशी समोरासमोर गाठ पडू नये म्हणून जवळपास प्रार्थना करीत आहेत. ट्रम्प येणार असतील तर त्या परिषदांना जाण्याचे टाळत आहेत. उद्या म्हणजे २६ ऑक्टोबरला पूर्व आशियाई देशाची आसियान शिखर बैठक मलेशियाची राजधानी क्वालालंपूर इथे होणार आहे. ही सिंगापूर, मलेशिया, इंडोनेशिया, थायलंड, जपान, कोरिया इत्यादी थोड्या प्रगत देशांनी पुढाकार घेऊन ही संघटना स्थापलेली आहे. यंदा ट्रम्प तिला प्रमुख पाहुणे म्हणून हजर राहणार आहेत. या परिषदेच्या वेळी नरेंद्र मोदी यांच्याशी आपली भेट होईल असे ट्रम्प यांनी यापूर्वी सूचितही केले होते. पण मोदी यांनी तिकडे जाण्याचे टाळले आहे. २०१४ नंतरच्या पहिल्या पाच वर्षांच्या काळापासून पंतप्रधान स्वतःच सगळे परदेश दौरे करीत आले आहेत. त्यांच्या पहिल्या परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांना पंतप्रधान कुठेही सोबत घेऊन जात नाहीत, किंवा त्यांना काही कामच उरलेले नाही अशी टीका तेव्हा होत असे. मोदींना जगाच्या व्यासपीठावर मिरवण्याची भयंकर हौस होती व आहे. अमेरिकेपासून जपान, ऑस्ट्रेलियापर्यंत जायचे, तिथे स्थायिक झालेल्या भारतीयांचे मेळावे भरवायचे, त्यात मोदी, मोदी असा गजर करून त्याची प्रसिध्दी करायची ही गेल्या दहा वर्षातली परंपरा राहिलेली आहे. शिवाय, जगातल्या भेटतील त्या नेत्यांना मिठ्या मारायच्या, त्यांचे बोलणे कळो वा ना कळो, मोठमोठ्याने हसायचे हा मोदींच्या खाक्या राहिला आहे. याचे वेळोवेळी प्रसिद्ध होणारे फोटो हाच भारत विश्वगुरु असल्याचा पुरावा होय असे मोदींचे भक्त मानतात व सगळ्या भारतीयांनी त्याच्यावर विश्वास ठेवावा असे दरडावून सांगतात.

### ट्रम्पना इतके का घाबरता?

आता तेच मोदी गेल्या काही काळापासून आंतरराष्ट्रीय दौरे टाळू लागले आहेत. सुषमा स्वराज कमनशिबी ठरल्या. त्या मानाने त्यांचे उत्तराधिकारी जयशंकर अधिक सुदैवी आहेत. आता उद्याच्या आसियान परिषदेलाही जयशंकर हेच जाणार आहेत. मोदी या परिषदेत ऑनलाईन रीतीने सहभागी होणार आहेत. मोदी देशात निवडणुकीची भाषणे करताना बिनदिक्कत खोट्या गोष्टी बोलतात हे आपण पाहिले आहे. पण परराष्ट्रीय संबंधांमध्येही ते ही रीत वापरतात हे आता उघड होऊ लागले आहे. दिवाळीचा सण असल्याने आपण क्वालालंपूरला येऊ शकणार नाही असे मोदींनी कळवल्याचे मलेशियाच्या पंतप्रधानांनी जाहीर केले आहे. वास्तविक दिवाळी तर गुरुवारीच संपली. शिवाय, मोदींच्या कार्यालयाने त्यांच्या न जाण्याचे कोणतेही कारण दिलेले नाही. रविवारी ते बिहारमध्ये निवडणूक प्रचाराला जाणार आहेत. म्हणजेच दिवाळीची सबब पूर्ण खोटी आहे. भारतासारख्या देशाच्या नेत्याचा खोटेपणा अशा रीतीने उघड व्हावा हे लाजिरवाणे आहे. ट्रम्प यांनी आयातशुल्क लादल्यानंतर भारत व अमेरिका यांच्यातले संबंध बिघडायला सुरुवात झाली. वास्तविक मोदी स्वतःला विश्वगुरु मानत असतील तर त्यांनी या प्रश्नी ट्रम्प यांच्यासमोर ठामपणे उभे राहायला हवे होते. ट्रम्प यांच्यापुढे आम्ही झुकणार नाही असे स्पष्टपणे म्हणायला हवे होते. आज भारतावर जगात सर्वाधिक ५० टक्के आयातशुल्क लागू आहे. चीन आणि ब्राझीलवर अशाच प्रकारचे शुल्क लागू करण्याचा प्रयत्न झाला तेव्हा त्या देशांच्या नेत्यांनी ट्रम्प यांना थेट प्रत्युत्तर दिले. चीनने तर जशास तसे कर लागू केले. त्यामुळे अमेरिकेची बोलती बंद झाली. ब्राझीलनेही ट्रम्प यांना काडीचीही किंमत दिलेली नाही. मोदी मात्र ट्रम्प यांच्यापुढे जणू खाली मान घालून उभे आहेत. भारत आणि पाकिस्तान यांच्यातले युध्द बंद करायला आपणच भाग पाडले असे ट्रम्प यांनी आजवर ५३ वेळा सांगितले आहे. पण ५६ इंची छातीचा दावा करणारे मोदी एकदाही ट्रम्प यांना थेट तोंडावर किंवा नाव घेऊन हे खोटे आहे असे सांगू शकलेले नाहीत.

### भारताची नाचक्की

गेल्या आठवड्यात ट्रम्प यांनी नवा दावा केला. आपल्या 'आदेशा'नुसार भारताने रशियाकडून तेल घेणे बंद केले असल्याचे त्यांनी परस्पर जाहीर करून टाकले आहे. भारताने याचा थेट इन्कार केलेला नाही. आपल्या हितानुसार भारत निर्णय करील अशी गुळमुळीत भाषा वापरली आहे. अंबानीची रिलायन्स ही रशियाच्या तेलाची सर्वात मोठी आयातदार आहे. तिच्या जामनगर कारखान्यातच या तेलाचे शुध्दीकरण होते व नंतर ते जगाच्या बाजारात विकले जाते. या व्यवहारात गेल्या तीन वर्षांमध्ये अंबानीना हजारो कोटींचा फायदा झाला आहे. पण आता भारत सरकारच्या निर्देशांनुसार आपण रशियातून तेल आयातीत बदल करीत असल्याचे रिलायन्सच्या प्रवक्ताने रॉयटर्सला सांगितले आहे. याचाच अर्थ ट्रम्प यांच्या दबावामुळे रशियाकडून तेल आयात बंद करण्यासाठी भारत राजी होऊ लागला आहे. याचाच अर्थ पडद्याआड छुप्या गोष्टी चालू आहेत व भारतीय लोक मात्र अंधारात आहेत. मोदी यांची लपवाछपवी लक्षात येऊनच बहुदा ट्रम्प पुन्हा पुन्हा तेच बोलत आहेत. पाकिस्तानचे युद्ध थांबवणे असो की ही तेलावरची बंदी असो, ट्रम्प यांचे तोंड बंद करण्याची हिंमत मोदी का दाखवू शकत नाहीत हा मुख्य प्रश्न आहे. ट्रम्प हा फाटक्या तोंडांचा माणूस आहे. तो वाटेल ते उलटसुलट बोलू शकतो हे खरे आहे. तरीही आपल्याकडे लपवण्यासारखे काही नसेल तर मोदींनी घाबरण्याचे कारण नाही. आता तर ट्रम्प जिथे असतील अशा परिषदांना जाणे त्यांनी बंद करून टाकले आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या पॅलेस्टिनविषयक विशेष बैठकीला मोदी गेले नाहीत. नंतर इस्रायल व पॅलेस्टाईन युद्धबंदीच्या कराराची घोषणा करण्याच्या वेळी इजिप्तमध्ये आयोजित बैठकीलाही मोदींनी दांडी मारली. आता आसियानमध्येही ते जाणार नाहीत. भारत आणि अमेरिका यांच्यात आयातशुल्काबाबत सध्या वाटाघाटी चालू आहेत. त्यामध्ये कदाचित काही तोडगा निघेल. अमेरिका आयातशुल्क कमी करील. पण त्या प्रसंगी ट्रम्प जाहीररीत्या काय बोलतील याचा भरवसा उरलेला नाही. मोदी त्यांना जशास तसे प्रत्युत्तर देत नसल्याने ट्रम्प यांचा धीर आणखी चेपला आहे. परवा तर ते असेही म्हणाले की, मला मोदींची करियर बरबाद करायची नाही. त्यामुळे अदानीचे कोर्ट खटले वगैरेसारख्या काही गुपिते ट्रम्प यांना ठाऊक आहेत की काय असा संशय विनाकारण बळावतो. मोदींचे ठीक आहे. पण भारताच्या प्रतिमेसाठी हे चांगले नाही.

## विचार

# सर्वोच्च न्यायालयाची चिंता

***महिलांच्या छळाचे प्रकार वाढत असताना अशा प्रकारांमध्ये सहभागी नसलेल्यांचा समावेश आरोपीच्या यादीत करण्याचे प्रकारही वाढले आहेत. विशेषतः नवविवाहितांच्या छळाची अनेक प्रकरणे केवळ सूड घेण्याच्या भावनेतून दाखल केली जात आहेत. त्यात पतीच्या नातेवाइकांनाही गोवले जात आहे. सर्वोच्च न्यायालयाने त्याबाबत व्यक्त केलेली चिंता गांभीर्याने न घेतल्यास महिलांच्या संरक्षणाचा हा कायदाच बोथट होण्याचा धोका आहे.***



**शिवाजी कराळे**

शोभित कुमार मित्तल विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य या खटल्यातील वैवाहिक वादावर सुनावणी करताना, भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८अ (आता भारतीय दंड संहितेच्या कलम ८४, २०२३) च्या गैरवापरावर सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा चिंता व्यक्त केली. न्यायालयाने म्हटले आहे, की आजकाल सासू, म्हणजेच मुलाची आई आणि पती खोट्या तक्रारींमुळे त्यांच्या पत्नींपासून खूप सावध असतात. आम्ही अनेक तक्रारी फेटाळून लावल्या आहेत. आम्ही असे म्हणत नाही, की प्रत्येक केस खोटी आहे; परंतु कलम ४९८अ खूप कठोर आहे आणि त्याचा गैरवापर होण्याची शक्यता आहे.

वर नमूद केलेल्या प्रकरणात एका महिलेने तिच्या लग्नाच्या दीड महिन्याच्या आत 'कलम ४९८अ'अंतर्गत दाखल केलेल्या तक्रारीचा समावेश होता. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि आर. महादेवन यांच्या खंडपीठाने या खटल्याची सुनावणी करताना, कुटुंबातील सर्व सदस्यांना वैवाहिक वादात अडकवण्याच्या प्रवृत्तीविरुद्ध इशारा दिला आणि म्हटले की विशिष्ट तपशीलाशिवाय छळाचे केवळ सामान्य आरोप कोणत्याही व्यक्तीविरुद्ध फौजदारी कारवाई सुरू करण्यासाठी पुरेसे नाहीत. याच काळात, पूजा रासने विरुद्ध दिल्ली राज्य आणि इतर या खटल्याची सुनावणी करताना, दिल्ली उच्च न्यायालयाने म्हटले, की भारतीय दंडसंहितेचे कलम ४९८अ महिलांना वैवाहिक क्रूरता आणि हुंड्याच्या छळापासून संरक्षण देण्यासाठी महत्त्वाचे असले, तरी पतीच्या नातेवाईकांविरुद्ध व्यापक आणि निराधार आरोपांद्वारे केला जाणारा त्याचा गैरवापर रोखला पाहिजे. आरोप प्रथमदर्शनी सिद्ध झाले, तरच खटला पुढे चालू ठेवला पाहिजे. असा दृष्टिकोन निष्पाप व्यक्तींना अनावश्यक खटल्यांपासून आणि वैवाहिक वादांमुळे होणाऱ्या त्रास, छळ आणि अपमानापासून संरक्षण देतो.

गेल्या काही वर्षांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८अ च्या गैरवापराबद्दल वारंवार चिंता व्यक्त केली आहे. मे २०२४ मध्ये न्यायमूर्ती जे. बी. पार्डीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने संसदेला भारतीय दंड संहिता, २०२३ च्या कलम ८५ आणि ८६ मध्ये सुधारणा करण्याचा विचार करण्याचे आवाहन केले. खंडपीठाने म्हटले, की या तरतुदी केवळ भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८अ आणि त्याच्या अर्थ लावण्याच्या प्रक्रियेची प्रतिकृती आहेत. २०१० मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती दलवीर भंडारी आणि जे. एस. राधाकृष्णन यांच्या खंडपीठाने सरकारला भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८अ, हुंडाविरोधी कायद्याचा पुनर्विचार करण्याचे आवाहन केले होते. कलम ४९८अ अंतर्गत खोट्या तक्रारींच्या वाढत्या संख्येबद्दल चिंता व्यक्त करताना खंडपीठाने म्हटले, की कलम ४९८अ अंतर्गत प्राप्त होणाऱ्या मोठ्या संख्येने केलेल्या तक्रारी खऱ्या नाहीत आणि त्या गुप्त हेतूने दाखल केल्या जातात. लोकांचे मत विचारात घेऊन कायदेमंडळाने या मुद्द्याकडे लक्ष देण्याची आणि कायद्यात योग्य बदल करण्याची वेळ आली आहे. न्यायालयाने ही प्रक्रिया सुरू करण्यासाठी केंद्रीय कायदा मंत्र्यांना निर्णयाची प्रत पाठवली. महिला मूक, पीडित आणि चुकीचे काम करण्यास असमर्थ असतात, या समजुतीचा न्याय प्रशासनावर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष परिणाम झाला आहे; परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाला १५ वर्षे उलटूनही कलम ४९८अ च्या तरतुदींमध्ये कोणतेही बदल झालेले नाहीत.

दुर्दैवाने गेल्या काही दशकांमध्ये तथाकथित छद्म-स्त्रीवादाची आलेली लाट पुरुष असंवेदनशील, लोभी, निर्दयी आणि क्रूर असतात, या विचारसरणीला बळकटी देत आहे. महिलांचे आरोप अंतिम सत्य म्हणून स्वीकारण्याची मानसिकता पुरुषांना निर्दोष मानण्यास नकार देते. न्यायालयाच्या निकालापूर्वीच त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना दोषी घोषित केले जाते. या खोट्या आरोपांची खरी समस्या अशी आहे, की न्यायालयाचा निकाल येईपर्यंत पुरुषांना आणि त्याच्या कुटुंबियांनाच आरोपी मानले जाते. विशेषतः या वेगवान जगात इंटरनेटद्वारे समाजात असे आरोप पटकन पसरतात.

१९७० आणि १९८० च्या दशकात हुंड्यासाठी छळ आणि इतर प्रकरणांमध्ये लक्षणीय वाढ झाली. याला आळा घालण्यासाठी १९८३ मध्ये भारतीय दंड संहितेत कलम ४९८अ जोडण्यात आले. त्यामुळे विवाहित महिलेविरुद्ध पती किंवा त्याच्या कुटुंबाकडून होणारी क्रूरता हा दखलपात्र गुन्हा ठरला, ज्यामध्ये शिक्षेची तरतूद करण्यात आली. नंतर या कायद्याचा इतका गैरवापर झाला, की निष्पाप लोकांना तुरुंगवास होऊ लागला. हा दखलपात्र गुन्हा असल्याने पोलिसांना तक्रारीच्या आधारे अटक करण्याचा अधिकार मिळाला. पतीव्यतिरिक्त, सासू, सासरे, मेहुणे, मेहुणी इत्यादींना अटक होऊ लागली. दूरच्या शहरांमध्ये राहणारे लोक, अगदी परदेशात राहणारे नातेवाईकदेखील आरोपी झाले आणि त्यांना अटक करण्यात आली. या कायद्याच्या गैरवापराच्या तक्रारी वाढल्या, तेव्हा न्यायालयाने हस्तक्षेप केला.

या संदर्भात, २२ जुलै रोजी शिवांगी बन्सल प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय महत्त्वाचा आहे. २०२२ मध्ये मुकेश बन्सल विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य प्रकरणात अलाहाबाद उच्च न्यायालयाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे सर्वोच्च न्यायालयाने समर्थन केले. उच्च न्यायालयाने हुंडा छळाच्या प्रकरणांमध्ये पोलिस तात्काळ अटक करणार नाहीत, तसेच दोन महिन्यांचा कूलिंग-ऑफ कालावधी असेल, ज्या दरम्यान तोडगा काढता येईल आणि पोलिस आरोपांची पडताळणी करू शकतील, असे म्हटले. हे लक्षात घेण्यासारखे आहे, की हा निर्णय अचानक आलेला नाही. अशा अनेक प्रकरणांमध्ये, न्यायालये कायद्याचा गैरवापर लक्षात घेऊन तरतुदी देत आहेत. २०१४ मध्ये, अर्नेशकुमार विरुद्ध बिहार प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते, की अशी तक्रार मिळाल्यावर, पोलिस आरोपीला ताबडतोब अटक करणार नाहीत; परंतु प्रथम फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४१(१)(बी)(२) अंतर्गत अटक आवश्यक आहे याची खात्री करून घेतली जाईल. यासाठी कारणे आणि पुरावे द्यावे लागतील. या पुराव्यासह एक चेकलिस्ट न्यायिक दंडाधिकाऱ्यांना सादर करावी लागेल. राजेश शर्मा विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने जिल्हा पातळीवर कुटुंब कल्याण समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले. समितीकडे तक्रारी पाठवल्या जातील आणि त्यांच्या अहवालाशिवाय कोणालाही अटक केली जाणार नाही असे म्हटले होते. तथापि, २०१८ मध्ये, 'सोशल ॲक्शन फोरम फॉर ह्युमन राइट्स' विरुद्ध 'युनियन ऑफ इंडिया' या प्रकरणात, सर्वोच्च न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने सर्व प्रकरणे समितीकडे पाठवण्याचा आदेश मागे घेतला.

त्या वेळी न्यायालयाने म्हटले, की ते कायदेविषयक कामे हिसकावू शकत नाहीत; परंतु पोलिसांनी या प्रकरणांमध्ये सावधगिरी बाळगली पाहिजे. २०१४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने एका निकालात स्पष्टपणे म्हटले की पती आणि त्याच्या इतर नातेवाईकांविरुद्ध अस्पष्ट आणि सामान्य आरोपांवर आधारित खटला दाखल केला जाऊ शकत नाही. त्यासाठी ठोस पुराव्यांसह विशिष्ट आरोपांची आवश्यकता आहे. सर्वोच्च न्यायालयाने असेही म्हटले होते, की न्यायालयांनी वैयक्तिक द्वेषाचा फायदा घेण्यासाठी किंवा निष्पाप नातेवाईकांना त्रास देण्यासाठी कायद्याचा गैरवापर केला जाणार नाही, याची खात्री करावी. एखाद्या दंडाधिकाऱ्याने अटकेचे कारण न नोंदवता न्यायालयीन कोठडी वाढवल्यास त्याच्याविरुद्ध विभागीय कारवाई करावी. न्यायालयाची चिंता वैध आहे; परंतु या निर्णयात अनेक विरोधाभासही आहेत.

उच्च न्यायालय आणि कनिष्ठ न्यायालयांनादेखील अनेकदा गोंधळाचा सामना करावा लागतो, कारण न्यायालयाचे निर्णय अनेकदा एकमेकांच्या विरोधात असतात. कोणत्याही कायद्याचा गैरवापर रोखणे आवश्यक आहे. यासाठी, खोटे खटले दाखल करणाऱ्यांवर खटला चालवला पाहिजे आणि शिक्षा झाली पाहिजे. विडंबन म्हणजे, महिलांच्या संरक्षणासाठी बनवलेल्या कायद्याला बहुतेकदा महिलांच बळी पडतात.

प्रत्येक प्रकरणात दोन महिन्यांचा कूलिंग-ऑफ कालावधी योग्य आहे का, हेदेखील विचारात घेण्यासारखे आहे. हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की प्रत्येक आरोप खोटा नसतो. जिथे खरा छळ होत असेल, तिथे दोन महिन्यांचा कालावधी देणे पीडितेच्या अधिकाराविरुद्ध जाऊ शकते.

# बळीराजा निसर्गापुढे भिकारी!

**राकेश लोहार**

रुढी-परंपरेनुसार शेतकऱ्याला बळीराजा संबोधले जाते. आजही ईडा-पिडा टळो, बळीचं राज्य येवो, असे म्हणतात. पण, या बळीराजाची ईडा-पिडा टळली नसावी. म्हणूनच की काय, परतीच्या पावसाने बळीराजाचे कंबरडेच मोडले आहे. पावसामुळे उभी पिकं शेतातच आडवी झालीत, त्यामुळे हातातोंडाशी आलेला घास जणू निसर्गाने हिरावून घेतल्याप्रमाणे परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकरी निसर्गाच्या संकटांपुढे तोंड देता देता आता मात्र गलितगात्र होऊन पडला आहे. पुरता कोसळला आहे.

शेतकऱ्याला सर्वांचा अन्नदाता म्हणून प्रजेने 'राजा' बनवलं खरं; पण सद्यःस्थितीचा विचार करता या शेतकरी राजा भिकारी अशी अवस्था त्याची निसर्गाने बनवून ठेवली आहे. आज काळाच्या ओघात या अन्नदात्याची फरफट झाली आहे, म्हणूनच विकणाऱ्याच्या हाती सत्ता आणि पिकवणारा भिकारी आहे, अशी स्थिती आहे. ओला असो वा सुका दुष्काळ, यामध्ये कायमच शेतकरी भरडला आहे. अशी परिस्थिती असताना शेतकरी राजा मात्र नेहमीच सर्वांच्या नजरेआड राहिला आहे. शेतकऱ्यांसमोर येणारा प्रत्येक दिवस नवीन प्रश्न घेऊन उगवतो आणि मावळणारा प्रत्येक दिवस नवीन प्रश्न घेऊन उभा असतो. संसाराचा, लेकराबाळांचा, गुराढोरांचा गाडा रेटायचा कसा? माणसं, जनावरं जगवायची कशी? असे बरेच प्रश्न उभे राहताना अनेक अस्मानी, सुलतानी संकटांचा सामना करावा लागतो. सद्यःस्थिती काहीच वेगळी नाही.

शेतामध्ये जे काही पेरतो, ते उगवत नाही, जे उगवतं ते पिकत नाही, जे पिकतं ते टिकत नाही आणि जे टिकतं ते विकत नाही. शेतकऱ्यांचं आयुष्य म्हणजे जुगार झाला आहे. आयुष्याचे काही पत्ते हे निसर्गाच्या हातात तर, काही बाजाराच्या हातात अशी अवस्था असताना शेतकऱ्यांच्या हातात काय? हा प्रश्न मात्र अनुत्तरीतच आहे. शेतकरी निसर्गाशी दोन हात करीत लढत राहिला असून, जिद्दीने पुनः पुन्हा उभे राहण्याचा प्रयत्न करतोय. पण, त्याला सरकारची तेवढी साथ लाभत नसल्याने आजही त्याची अवस्था केविलवाणी आहे. परतीच्या पावसामुळे अख्ख्या महाराष्ट्रावर ओल्या दुष्काळाचे संकट आहे. त्यातही न खचता शेतकऱ्याची वाटचाल सुरू आहे. शेतकऱ्यांचे जगणं दुष्काळाच्या विळख्यात सापडले आहे. म्हणूनच मागील दोन दशकात हजारो शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ आली आहे. का शेतकरी एवढे दैन्यावस्थेत आहेत, जीवन संपवण्याची वेळ त्यांच्यावर का येत आहे, याचा नीट विचार आमचे धोरणकर्ते, राज्यकर्ते, मंत्री का करत नाहीत?

आजमितीला शेती व शेतकरी संकटांच्या खाईत अडकलेले आहेत. शेतीमालाला योग्य हमीभाव नाही, शेतकऱ्याच्या मालासाठी बाजारपेठ व बाजारपेठेतील चढ-उतार पाहून बाजारमाल साठवणुकीसाठी शासनाकडून आर्थिक पाठबळ नाही. शेतीसाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा नाहीत. पुढाऱ्यांचे दुष्काळी दौरे, अधिकाऱ्यांच्या कागदोपत्री पाहण्या, हे असेच किती दिवस चालणार? अशी परिस्थिती बदलणार आहे का? सगळे काही मागच्या पानावरुन पुढे चालू आहे, जसेच्या तसे.

बऱ्याचदा वजाबाकीचे गणित न सुटल्याने बळीराजा बलिदान देतो, पण परत बलिदानाचे कारण स्पष्ट न होता, सरकारी दरबारात त्याचंच राजकारण होते. काळ बदलतोय, पण शेतकऱ्यांच्या पाचवीला पुजलेला दुष्काळ काही हटत नाही, हेच खरे वास्तव असून, ते नजरेआड करताच येणार नाही. पण, सरकार आणि त्यांचे अधिकारी वेळ मारुन नेत आहेत. आज जेव्हा एखाद्या नैसर्गिक आपत्तीत शेतकरी कोसळतो, तेव्हा लढायला उभे राहायला त्याच्याकडे त्राण शिल्लक राहात नाहीत. संकटाबरोबर लढायला, दोन हात तो करणार कसे?

आमचा हा राजा शेतातच नावापुरता राजा म्हणून जगतो. पण, बाजारात गेलं की त्याला गुलाम बनवलं जातंय. याला कारणीभूत आहे, शेतमालाचे भाव पाडण्याचे सरकारी धोरण. आज जगातील कोणताही उत्पादक घ्या, जो आपल्या मालाचा भाव स्वतः ठरवतो. देवळात पूजा मांडणारा भटजी, भाजी विकणारा, पोती उचलणारा, शिवणकाम करणारा, कोणताही व्यापारी, दलाल आपल्या श्रमाचा मोबदला किती घ्यायचा, ते स्वतः ठरवतात. मग, शेतकऱ्याला तो अधिकार का नाही? जगाचा अन्नदाता असणारा कष्टकरी-कामकरी-शेतकरी स्वतःच्या उत्पादित मालाचा दर का ठरवू शकत नाही. त्याच्या मालाचा दर ठरवण्याचा अधिकार व्यापाऱ्यांना कोणी दिला? अशा प्रश्नांच्या गर्तेत बळीराजा पूर्णतः गोंधळून पडला आहे. आज जर देशातील शेतकरी सुखी असता, तर जगातील सर्वांत श्रीमंत भारत देश असता. कारण, आपणच म्हणतो ना, आपला देश कृषीप्रधान आहे. पण, दुर्दैवाने अशी परिस्थिती आपल्या देशात नाही.

## लोकसंसद

### विद्युत रोषणाईमुळे वृक्षसंपदेला बाधा

एकीकडे पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन व्हावे, वाढत्या प्रदूषणाला आळा बसावा आणि काँक्रीटच्या जंगलात अधिक झाडांमुळे हरितपट्ट्याचा विकास व्हावा या उद्देशाने मुंबईत द्रुतगतीने वाढणाऱ्या जपानी पद्धतीच्या मियावाकी वनांसारखे प्रयोग करण्यात येत आहेत.



मुंबईत त्यामुळे काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात हिरवळही निर्माण झाली आहे. असे असताना काही विकृत महाभाग मात्र मुंबईत ५०-६० वर्षे अस्तित्वात असलेल्या झाडांवर खिळे ठोकून फलक, भित्तिपत्रके व जाहिराती लावणे, तारा गुंडाळणे, केबल टाकणे, विद्युत रोषणाई करणे, फोकस लावणे, धागे गुंडाळणे, बुंध्यावर नावे कोरणे यांसारखी झाडांना इजा पोहोचविणारी व मरणयातना देणारी कृत्ये करत आहेत. झाडांना खिळे ठोकल्याने विविध रोगाची लागण होते. झाडांची खोडे पोखरली जाऊन झाड हळूहळू मृतवत होते. झाडांवर विद्युत रोषणाई केल्यामुळे व फोकस लावल्यामुळे झाडांच्या प्रकाश संश्लेषण या जैवरासायनिक प्रक्रियेत अडथळा निर्माण होतो. या दिवाळीत तर मुंबईत झाडांवरील रोषणाईमुळे रात्रीच्या वेळी झाडेच दिसत नव्हती. झाडावरील अत्याचारांचे हे प्रकार मुंबईपुरते मर्यादित नसून राज्यभरातील सर्व शहरात दिसून येतात. पर्यावरण रक्षणासाठी 'झाडे लावा, झाडे जगवा, वनसंपदेचे संवर्धन करा,' असे संदेश वेळोवेळी देणाऱ्या प्रशासनाने वृक्षांवर खिळे ठोकून विद्युत रोषणाई करून पर्यावरणास बाधा आणणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करणे गरजेचे आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## दिनविशेष

# आंतरराष्ट्रीय कलाकार दिन

दरवर्षी २५ ऑक्टोबर रोजी साजरा केला जाणारा आंतरराष्ट्रीय कलाकार दिन हा कलाकारांचे कौतुक करण्यासाठी आणि समाजासाठी त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाची ओळख पटविण्यासाठी समर्पित एक विशेष प्रसंग आहे. हा दिवस आपल्या जीवनात कलेच्या महत्त्वाची आणि संस्कृती आणि पार्श्वभूमीतील लोकांना जोडण्यासाठी तिच्या सर्जनशील शक्तीची आठवण करून देतो. चित्रकार आणि शिल्पकारांपासून ते संगीतकार, नर्तक, छायाचित्रकार आणि चित्रपट निर्मात्यांपर्यंत सर्व प्रकारच्या कलाकारांचा सन्मान करण्याचा हा दिवस आहे, त्यांनी जगासमोर आणलेल्या सौंदर्य, प्रेरणा आणि टीकात्मक दृष्टिकोनाची कदर करण्याचा हा दिवस आहे. या दिवसाच्या माध्यमातून चित्रकला, शिल्पकला, नृत्य, संगीत, साहित्य आणि इतर कलाप्रकारांतील कलाकारांचे कौतुक करण्यात येते, कारण त्यांच्या कलाकृतींमुळे समाजात सौंदर्य, संस्कृती आणि विचारशक्तीला चालना मिळते.

कलाकार त्यांच्या अनोख्या दृष्टिकोनातून समाजातील विविध समस्यांवर प्रकाश टाकतात आणि लोकांना प्रेरित करतात. कला ही व्यक्त होण्याचे शक्तिशाली साधन आहे, जी सांस्कृतिक वारसा जपण्यासोबतच बदल घडवून आणण्यासाठी देखील वापरली जाते. या दिवशी, कलाविश्वातील विविध उपक्रम राबवले जातात, जसे की कला प्रदर्शनं, कार्यशाळा, आणि चर्चासत्रं, ज्यामध्ये नवोदित आणि अनुभवी कलाकारांना त्यांची कला सादर करण्याची संधी मिळते. आंतरराष्ट्रीय कलाकार दिन हे कलाकारांच्या सृजनशीलतेचा उत्सव असून, त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी आणि समाजातील कलात्मकतेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी साजरा केला जातो.

'रोमँटिक रिॲलिझम' शैलीसाठी ओळखले जाणारे कॅनेडियन चित्रकार क्रिस मॅकक्लूर यांनी स्थापन केलेल्या आंतरराष्ट्रीय कलाकार दिनाचा उद्देश लोकांना कलाकारांना पाठिंबा देण्यासाठी आणि समाजाला आकार देण्यासाठी कला प्रदान करते त्या भावनिक आणि बौद्धिक मूल्याची जाणीव करून देण्यासाठी आहे. जगभरात साजरा केला जाणारा हा दिवस कलाकार आणि कलाप्रेमींसाठी खूप महत्त्वाचा आहे. कला मानवी अनुभवांना आकर्षित करते, भावना, मूल्ये आणि सांस्कृतिक ओळख व्यक्त करते जी नेहमीच शब्दांद्वारे व्यक्त करता येत नाहीत. हा दिवस विविधतेला प्रोत्साहन देण्यास, सहानुभूती निर्माण करण्यास आणि सर्जनशीलतेला चालना देण्यास कलाची भूमिका अधोरेखित करतो, जी अधिक परस्परसंबंधित आणि समृद्ध जगाला हातभार लावते. कलाकार, मग ते प्रसिद्ध असोत किंवा उदयोन्मुख, समाजावर अमिट छाप सोडतात, बदल घडवून आणतात आणि मानवी स्वभाव आणि आपल्या सभोवतालच्या जगाबद्दल अंतर्दृष्टी देतात. कला ही आत्म-अभिव्यक्ती, मानसिक आरोग्य आणि उपचारांसाठी एक शक्तिशाली साधन असू शकते, भावनिक कल्याण आणि समुदाय उभारणीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. कला ही एक वैश्विक भाषा आहे जी सीमा ओलांडते आणि सहानुभूती वाढवते. ती लोकांना त्यांचे विचार आणि भावना अशा प्रकारे व्यक्त करण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करते जे शब्द पकडू शकत नाहीत. कला संस्कृती, इतिहास आणि सामाजिक मूल्ये प्रतिबिंबित करते आणि ती दृष्टिकोनांना आव्हान देते, नवोपक्रमाला प्रोत्साहन देते आणि बदलाला प्रेरणा देते. कलेच्या दृष्टीकोनातून, आपल्याला मानवी अनुभवाची अंतर्दृष्टी मिळते, ज्यामुळे आपल्याला विविध दृष्टिकोनातून जग पाहता येते. या कारणांमुळे, आंतरराष्ट्रीय कलाकार दिन केवळ एक उत्सव म्हणून काम करत नाही तर सर्व प्रकारच्या कलांना समर्थन आणि मूल्य देण्याची आठवण करून देतो.

आंतरराष्ट्रीय कलाकार दिन हा कलाकारांचा आणि जगावर त्यांचा खोलवर होणारा प्रभाव साजरा करण्याचा काळ आहे. कला सौंदर्य आणून, संभाषणांना चालना देऊन आणि मानवी अनुभवांना परिभाषित करणारे क्षण टिपून जीवन वाढवते. तुम्ही कलाकार असाल, कलाप्रेमी असाल किंवा फक्त सर्जनशीलतेची प्रशंसा करणारे असाल. आंतरराष्ट्रीय कलाकार दिन म्हणजे दररोज आपले जीवन समृद्ध करणाऱ्या कलाकारांचा सन्मान करण्याची आणि त्यांना पाठिंबा देण्याची संधी आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२५ ऑक्टोबर

१) श्री. रवींद्र गंगाराम पाटील
पोयनाड, अलिबाग,
२५-१०-१९४९

२) श्रीम. संगीता सुरेश पालवणकर
रामनाथ, अलिबाग,
२५-१०-१९५३

३) श्री. चंद्रकांत शंकर ठाकूर
अलिबाग, २५-१०-१९५८

४) श्री. श्रीकांत सदानंद पाटील
अलिबाग, २५-१०-१९६०

## प्रमोद कदम यांचे निधन

**माथेरान :** श्रीराम प्रासादिक भजन मंडळ, क्षत्रिय मराठा समाज माथेरानचे सदस्य प्रमोद प्रभाकर कदम (३४) यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी (दि.२४) निधन झाले.



त्यांच्या अंत्ययात्रेत राजकीय सामाजिक क्षेत्रातील मंडळीसह त्यांचा मित्र परिवार मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. अत्यंत शोकाकुल वातावरणात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## मालाडमधील इमारतीला आग

**मुंबई:** मालाड (पश्चिम) येथील लिंक रोडवरील फोर डायमेंशन या इमारतीत गुरुवारी (दि.२३) मध्यरात्री आग लागली. इमारतीच्या पाचव्या मजल्यावरील कॉल सेंटर युनिटमध्ये आग लागली होती. यात कॉल सेंटर युनिटमधील विद्युत वाहिन्या, विद्युत यंत्रणा, लाकडी फर्निचर, पार्टिशन, फॉल्स सीलिंग, संगणक व सर्व्हर रूममधील साहित्य जळून खाक झाले. अग्निशमन दलाच्या सात अग्निशामक गाड्या, रुग्णवाहिका, पाण्याचे ट्रँकर, तसेच वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले होते. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

# लाखोंचे अमली पदार्थ जप्त

## • एपीएमसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल; एका युवकाला अटक

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

नवी मुंबईतील एपीएमसी पोलीस ठाणे हद्दीत गस्ती पोलिसांनी एका युवकाला अटक केली आहे. त्याच्याकडून २ लाख ८० हजार रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई अमली पदार्थ विरोधी पथकाने केली असून या प्रकरणी एपीएमसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रमजान इमाम शेख (२५) असे अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपीचे नाव तो तुर्भे इंदिरानगर येथे राहतो.



बुधवारी (दि.२२) रात्री ११च्या सुमारास अंमली पदार्थ टास्क फोर्सचे गस्ती पथक एपीएमसी पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत होते. त्यावेळी तुर्भे सेक्टर १९ पामबीच लगत असणाऱ्या महापारेशन कार्यालय समोर रमजान त्यांना दिसून आला. त्याच्या हालचाली संशयित वाटल्याने गस्त पथकाने त्याला हटकले असता तो घाबरला. मात्र उसने अवसान आणून उडवा उडवीची उत्तरे देत होता. मात्र त्याच्या बोलण्यात विसंगती आल्याने पोलिसांनी त्याला पकडून एपीएमसी पोलीस ठाण्यात आणले. त्या ठिकाणी त्याची अंग झडती घेतली असता. त्याच्या कडे पांढऱ्या रंगाची भुकटी आढळून आली. त्याची तपासणी केली असता एमडी हा अंमली पदार्थ असल्याचे समोर आले. रमजाननेही ती भूकटी एमडी असल्याची कबुली दिली.

बंदी असणारा एमडी हा अमली पदार्थ आढळून आल्याने त्याच्या विरोधात गुन्हा नोंद करीत रमजान याला तात्काळ अटक करण्यात आली. त्याच्याकडे २८ ग्रॅम वजनाचा २ लाख ८० किमतीचा एमडी हा अंमली पदार्थ, ४ हजार रुपयांचा मोबाईल, ५ हजार ७१० रुपयांची रोकड, असा एकूण २ लाख ८९ हजार ७१० रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. रमजानने हा अंमली पदार्थ कोठून आणि कोणासाठी आणला याची चौकशी सुरु आहे. अशी माहिती पोलिसांनी दिली.

ज्या भागात रमजान पकडला गेला तो भाग एपीएमसी मार्केट एरिया म्हणून ओळखला जातो. आशियातील सर्वात मोठी कृषी उत्पन्न बाजार समिती म्हणून त्याचा नाव लौकिक आहे. या ठिकाणी राज्यसोबतच देशातील कानाकोपऱ्यातून कृषी उत्पन्न मालाची आवक जावक होत असते. त्यामुळे अंमली पदार्थ, राज्य सरकारने बंदी घातलेला गुटखा, याची तस्करी मोठ्या प्रमाणावर होत असते. तसेच एमडी हा पदार्थ उच्चभ्रू लोकांचीही पसंती असल्याचे अनेक कारवाईत समोर आलेले आहे. त्यात एपीएमसी पोलीस ठाणे हद्दीत मोठ्या प्रमाणावर बेकायदा हुक्का पार्लर, पब आहेत. अधूनमधून यावर कारवाई होते. मात्र काही दिवसात ते पुन्हा सुरु होतात. एमडीसारख्या अंमली पदार्थांना अशा ठिकाणी ग्राहक मिळत असल्याचा संशय पोलिसांनी अनेकदा व्यक्त केला आहे. अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सने गुरुवारी केलेल्या एका कारवाई २ लाख ८० हजार रुपयांचा एमडी हा अंमली पदार्थ जप्त करीत एकाला अटक केल्याने पोलिसांच्या संशयाला पुष्टी मिळाली आहे.

## अग्निशमन दलाने दिले २७ जणांना जीवदान

**| मुंबई | प्रतिनिधी |**

जोगेश्वरी पश्चिमच्या एसव्ही रोड, बेहराम बाग, गांधी हायस्कूलजवळ ङ्गजेएमएसफ ही ग्राऊंड प्लस १३ मजली इमारत आहे. या इमारतीमध्ये मोठ्या प्रमाणात व्यावसायिक कार्यालये आहेत. काचेने आच्छादीत असलेल्या या इमारतीमध्ये गुरुवारी सकाळी १०.५१ च्या सुमारास आग लागली. या ठिकाणचे लाकडी सामान, वायरिंग, कॉम्प्युटर आणि इतर इलेक्ट्रिक साहित्य, सामानामुळे काही क्षणातच आग भडकली. आगीचे लोळ आणि धूर ९ ते १२व्या मजल्यापर्यंत पसरले. आगीत अडकलेल्या लोकांना धुराचा त्रास झाला. या वेळी अग्निशमन दलाने अत्यंत वेगाने कामगिरी करीत आगीत



अडकलेल्या २७ जणांची सुटका केली. यातील १७ जणांना धुराचा त्रास झाला. त्यांना उपचारासाठी जोगेश्वरीच्या ट्रॉमा केअर सेंटरमध्ये दाखल करण्यात आले असल्याची माहिती पालिकेच्या आपत्कालीन विभागाकडून देण्यात आली.

## ‘एक पणती पूरग्रस्तांसाठी’ उपक्रम

### मुंबई मराठी पत्रकार संघाचा पुढाकार

**| मुंबई | प्रतिनिधी |**

अवघा देश दिवाळी साजरी करीत असताना मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील पूरग्रस्तांच्या घरी ऐन दिवाळीत अंधार दाटला आहे. हा अंधार दूर करण्यासाठी ‘एक पणती पूरग्रस्तांसाठी’ हा अभिनव उपक्रम मुंबई मराठी पत्रकार संघाच्या पुढाकाराने येत्या ३१ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला आहे.

या उपक्रमात अनेक सामाजिक संस्थांनी आपला सहभाग नोंदिवला आहे. यात विहंग प्रतिष्ठान, मुंबई मराठी पत्रकार संघ, श्री संत गाडगे महाराज धर्मशाळा ट्रस्ट, जीएसबी देवालय ट्रस्ट, पल्लवी फाऊंडेशन आणि बालमोहन विद्यार्थी उत्कर्ष पालक समिती या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबिविला जाणार आहे. या उपक्रमासाठी योगदान म्हणून मुंबई मराठी पत्रकार संघाने यंदाच्या दिवळी अंक विक्रीतील सर्व नफाही पुरग्रस्तांच्या मदतीसाठी दिला आहे, अशी माहीती पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी दिली.

या सामाजिक उपक्रमासाठी मुंबई मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष प्रसाद मोकाशी यांच्या नेतृत्वाखील विशेष समीती गठीत करण्यात आली आहे. यात हेमंत सामंत, राजेंद्र साळसकर यांचा समावेश आहे अशी माहिती कार्यवाह शैलेंद्र शिर्के यांनी दिली.

पुरग्रस्तांच्या मदतीसाठी येत्या शुक्रवारी ३१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सात वाजता झी मराठी वाहिनीवरील सारेगमप कार्यक्रमाद्वारे लोकप्रिय झालेला गायक मंगेश बोरगावकर यांच्या गीतांचा नजराणा दिवाळी संध्या म्हणून आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाद्वारे जमा होणारा निधी हा पूरग्रस्त भागातील शाळा उभारण्यासाठी तसेच काही घरांच्या पुनर्निर्माणासाठी वापरण्यात येणार आहे.

तरी रसिकांनी या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाची तिकीटे बुक माय शो तसेच शिवाजी मंदिर येथे उपलब्ध आहेत.

## कर्जतमध्ये रायगड किल्ला चित्र प्रदर्शन

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत येथील छत्रपती शिवाजी महाराज मंडळ यांच्या माध्यमातून रांगोळी प्रदर्शन दरवर्षी भरवण्यात येते. यावर्षी रांगोळी प्रदर्शनाबरोबर रायगड किल्ला चित्र प्रदर्शन आणि व्यंगचित्र प्रदर्शन भरवण्यात आले आहे. या प्रदर्शनाला कर्जत शहरातील नागरिक तसेच विद्यार्थ्यांनी गर्दी केली.



छत्रपती शिवाजी मंडळ दरवर्षी दिवाळी सणात रांगोळी प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. यावर्षी सुंदर रेखीव रांगोळ्यांचे प्रदर्शन मंडळाने भरवले आहे. या रांगोळी प्रदर्शनात कर्जतमधील मातब्बर कलाकारांनी सहभाग घेतला होता. ज्यात एकूण २२ रांगोळ्यांचा सामावेश आहे. प्रेमानंद महाराज, संभाजी भिडे, सलमान खान, दिलीप प्रभावळकर तसेच अनेक विषयावरील सुंदर रांगोळ्या नेत्रदीपक आहेत. तसेच यावर्षी रांगोळी प्रदर्शनाबरोबरच खास आकर्षण म्हणून किल्ले रायगड चित्र व पुरातन वस्तू प्रदर्शन भरवण्यात आले आहे.

शिवशंभो युवा हायकर्स, कर्जततर्फे रायगड किल्ल्याच्या विविध अंगाने काढलेल्या फोटोचे प्रदर्शन तसेच संस्थेने आत्तापर्यंत

### • विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

केलेल्या सर्व मोहिमांचे व शिबिरांच्या फोटोचे प्रदर्शन यात समाविष्ट आहे. शिवप्रेमी शैलेश सातपुते यांना सापडलेल्या रायगड किल्ल्यावरील काही दुर्मिळ वस्तूंचेही छोटेसे प्रदर्शनी भरवण्यात आलेले आहे. विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाची जाणीव होऊन साहस निर्माण व्हावे, हा या प्रदर्शनाचा हेतू आहे. याच प्रदर्शनासोबत व्यंगचित्रकार विशाल सुरावकर यांच्या खुमासदार व्यंगचित्रांचे प्रदर्शनही भरवण्यात आलेले आहेत.

## तिलारीत आढळली रक्ताने माखलेली कार

**| सिंधुदुर्ग | प्रतिनिधी |**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्गमधील तिलारी येथील मुख्य वसाहती जवळील पुलाच्या बाजूला एक कार रक्ताने माखलेल्या अवस्थेत आढळली. हा प्रकार गुरुवारी (दि.२३) सकाळच्या सुमारास समोर आला. या प्रकारमुळे दोडामार्ग तालुक्यात खळबळ उडाली आहे. सदर कारची नंबर प्लेट गायब असल्याने अपघात की घातपात? याबाबत तर्कवितर्क सुरू झाले आहेत.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यात तिलारी कोनाळकट्टा मुख्य धरणाच्या पुच्छ कालव्यावरील पुलाखाली सकाळी काही नागरिकांना एक संशयास्पद कार दिसली. ही कार झाडीत अर्धवट चिखलात रुतली होती. त्यांनी जवळ जाऊन पाहिल्यानंतर वाहनाच्या आतील भागात आणि आसपासच्या परिसरात मोठ्या प्रमाणात रक्ताचे डाग दिसून आले. त्यांनी तात्काळ याबाबत पोलिसांना माहिती दिली असता दोडामार्ग पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी वाहनाचा पंचनामा करून तपास सुरू केला आहे. मात्र, कारची नंबर प्लेट गायब असल्याने वाहन नेमके कोणाचे आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. तसेच, आत कोणीही व्यक्ती आढळली नाही. याबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## प्रेयसीवर हल्ला करत तरुणाची आत्महत्या

**| मुंबई | प्रतिनिधी |**

मुंबईच्या काळाचौकी परिसरात एका तरुणाने आपल्या प्रेयसीवर जीवघेणा हल्ला केला.नंतर, त्याच शस्त्राने स्वतःलाही मारून घेत आयुष्य संपवले. सोनू बरई असे मृत तरुणाचे नाव आहे. तर मनीषा यादव असे जखमी महिलेचे नाव असून तिला तातडीने रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोनू बरई आणि मनीषा यादव यांच्यात प्रेमसंबंध होते. मात्र, मृत तरुण सोनू हा मनीषावर वारंवार संशय घेत होता. याच संशयावरून आठ दिवसांपूर्वी दोघांमध्ये मोठा वाद झाला होता आणि या वादानंतर त्यांचे ब्रेकअप झाले होते. ब्रेकअप झाल्यानंतर सोनू बरईने मनीषा यादवला शेवटच्या भेटीसाठी एका नर्सिंग होमजवळ बोलावले होते. या भेटीदरम्यान दोघांमध्ये पुन्हा वाद झाला. यावेळी रागत सोनूने मनीषावर धारदार शस्त्राने वार केले. त्यानंतर त्याच शस्त्राने तरुणाने स्वतःलाही मारून घेत आयुष्य संपवले.

## उपचाराअभावी बालकाचा मृत्यू

**| पालघर | प्रतिनिधी |**

पालघर जिल्ह्याच्या दुर्गम भागात असलेल्या मोखाडा ग्रामीण रुग्णालयातील ढिसाळ आरोग्यव्यवस्था पुन्हा एकदा समोर आली आहे. या रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीत झालेल्या महिलेच्या प्रसूतीदरम्यान नवजात बालकाचा उपचाराअभावी मृत्यू झाला. या घटनेची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी नातेवाईकांनी केली आहे.




खोडाळा येथे राहणाऱ्या वैशाली बात्रे या महिलेला प्रसूतीसाठी बुधवारी (दि.२२) सकाळी १० वाजता मोखाडा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले होते. रात्री १०च्या सुमारास तिची प्रसूती झाली. मात्र काही वेळातच बाळ दगावले. १२ तासांत जी काळजी घेणे आवश्यक होती ती घेतली गेली नाही. प्रसूती दरम्यान ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरच हजर नव्हते. फक्त एक परिचारिका होती. बाळाला केवळ दोनच नाळ होत्या. त्याची वारही सुस्थितीत नव्हती. सोनोग्राफीत हा प्रकार दिसून आला. वैद्यकीय सल्ल्याअभावी आणि तज्ज्ञ डॉक्टर अनुपस्थित असल्याने प्रसूतीदरम्यान नवजात बालकाचा मृत्यू झाल्याचा आरोप वैशाली हिच्या पतीने केला आहे.

संतापजनक बाब म्हणजे प्रसूतीनंतर मृत बालक आणि माता यांना पुन्हा खोडाळा प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठवण्यात आले. त्यामुळे वैद्यकीय यंत्रणेच्या निष्काळजीपणा आणि रुग्णालयाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

**प्रवाशांच्या सेवेसाठी पहिले पाऊल | सावलीसाठी निवारा शेड बनविण्याची गरज**

# पाच वर्षानंतर खोराबंदराची पार्किंग सुरु

**| मुरुड-जंजिरा | प्रतिनिधी |**

मुरुड जंजिरा येथील खोराबंदर परिसर कोकणातील सर्वात सुंदर ठिकाण आहे. एकदरा डोंगरापलीकडे समुद्राच्या कुशीत वसलेले समोर प्रसिद्ध जंजिरा किल्ला, उजव्या बाजूस शिवरायांनी बांधलेले पद्मदुर्ग किल्ला व अगदी समोर दिघी प्रकल्प व डोंगरी गावच्या काळ्या दगडाच्या डोंगराखाली सुंदर पांढऱ्या वाळूत वसलेला खोराबंदर पर्यटकांना खूप आवडते. परंतु, या परिसरात खऱ्या अर्थाने विकास झालाच नाही. नवीन जेट्टी प्रवाशांच्या सेवेसाठी हे पहिले पाऊल आहे. कपारीत वसलेल्या काळकाई आईच्या



(छायाचित्र : सुधीर नाझरे)

मंदिराखाली किनारा पर्यटकांना बोटींसाठी अतिशय सुंदर आहे. स्कुबा डायविंगसाठी समुद्राचे पाणी निळेशार व नितळ आहे. खोरा बंदर ते राजपुरी समुद्रालगत दगडावरून रस्ता काढला तर जगातील सुंदर सनसेट पॉईंट होऊ शकतो. कारण दोन जलदुर्गामधून सूर्यास्त होत असताना त्याचे प्रतिबिंब समुद्राच्या पाण्यात दिसते. हे सुंदर रूप फक्त याच किनारी पाहायला मिळते. अशा खोरा बंदराची पार्किंग ५ वर्षांनी सुरु झाल्याने पर्यटक खुश आहे. परंतु, सध्या कडक उन्हं असल्याने पर्यटकांना जेटीवर उभे राहणे कठीण आहे. त्यामुळे सावलीसाठी पार्कींग परिसरात निवारा शेड बनवण्याची गरज आहे. पार्किंग परिसरात काँक्रिट रस्ता केला होता. आज तो रस्ता पूर्णपणे खराब झाला असून पायाला खडे लागतात, अशी तक्रार पर्यटकांची आहे. सध्या पर्यटक सोलर पॅनल खालच्या शेडमध्ये सावलीसाठी आसरा घेत आहेत.

### नवीन जेट्टी ठरणार वरदायी

जंजिरा किल्ल्यावर जाण्यासाठी राजपुरी नवीन जेट्टी व खोरा बंदरातून पर्यटकांना किल्ल्यापर्यंत पोहचवले जाते. या दोन्ही बंदरात तुफान गर्दी सुट्टीच्या हंगामात होत असते. त्यामुळे खोरा बंदरातील नवीन जेट्टी ही वरदायी ठरणार आहे. लांबी व रुंदी जास्त असल्याने या जेट्टीवर शेकडो पर्यटक अगदी सहज चढू व उतरू शकणार आहेत. ओहटीच्या वेळी नवीन जेट्टी खूपच आवश्यक ठरणार असून पर्यटकांचा खोळंबा होणार नाही. सध्या खोरा बंदरातील नवीन जेट्टीचे काम युद्धपातळीवर न थांबता सुरु असल्याने मे अखेपर्यंतच्या आत हे काम पूर्ण होणार आहे. याचा असंख्य प्रवासी व पर्यटकांना याचा मोठा लाभ होणार आहे.

### अधिक विकास होणे गरजेचे

जंजिरा किल्ल्यासाठी समोरच मोठी जेटी बनत आहे. पुढील काळात जंजिरा किल्ल्यात जाण्यासाठी सर्वात जवळचा मार्ग खोराबंदर असणार आहे. म्हणूच येथील विकास गतिमान असणे गरजेचे आहे. येथील पार्कींग अजूनही मोठ्या प्रमाणात होण्याची गरज आहे. पूर्वी रस्ते वाहतूक नसताना ह्याच खोरा बंदरातून छोट्या बोटीतून मुंबई, गोवा बोटीत जाण्याचा मार्ग होता. त्या जुन्या आठवणी मुरुडच्या व्यापाऱ्यांमध्ये अजूनही ताज्या आहे. म्हणूच शासनाने खोराबंदर विकास करणे गरजेचे आहे.

## निवडक



### स्वाती म्हात्रे पुरस्काराने सन्मानित

**भाकरवड :** अलिबाग तालुक्यातील धामणपाडा गावच्या स्वाती प्रकाश म्हात्रे यांना नुकताच आदर्श ग्रामसेवक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. स्वाती म्हात्रे यांनी पेण, उरण तालुक्यातील कोप्रोली, उंबर्डे, कलवे, सोनखार, कलमसुरे आदी ग्रामपंचायतमध्ये आपली सेवा बजावली. ग्रामसभेत त्यांनी कणखरपणे आपली भूमिका ठाम ठेऊन सर्व सामान्य नागरिकांना कसा न्याय देता येईल यावर लक्ष केंद्रित केले. ग्रामपंचायत अधिकारी यांनी कोरोना काळात, पूर, परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती अशावेळी जनतेसोबत जबाबदारीने कामे केली. शासनाच्या प्रत्येक योजनेचा शेवटचा टप्पा म्हणजे ग्रामपंचायत कार्यालय आणि त्या कार्यालयात अधिकारी प्रशासन आणि जनतेतील दुवा म्हणून ग्रामविकास अधिकारी आहे. स्वाती म्हात्रे यांना आदर्श ग्रामसेवक पुरस्कार मिळाल्याबद्दल अनेक स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

### रांगोळी कलावंतांनी जिंकली मने

**ठाणे :** जूचंद्र गाव म्हटले की डोळ्यासमोर येते ती या मातीतील कला. यात नाट्य, कला, भजन आणि रांगोळी या कलेच्या प्रांतात येथील तरुण आणि तरुणींनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांची कला सातासमुद्रापार गेली आहे. येथील कलाकार



हे दरवर्षी दिवाळीत एकत्र येऊन आपल्या कलेचे प्रदर्शन रसिकांना घडवत आहेत. यावर्षीही त्यांनी भरवलेल्या रांगोळी प्रदर्शनात छ. शिवाजी महाराज, हिंदुस्थानी सैनिक, एकवीरा देवी, बालगणेश, थ्रीडी रांगोळी, राधा-कृष्ण, युद्ध आणि युद्धातील स्थिती यावरील रांगोळ्या रसिकांचे लक्ष वेधून घेत आहेत. या रांगोळ्यांचे प्रदर्शन कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनात मनोज पाटील, प्रवीण भोईर, जय म्हात्रे, करण वटा, गणेश सालियन, साई भोईर, संजय पाटील, केतन पाटील, हर्षद पाटील व इतर रांगोळी कलाकारांनी रांगोळ्या साकारल्या आहेत.



### आनंदीबाई प्रधान महाविद्यालयाचे यश

**नागोठणे :** मुंबई विद्यापीठातर्फे जुलै-ऑगस्ट, २०२५ दरम्यान घेण्यात आलेल्या रसायनशास्त्र विषयातील पदव्युत्तर (एम.एस्सी.) परीक्षांचा निकाल १४ ऑक्टोबर रोजी विद्यापीठातर्फे जाहीर करण्यात आला. या परीक्षेत कोकण एज्युकेशन सोसायटीच्या नागोठण्यातील बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलातील आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र पदव्युत्तर विभागाने उज्वल यश संपादन केले आहे. या परीक्षेचा ८० टक्के निकाल लागला आहे. या परीक्षेत महाविद्यालयातून अनुक्रमे रुपाली डाकी हीने प्रथम क्रमांक पटकाविला. फिरदौस अन्सारी हिने द्वितीय, तर श्रेया दिवेकर हिने तृतीय क्रमांक मिळविला आहे. या परीक्षेत एकूण १९ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १५ विद्यार्थी उतीर्ण झाले आहेत. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.



### कुणकेश्वर मंदिरात दीपोत्सव साजरा

**सिंधुदुर्ग :** दक्षिण कोकणची काशी अशी ओळख असलेल्या कुणकेश्वर तीर्थक्षेत्री दिवाळी पाडव्यानिमित्त मंदिर कमिटीच्या माध्यमातून रात्री मंदिरामध्ये दीपोत्सव साजरा करण्यात आला. तब्बल २१ हजार तेजोमय दिव्यांनी कुणकेश्वर मंदिर परिसर उजळून गेल्याचे पाहायला मिळाले. दीपपूजन म्हणजे अंधारावर प्रकाशाचा विजय होय. दीप म्हणजे दिवा हे ज्ञान आणि मांगल्याचे प्रतीक आहे. अंधाराकडून प्रकाशाकडे जाणे हे या पूजेचे मुख्य महत्त्व आहे. दिव्यांच्या प्रकाशाने घरातील आणि मनातील अंधकार दूर होतो अशी श्रद्धा आहे. कुणकेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने प्रत्येक भक्ताला दिवा लावण्याची संधी मिळावी यासाठी विशेष नियोजन करण्यात आले. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील भाविक या दीपोत्सव कार्यक्रमांमध्ये सहभागी झाल्याची पाहायला मिळाले.

### दोन घरांवर वीज पडून नुकसान

**दापोली :** रत्नागिरी जिल्ह्यातील साखळोली (ता. दापोली) येथे गुरुवारी (दि.२३) सायंकाळी विजांच्या कडकडाटासह पडलेल्या मुसळधार पावसामुळे दोन घरांवर वीज कोसळून आग लागली. या आगीत घरातील इलेक्ट्रिक उपकरणे, बेड तसेच इतर साहित्य जळून खाक झाले आहे. रामकृष्ण बर्वे आणि राजकुमार बर्वे यांच्या घरावर तसेच त्यांच्या शेजारील चंद्रशेखर करमरकर यांच्या घरावर



गुरुवारी सायंकाळी सात वाजता वीज घराला अचानक आग लागली. संध्याकाळी सात वाजता मीटरजवळ वीज कोसळली. क्षणातच मीटर आणि वायरिंगने पेट घेतला. तसेच त्याखाली असलेली खुर्ची आणि बेड यांनी देखील पेट घेतला. यावेळी घरातील मंडळी घराच्या अंगण्यामध्ये होती. आग लागल्याचे लक्षात आल्यानंतर सर्व मंडळी घरात धावली आणि आग आटोक्यात आणली. शेजारील करमरकर यांचे घर उघडून आत जाऊन आग विझवली. त्यांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, अशी माहिती बर्वे यांनी दिली.

# वीजचोरीच्या प्रकारांना लगाम

**२९ टक्के स्मार्ट मीटर, मोबाईलवर मिळणार माहिती**

। रायगड । प्रतिनिधी ।

रायगड महावितरण विभागामधील २७ टक्के वीजमीटर बदलण्याचे काम पूर्ण झाले असून, मीटरही कार्यान्वित झाले आहेत. स्मार्ट मीटरविरोधात रायगडमध्ये सुरुवातीला मोठ्या प्रमाणात विरोध झाल्यानंतर मीटरचे फायदे, पारदर्शकता ग्राहकांना समजून येत आहे. यामुळे वीज वापराचे मीटर रींडग घेण्यात सुलभता, अचूकता येणार असल्याचा दावा महावितरण कंपनीने केला आहे.



> “स्मार्ट मीटरमध्ये सीम कार्ड असल्याने दर महिन्याच्या ठरावीक तारखेला स्वयंचलित पद्धतीने मीटरचे रींडग घेतले जाते. या मीटरमुळे मानवी हस्तक्षेप, रींडग घेण्यास होणारा विलंब, चुका टळता येतील. तसेच विजेचा अवास्तव वापर ग्राहकाला टाळता येईल.”
>
> – धनराज बिक्कड, कार्यकारी अभियंता, महावितरण विभाग रायगड

घरगुती, वाणिज्य वीजग्राहकांकडून होणाऱ्या विजेचा वापर नोंदवण्यासाठी वापरात असणाऱ्या जुने मीटर बदलून त्याऐवजी सीम कार्ड असणारे स्मार्ट मीटर बसवण्यात येत आहेत. यासाठी महावितरण कंपनीने तीन परिमंडळ क्षेत्रात ७,५९४ कोटींचा ठेका दिला आहे. यामध्ये जुने वीजमीटर काढून त्याजागी जीनियस, सिक्युअर व एसपीएल कंपनीचे स्मार्ट मीटर बसवण्याचे अंतर्भूत आहे. कोकण विभागात सुमारे ३५ लाखांपेक्षा अधिक स्मार्ट मीटर बसवण्यात आले.

रायगड जिल्ह्यात सात लाख ४४ हजार एकूण वीजग्राहक आहेत. यातील दोन लाख १२ हजार मीटर बदलून तेथे नवीन स्मार्ट मीटर बसवण्यात आले. ही टक्केवारी २९ असून, उर्वरित कामही लवकरच पूर्ण होईल, असे म्हणणे महावितरणचे रायगड जिल्हा कार्यकारी अभियंता धनराज बिक्कड यांचे आहे. पहिल्या टप्प्यात शासकीय कार्यालय तसेच बंद असणारे मीटर बदलण्याकडे प्राधान्य दिले आहे.

## शिवरायांचा अश्वारूढ पुतळा लवकरच पूर्णत्वास

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन नगरपरिषदेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांचा ब्रॉन्झ धातूपासून अश्वारूढ पुतळा उभारला जात असून लवकरच तो पूर्णत्वास येणार आहे. शिवसृष्टीमुळे श्रीवर्धनकरांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला जाणार आहे.

पर्यटन क्षेत्रात ब दर्जा प्राप्त श्रीवर्धन शहरातील मठाचा गवंड परिसर, जीवनाबंदर येथील आधुनिक जेटी आणि कोळीवाडा येथील ग्रोयन्स पद्धतीचा बंधारा, या सर्वांच्या विकासामुळे शहराचे महत्त्व वाढले आहे. छत्रपती शिवरायांचा ब्रॉन्झ इफेक्ट पुतळा मध्यभागी उभारण्यात येत असून बुरूज बांधकाम सुरू आहे. श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर ब्ल्यू फ्लॅग पायलट मानांकन प्राप्त आहे.

## सुट्टीच्या हंगामात कोकण रेल्वे सुसाट

**बिगर पावसाळी वेळापत्रक लागू, गाड्या जलद गतीने धावणार**

। महाड । प्रतिनिधी ।

कोकण रेल्वेमार्गावर धावणाऱ्या गाड्यांसाठी २१ ऑक्टोबरपासून बिगर पावसाळी वेळापत्रक लागू आहे. या निर्णयामुळे सर्व गाड्या जलद गतीने धावणार असून, सुट्टीच्या हंगामात कोकण रेल्वेचा प्रवास अधिक सुसाट होणार आहे.

कोकण रेल्वेमार्गावर पावसाळ्यात झालेले अपघात, दरड कोसळण्याच्या शक्यतेमुळे सुरक्षेच्या कारणास्तव गाड्यांचा वेग मर्यादित ठेवला जातो. त्याचे स्वतंत्र पावसाळी वेळापत्रक जाहीर केले जाते. ३१ ऑक्टोबरपर्यंत लागू असलेला हा कालावधी २१ ऑक्टोबरपासूनच संपुष्टात आणला गेला आहे.

आता बिगर पावसाळी वेळापत्रक लागू करण्यात आले आहे. तसेच पावसाळ्यापूर्वीची रेल्वे ट्रॅक मार्गाची अत्यावश्यक कामे वेळेवर, प्रभावीपणे पूर्ण करण्यात आली आहेत.

परिणामी, रेल्वेमार्ग जलद गतीसाठी सज्ज झाल्याने कोकण रेल्वेने हा निर्णय घेतला आहे. हा बदल पर्यटकांच्या पथ्यावर पडला असून मुंबई, पुणे आणि महाराष्ट्रातील इतर भागातून लाखो प्रवासी कोकणात येत असल्याने त्यांना फायदा होणार आहे.

### प्रवासाच्या वेळेत बचत

**मुंबई-कोकण तसेच दक्षिण भारत मार्गावरील प्रवास अधिक जलद होण्यास मदत होणार आहे. गाड्यांचा वेग वाढल्याने प्रवासाच्या वेळेत मोठी बचत होणार आहे. लांब पल्ल्याचा प्रवास करणाऱ्या प्रवाशांना विशेष फायदा होणार आहे. नियोजित वेळापत्रकानुसार १० दिवस बिगर पावसाळी वेळापत्रक लागू झाल्याने नवीन वेळापत्रक निघण्यापूर्वी प्रवाशांनी वेळापत्रक तपासून घ्यावे, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे.**



## महिलांना साडीचोळीची भाऊबीज भेट

**मावळा जवान संघटनेच्यावतीने राजमाता जिजाऊंना अनोखी मानवंदना**

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

छत्रपती शिवाजी महाराज यांनी जेथे अठरा पगड जातीच्या स्त्रियांचा सन्मान केला त्या पाचाडच्या राजमाता जिजाऊ यांच्या पवित्र समाधी स्थळी मावळा जवान संघटनेच्या वतीने शेकडो महिलांना साडीचोळीची भाऊबीज भेट देऊन राजमाता जिजाऊ यांना मानवंदना देण्यात आली.



रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी पाचाड येथील राजमाता जिजाऊ यांच्या समाधी व परिसरात मावळा जवान संघटनेच्या वतीने भाऊबीजेच्या दिवशी आकर्षक फुलांची सजावट, रांगोळी काढली होती. शेकडो पणत्यांच्या दिपोत्सव परिसर उजळून निघाला होता.मावळा जवान संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजय महाराज तनपुरे व कार्यवाहक रोहित नलावडे यांच्या हस्ते पारंपरिक रिवाजात राजमाता जिजाऊ यांच्या समाधीचे पुजन करून प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

हर हर महादेव,जय जिजाऊ, जय शिवराय च्या जयघोषाने , पारंपरिक लोकगीतांनी परिसर दुमदुमून गेला होता. पाचाड, रायगडवाडी, माणगाव, महाड, पोलादपूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी आदी ठिकाणच्या तिनशेहुन अधिक कष्टकरी महिलांचा साडीचोळीची भेट देण्यात आली. अनोख्या भाऊबीज भेटीने महिला भारावून गेल्या. ज्येष्ठ इतिहास अभ्यासक दत्ताजी नलावडे यांनी आपल्या व्याख्यानातुन राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी यांच्या मानव कल्याणकारी कार्य, महान त्याग, प्रखर राष्ट्रीय बाणा आणि विद्वत्तेचा महिमा सांगितला.

## काव्यरंग कार्यक्रमाला प्रतिसाद

**श्रीवर्धन :** कोकण मराठी साहित्य परिषद, श्रीवर्धन शाखेच्या वतीने काव्यरंग हा सांस्कृतिक कार्यक्रम २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी श्री दत्त मंदिर सभागृहात पार पडला. कार्यक्रमाची प्रमुख उपस्थिती कोमसाप जिल्हाध्यक्ष संजय गुंजाळ यांची होती. कार्यक्रमात गंगाधर साळवी, संध्या दिवकर, प्रणय इंगळे आणि सिद्धेश लखमदे यांनी कविता, पोवाडा आणि गझल सादर केले. कार्यक्रमाची सुसंवादकाची जबाबदारी हेमंत बारटक्के यांनी पार पाडली.

जिल्हाध्यक्ष गुंजाळ यांनी सांगितले की, शाखा दरवर्षी विविध साहित्य उपक्रम राबवत असून, आजच्या दीपसंध्या कार्यक्रमामुळे श्रोते मंत्रमुग्ध झाले. श्रीवर्धन शाखेची स्थापना २००४ रोजी झाली असून, त्यानंतर महाविद्यालयीन स्पर्धा, चर्चा सत्रे, दिवाळी पहाट, गीत गायन, काव्यवाचन, कथाकथन, साहित्य दरबार यांसारखे अनेक उपक्रम आयोजित केले जातात.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड येथील म्हाडाचे प्लॉट नं. १०९ या मिळकती भाडेपट्टाधारक श्री. जाकीर मुनवरअली कुरेशी यांनी आमचे अशिल यांचे लाभात सदरील प्लॉट मिळकत हस्तांतरीत केलेली आहे. संबंधीत प्लॉटचे पूर्वीचे भाडेपट्टाधारक यांनी अशी माहिती दिली आहे की, सदरील प्लॉट नं. १०९ संबंधीत मूळ कागदपत्रे म्हणजेच १) म्हाडा आणि श्री. नारायण झिपरु खडे यांच्यामधील दि. २४/०८/१९९२ रोजीचा भाडेपट्टा करारपत्र, २) भाडेपट्ट्याचे अधिकार मुनवर अली कुरेशी यांना हस्तांतरीत करण्याचे म्हाडाचे दि. १४/०६/२०११ रोजीचे पत्र, ३) म्हाडा यांनी श्री. नारायण झिपरु खडे यांना दिलेले दि. ०६/११/१९९२ रोजीचे ताबापत्र, ४) म्हाडा यांनी श्री. नारायण झिपरु खडे यांना दिलेले दि. २४/०८/१९९२ रोजीचे वाटपपत्र, ५) म्हाडा यांनी श्री. नारायण झिपरु खडे यांना दिलेले दि. २६/११/१९९१ रोजीचे स्मरणपत्र, ६) श्री. गोरख यशवंत पाटील यांनी श्रीमती राजश्री प्रसादर पुरोहित यांच्याबरोबर केलेले दि. २६/०९/२००१ रोजीचे म्हाडा प्लॉट नं. १०९ संबंधीत प्रतिज्ञापत्र, ७) श्री. नारायण झिपरु खडे यांनी श्री. गोरख यशवंत पाटील यांच्या बरोबर केलेले दि.२१/०५/१९९९ रोजीचे म्हाडा प्लॉट नं. १०९ संबंधीत हमीपत्र ही कागदपत्रे ते दिनांक १६/०९/२०२५ रोजी कर्जत बाजारपेठ ते म्हाडा कॉलनी पर्यंतचा प्रवास करीत असताना हरवलेली आहेत व त्याकामी कर्जत, जि. रायगड येथील पोलीस स्टेशनमध्ये दिनांक १५/१०/२०२५ रोजी रजि. अनु. क्रमांक ०६२८/२०२५ व ०६२९/२०२५ कडे रितसर तक्रार (एन.सी.) नोंदवलेली आहे.

सदर म्हाडा प्लॉटचे वर्णन खालीलप्रमाणे मौजे कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड येथील म्हाडा प्लाट मिळकत

| प्लॉटचे भाडेपट्टा धारक | प्लॉट नंबर | क्षेत्र |
|---|---|---|
| श्री. जाकीर मुनावर अली कुरेशी | १०९ | ९६.१८ चौ.मी. कारपेट |

तरी सदरील म्हाडा प्लॉट नं. १०९ संबंधीत वर वर्णन केलेली कागदपत्रे जर कोणास मिळाल्यास ती आमचे अशिलांचे अशिल अथवा अशिलांतर्फे ॲडव्होकेट यांचे खालील नमूद पत्यावर सुपूर्द करावीत, असे तमाम लोकांस आवाहन करण्यात येत आहे.

कर्जत:
दिनांक २५/१०/२०२५

ॲड. राजेंद्र पी. निगुडकर
पत्ता: कोर्ट व्ह्यु को. ऑप.हौ.सोसायटी, शॉप नं. १, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.: ९८२२७७४०७५/८४८४९६५६२६



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या ज०ाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे नेवाळी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहेत, या मिळकतींचे मालक आयशा अब्दुल वदुद खान वगैरे ०६, यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे क्रमांक/ भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकारणी रु. पै. |
|---|---|---|
| २९/४ | ००-२०-०० | ०.२२ |
| २९/५ | ००-१५-०० हे.आर.पॉ.या एकूण क्षेत्रापैकी, आयशा खान वगैरे ०६ यांचे मालकीचे ००-१०-०० हे.आर.पॉ. | ०.१४ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून ०८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २५ ऑक्टोबर २०२५

ॲड. शरद आर. सावंत
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-सदनिका नंबर ०२, तळमजला,बी विंग,
विहंग को.ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड-४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५



### नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येत की आमचे अशिल श्री. संतोष प्रभाकर पाटील, रा. तांबाटी, ता. खालापूर, जि. रायगड यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री नितिन नारायण निकम ३०२, मेघना को. ऑप हौसींग सोसायटी प्लॉट नंबर २८, सिंहगड सोसायटी जवळ सेक्टर ४२ ए.सीवडूस नेरूळ बेस्ट नवी मुंबई यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-आसरे, तालुका-सुधागड, जिल्हा-रायगड**

| गट नंबर | क्षेत्र हे.आर.प्रति | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १८ | एकूण क्षेत्र २-०८-००, यापैकी मिळकत मालकाचे क्षेत्र ००-६८-०० हे. आर. प्रति यापैकी ००-२०-०० हे. आर प्रति विक्री क्षेत्र | ० रु ८६ |

सदरहू वर नमूद केलेली शेती मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचे मालकीची व ताबे कब्जा वहीवाटीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरून तसेच दिसते. सदर शेती मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर शेती मिळकतीत कोणाचा काही गहाण, दान, साठेकरार, बक्षिस, फरोक्तखत, लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न वस्त्र बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिदध झालेपासून १० दिवसाचे आत खालील पत्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल. व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

ता. २५/१०/२०२५

सही/-
ॲड. सतीश अर्जुन शेळके
(बी.ए.एल.एल.बी) मुंबई हायकोर्ट
ऑफीस पत्ता-नारायण देशमुख
हाऊस दगडे आळी कर्जत पूर्व
कर्जत-रायगड मो.न.९८८११३२२४८


# निवडक

## शेतकऱ्यांची नुकसानभरपाईची मागणी

**म्हसळा :** परतीच्या पावसामुळे म्हसळा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या दिवाळीच्या आनंदावर विरजण पडले असून सर्वत्र नाराजीचे सावट असून शासनाने त्वरित भातशेतीचे पंचनामे करण्याचे आदेश देऊन नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास वरुणराजाने हिसकावून घेतला आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह केवळ भातशेतीवरच अवलंबून असून उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नसल्याने शेतकऱ्यांपुढे एक आव्हान उभे आह. अगोदरच बी. बियाणे, अवजारे आणि वाढती मजुरी यामुळेही हवालदिल झालेला तालुक्यातील शेतकरी शासनाच्या मदतीची चातकासारखा वाट पहात आह. यावर्षी भातशेती उत्तम प्रकारे झाली होती त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदी आणि उत्साही वातावरण होते, परंतू परतीच्या पावसाने अचानक दगा दिल्याने फार मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागत आहे.

## राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा सामाजिक बांधिलकीचा उपक्रम

**माणगाव :** माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ संचलित द. ग. तटकरे महाविद्यालय आणि त्याच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी सामाजिक संवेदनशीलतेचा उपक्रम राबविण्यात आला. या अंतर्गत मराठवाडा भागातील अभूतपूर्व पूरस्थितीतील शेतकऱ्यांना मदतीचा हात देत महाविद्यालयाकडून डिझास्टर रिलीफ फंड अंतर्गत पाच हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली. मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत सततच्या पावसामुळे शेती उद्ध्वस्त झाली, शेतजमिनीवरील सुपीक माती वाहून गेली, पशुधन आणि घरांचे मोठे नुकसान झाले. या संकटात बळीराजाला आधार देण्यासाठी महाविद्यालयाच्या विभागाने हा उपक्रम राबवला. संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राचार्य डॉ. बी.एम. खामकर यांच्या नेतृत्वाखाली हा समाजोपयोगी उपक्रम पार पडला. या वेळी कार्यक्रमाधिकारी प्रा. नेहा तुराई आणि प्रा. स्वप्निल सकपाळ यांनी आर्थिक मदतीची रक्कम करिअर कट्टा प्रमुख डॉ. बबन सिंगारे यांच्या हस्ते प्राचार्यांच्या उपस्थितीत सुपूर्द केली. एनएसएस विभागातील स्वयंसेवक आणि समिती सदस्यांनी यात उत्साहाने सहभाग घेतला. महाविद्यालयाच्या सामाजिक भानावर आधारित या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, शिक्षणासोबत समाजासाठी जबाबदारीची भावना निर्माण करणे हे आमचे ध्येय आहे, असे प्राचार्य खामकर यांनी सांगितले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव आणि आपत्तीग्रस्तांसाठी संवेदना निर्माण होण्यास निश्चितच हातभार लागला आहे.

## दिंडी कार्तिकी पायी तीर्थयात्रेचे भव्य स्वागत

**माणगाव :** रायगड जिल्ह्यातील पारंपरिक कार्तिकी पायी दिंडी तीर्थ यात्रा २०२५ यावर्षीही अत्यंत उत्साहात आणि भक्तिभावाने पार पडली. यात्रेच्या दरम्यान दिंडीचे स्वागत कोशिंबळे गावात मोठ्या जल्लोषात करण्यात आले. समाजसेवक विजय बक्कम यांच्या हस्ते दिंडीचे स्वागत करून स्थानिक ग्रामस्थ व भक्तगण यात्रेला सामील झाले. या प्रसंगी सहदेव बक्कम (माजी सरपंच), संजय बक्कम, संगीता बक्कम, सभापती दीपक उभारे, उपसरपंच सुषमा बक्कम, नागेश शेंपुडे यांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. गावभर पारंपरिक ढोल-ताशा, टाळ-मृदुंग आणि विठ्ठलनामाचा गजर चालू होता, ज्यामुळे गावात आध्यात्मिक वातावरण होते. महाप्रसादात शेकडो भाविक सहभागी झाले आणि विठ्ठल नामस्मरणाचा आनंद घेतला. विजय बक्कम यांनी सांगितले, की गेल्या दोन दशकांपासून चालत असलेली ही सेवा खरी भक्ती आणि समाजसेवेचे सुंदर उदाहरण आहे. दिंडी यात्रेचा हा टप्पा केवळ धार्मिक सोहळा नसून एकात्मता, श्रद्धा आणि सेवाभावाचे प्रतीक ठरला.

## पर्यटन वाढीबाबत विशेष आढावा बैठक

**माथेरान :** महाराष्ट्राचे गृह (ग्रामीण), वित्त, नियोजन, राज्य उत्पादन शुल्क, कौशल्य विकास व उद्योजकता, पणन या विभागाचे विद्यमान राज्य मंत्री शंभूराजे देसाई यांच्या अध्यक्षतेखाली माथेरान मधील विविध पर्यटन समस्या व पायाभूत सुविधांबाबत चर्चा करण्याकरिता संबंधीत विभागातील अधिकाऱ्यांसह सह्याद्री अतिथीगृह मुंबई येथे एक विशेष बैठकीचे आयोजन २७ ऑक्टोबर रोजी दुपारी १२:३० वाजता आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये माथेरान मधून शासकीय अधिकाऱ्यांबरोबर येथील माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर व शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी हे सहभागी होणार आहेत. माथेरानमध्ये अनेक समस्या यांनी आता गंभीर स्वरूप धारण केले असून नेरळ माथेरान घाटामध्ये वाहतूक कोंडी हा मोठा जटील प्रश्न निर्माण झाला आहे ज्याचा थेट परिणाम येथील पर्यटनावर होत असतो त्याचप्रमाणे येथील वाहनतळाच्या प्रश्नाने गंभीर स्वरूप धारण केले असून अपुऱ्या वाहनतळामुळे अनेक पर्यटक नाराज होत असून वाहनतळा अभावी त्यांना गाडी पार्क करण्याकरिता दीड ते दोन तास वाट पहावी लागते. माथेरानमध्ये वाढते पर्यटन लक्षात घेता, येथे पर्यायी रस्ता हा आता काळाची गरज ठरली असून अनेक वर्षापासून समस्त माथेरानकर या पर्यायी रस्त्याची मागणी करत आहे त्याविषयी या ठिकाणी चर्चा होण्याची शक्यता आहे.


## क्लासिफाईड

**जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी**

- **सहारा ट्रॅव्हल्स** अलिबागमध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे. वय २५ ते ४५ संपर्क :९२७०५६०४५६
- **अलिबाग, रोहा रोड येथे** मालाड़ेगावी १०-२० गुंठ्याचे संपूर्णतः डेव्हलप केलेले प्लॉट विकणे आहेत. ९८२२२५७९२९/ ८४०८९३०८१५
- **अलिबाग, किहीम येथे, रिसॉर्टमध्ये** ५०% भागीदार पाहिजे. (रु. २ कोटी ७५ लाख इन्व्हेस्टमेंट) जमीन १७ गुंठे. चार कॉटेज बांधलेली, जागा समुद्रापासून ३०० मीटर आणि गावठाणा जवळ आहे, बस - रिक्षा स्टॅन्ड जवळ आहे. ९८२२२५७९२९/८४०८९३०८१५
- **अलिबाग, चौल येथे** ७२ गुंठे जागा (१६ गुंठे बागायत + ५६ गुंठे शेत जमीन एकत्रित) रिसॉर्टसाठी संपादित केलेली आहे. या जागेमध्ये ५०% भागीदार पाहिजे. जागा मेन रोड आणि मुखरी गणपती मंदिराजवळ आहे. जागेची किंमत रुपये ६.५ कोटी आणि पुढील डेव्हलपमेंटएकत्रित करायची आहे. ९८२२२५७९२९/८४०८९३०८१५
- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी मुलींची आवश्यकता** आहे. ज्यूस मेकिंग, रेस्टॉरंट सर्व्हिस, रिसेप्शनिस्ट, १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप मेसेज करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२
- अलिबागमध्ये दुकानात कामासाठी मुलगा पाहिजे. संपर्क- ७९७२९३३७०, ९८२२४६१७६१
- For share market bolt operations fresh or experienced, graduate or post graduate candidates required for office in Alibag.For interview Contact- 9923750549

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**


# रिसॉर्ट मालकांना धमकी; गुन्हा दाखल

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील रिसॉर्ट मालकांना पोलीस खात्यातील मोठा अधिकारी आहे असे सांगून शुभम नावाचा एसपी आणि समीर नावाचा पोलीस निरीक्षक असल्याचे भासवून सदर व्यक्तीचा फोन येत होता.

तुमच्या फार्मवर एक अल्पवयीन जोडपे आले होते. त्या मुलाने सोबतच्या मुलीचे बेड सीन शूट केले आहेत. हा प्रकार तुमच्या फार्मवर घडला असल्याने तुमच्यावर सुद्धा पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करीत असून तुमचा फार्म कायमचा सील करण्यात येईल.

या कारवाईसाठी आमची टीम पुण्यावरून निघाली असून तुम्हाला त्वरित अटक करण्यात येईल, अशी पोलिसी कडक भाषेत दमदाटी करून फार्म मालकाला घाबरवून त्याला सेटलमेंट करायला लावून त्यांच्याकडून पैसे वसुल करीत होते. लक्ष्मीपुजनाच्या दिवशी मागे कोणते झंजट लागू नये किंवा खोट्या गुन्ह्यात अटक होऊन दिवाळी लॉकअपमध्ये जाऊ नये, या भीतीने काही लोकांनी गुन्हा केला नसतानाही सेटलमेंटला तयार झाले.

वारे येथील धनंजय म्हसे यांना मंगळवारी (दि. २१) सकाळी फोनवरून धमकावून त्यांच्याकडून बारा हजार रुपये ऑनलाईन ट्रान्सफर करून घेतले. संध्याकाळी चेतन घुमरे यांना त्याच प्रकारे कडक भाषेत दमदाटी करून त्यांच्याकडून पंधरा हजार घेतले. बुधवारी (दि.२२) दुपारी समीर कुडूसकर याला धमकवून त्याच्याकडून पाच हजार घेतले. त्यानंतर टाटा पॉवर हाऊस येथील जयवंत भोसले यांना ही दमदाटी केली परंतु त्यांनी काहीही रक्कम दिली नाही. सदर आरोपीनी वरील सर्व रक्कम आराध्या ज्ञानेश्वर दुधासे या खात्यावर घेतली.

आपली फसवणूक झाल्याबाबत या लोकांनी भूमिपुत्र फार्म संघटनेचे अध्यक्ष उदय पाटील यांचे कानावर सदर माहिती सांगितली.

भूमिपुत्र संघटनेचे बिपीन लाड, अनील भोसले यांनी कर्जत पोलीस स्टेशनला याबाबत तक्रार केल्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड, पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांच्या मार्गदर्शना खाली सायबर ब्रँचचे पोलीस उपनिरीक्षक किरण नवले आणि त्यांचे सहकारी यांनी याबाबत शिताफीने तपास करून सदर आरोपीना आपला पोलिसी खाक्या दाखवून आरोपी शुभम राऊत आणि समीर दुधासे यांना कडक शब्दात तंबी देऊन घेतलेले पैसे परत करायला लावले.

अशा प्रकारे कर्जत पोलिसानी फार्महाउस मालक यांची सायबर फसवणूकी बाबत तात्काळ कारवाई करून त्यांना त्यांचे फसवणूक झालेली रक्कम पुन्हा मिळवून देऊन त्यांची दिवाळी आनंदाची केली आहे.

सदर प्रकणाचा पोलीस उप निरीक्षक किरण नवले, महिला हवालदार पूजा कांबळे, महिला हवालदार सलोटे हे अधिक तपास करीत आहेत.


### जाहीर हरकत

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे नारंगी, ता. अलिबाग, येथिल खालील नमूद वर्णनाची शेतजमिन मिळकत विक्रीचा साठेकरार सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अशोक नारायण पाटील, सौ. कल्याणी किशोर पाटील, श्री. निखिल नितीन म्हात्रे, सौ. पुजा नितीन म्हात्रे, राहणार चिंचवली, ता. अलिबाग यांनी माझे अशिलांच्या लाभांत दिनांक ९/०५/२०२५ रोजी स्वाक्षरित करून दिलेला आहे. सदर मिळकती संदर्भात आवश्यक त्या पुर्तता केल्यानंतरच सदर मिळकतीचा खरेदीव्यवहार पुर्ण करण्याचे उभयसंमत ठरले आहे. मात्र, अद्यापपर्यंत सदर जमिन मिळकतीच्या विद्यमान मालकांनी साठेकरारात नमूद केल्यानुसार कोणत्याही प्रकारची पुर्तता केलेली नाही वा सदर मिळकतीचे खरेदीखत देखिल माझ्या अशिलांच्या लाभांत स्वाक्षरीत करून दिलेले नाहीत. असे असताना देखील सदर मिळकतीचे विद्यमान मालक, हे माझ्या अशिलांचे हक्क डावलून सदरील मिळकतीची परस्पर त्रयस्थ व्यक्तिस विक्री करण्याच्या विचारात आहेत, असे माझे अशिलास खात्रीशिर समजले आहे. माझे, अशिल आजही त्यांचा व्यवहार पुर्ण करण्यास तयार आहेत. अशा परिस्थितीत माझे अशिलांच्या संमतिशिवाय सदरील मिळकतीबाबत खरेदी-विक्री बाबत कसल्याही प्रकारचा व्यवहार कोणीही करू नये. माझ्या अशिलांच्या संमतिशिवाय सदरील मिळकतीबाबत कोणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो व्यवहार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच, नाईलाजास्तव माझे अशिलांस सदर मिळकतीच्या जमिन मालकांविरुध्द तसेच जमिन खरेदीदारांविरुध्द उचित ती दिवाणी अथवा फौजदारी कार्यवाही करणे भाग पडेल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | हि.नं. | क्षेत्र(हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|
| नारंगी, ता. अलिबाग. | ४८ | १ | १-१४-००<br>०-१५-२० पो.ख.<br>१-२९-२० एकूण | १७-८० |

सदर शेतजमिन मिळकतीमधिल श्री. अशोक नारायण पाटील, सौ. कल्याणी किशोर पाटील, श्री. निखिल नितीन म्हात्रे, सौ. पुजा नितीन म्हात्रे यांच्या ३/४ इतक्या अविभक्त हिश्शाची म्हणजेच सुमारे ०-९६-९० आर्स शेतजमीन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : २४-१०-२०२५

सही/-
(ॲड. संजय म. भगत)
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,अलिबाग-रायगड
हरकतदारांचे वकील



### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक



## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**




## राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाची कामं मनासारखी होतील. आर्थिकदृष्ट्या समाधान लाभेल. विद्यार्थ्यांना अनुकूलता राहील.
- **वृषभ** : गृहोपयोगी वस्तुंची खरेदी होईल. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात प्रगतीला वाव राहील. बाकी चिंता नसावी.
- **मिथुन** : व्यवसायात नवे बदल होतील. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. अनुभवींचा सल्ला कामी येऊ शकेल.
- **कर्क** : उपजत कला-गुणांचा विकास होईल. खर्च वाढला तरी प्राप्तीही तशीच राहील. प्रवास शक्यतो टाळा.
- **सिंह** : अनावश्यक ताण-तणाव निर्माण होईल. मनाविरूध्द घटना संभवतात. आध्यात्मिक प्रगती होईल.
- **कन्या** : आत्मविश्वास वाढवणाऱ्या घटना घडतील. उत्कर्षाच्या संधी लाभतील. मानसिक स्वास्थ लाभेल.
- **तूळ** : भागीदारी व्यवसायात उत्कर्ष होईल. मुलांच्या प्रश्नांबाबत समाधान लाभेल. प्रवास लाभदायक ठरेल.
- **वृश्चिक** : स्थावर, वाहन सौख्य लाभेल. व्यवसायातील अडचणी दूर होतील. ज्येष्ठांनी प्रकृती सांभाळावी.
- **धनु** : परदेश प्रवासाचे बेत ठरतील. मंगल कार्याची बोलणी सफल होतील. प्रक्रिया उद्योगात यश लाभेल.
- **मकर** : अचानक धनलाभ संभवतो. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात संधी लाभतील. मानसिक स्वास्थ लाभेल.
- **कुंभ** : जुनी येणी वसूल होतील. व्यवसायात प्रगतीच्या नव्या संधी लाभतील. सणाचा उत्तम उत्साह राहील.
- **मीन** : प्रक्रिया उद्योगात नव्या संधी लाभतील. कामासाठी प्रवास लाभदायक ठरेल. बाकी चिंता नसावी.

ब्युटी मंत्रा

## झटपट तयार व्हायचं तर...

वेळोवेळी आपण ब्युटी पार्लरमध्ये जात असतो. त्वचेची, केसांची काळजी घेत असतो. पण काहीवेळा पार्लरमध्ये जायला वेळ मिळत नाही. ऑफिसचं प्रचंड काम अंगावर आलेलं असतं. त्यामुळे स्वत:साठी दोन तास काढण्याचा विचार बाजूला ठेवावा लागतो. अनेकदा मध्येच एखादा कार्यक्रम किंवा पार्टी येते. अशावेळी झटपट कसं तयार व्हायचं? कूल लूक कसा मिळवायचा याविषयी...

✻ अचानक पार्टीचा बेत ठरला आणि तुमचा चेहरा निस्तेज दिसत असेल तर एखादा घरगुती फेस पॅक तुम्ही लाऊ शकता. बाजारातही भरपूर फेस पॅक उपलब्ध आहेत. या फेसपॅकचा वापर करून तुम्ही चेहरा उजळवू शकता. इंन्स्टंट फेसमास्कही मिळतात. या फेसमास्कमुळे तुम्ही अगदी झटपट ताज्यातवान्या दिसू शकता.

✻ घराबाहेर पडल्यावर पाय घाण होतात. पायांना बाहेरची माती, धूळ लागलेली असते. पाय काळपट दिसू लागतात. छान मेकअप, कपडे घालून तयार झाल्यानंतर काळपट पाय बघून कसंतरी वाटतं. **(क्रमश:)**

## २५ ऑक्टोबर

दिनविशेष

- **१९८०**: शायर साहिर लुधियानवी यांचे निधन.
- **२००३**: विचारवंत आणि तत्त्वज्ञ पांडुरंगशास्त्री आठवले यांचं निधन.
- **२००९**: अभिनेते चित्तरंजन कोल्हटकर यांचं निधन.
- **२०१२**: विनोदी अभिनेते जसपाल भट्टी यांचं निधन.
- **२०१३**: पंतप्रधान कार्यालयाने केंद्रीय अन्वेषण विभागाकडे हिंदाल्को या कंपनीला ओडिशामध्ये खाणवाटप केल्याप्रकरणाची कागदपत्रं सुपुर्द केली.

महत्त्वपूर्ण काही...

## एका प्रयोगाची पार्श्वभूमी

वीज पडणं ही एक नैसर्गिक घडामोड आहे. अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत वीज पडून अनेक उंच इमारतींची नासधूस होत असे. मात्र त्यानंतरच्या काळात अमेरिकी संशोधक बेंजामिन फ्रँकलिन याने तयार केलेला 'विद्युतनिवारक' विजेपासून उंच इमारतींचं रक्षण करण्यास उपयोगी ठरू लागला. फ्रँकलिनने फिलाडेल्फिया इथे १७५२ मध्ये केलेला, गडगडाटी वादळात पतंग उडवण्याचा ऐतिहासिक प्रयोग विद्युतनिवारकाच्या निर्मितीला कारणीभूत ठरला. फ्रँकलिनने आकाशातील वीज तसंच दोन वस्तू एकमेकांवर घासल्यावर निर्माण होत असणारी घर्षणजन्य वीज या दोन्ही एकच असल्याचं या प्रयोगातून दाखवून दिलं. फ्रँकलिनने लाकडाच्या दोन पट्ट्यांवर रेशमी कापड बांधून एक पतंग तयार केला. पतंगाच्या वरच्या टोकाला धातूची तार बसवली. या तारेला पतंगाची दोरी जोडली. दोरीच्या दुसऱ्या टोकाला लोखंडी किल्ली बांधली. किल्लीपासून खालच्या भागात एक कोरडी रेशमी फीत बांधली आणि ती धरून तो छताखाली उभा राहिला. वादळी ढग आकाशात जमले असताना त्याने पतंग ढगात उंच उडवला.

आरोग्यमंत्र

## कोहळा शरीरासाठी पोषक



कोहळा हे फळ मेंदूसाठी ब्रेन टोनिंगसारखं काम करतं. कोहळा किंवा श गोर्ड, ज्याला थंडीमधलं खरबूज सुध्दा म्हणतात ते आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. हे फळ पोषक तत्वांनी समृद्ध आहे, कोहळा व्हिटॅमिन सी, कॅल्शियम, लोह, मॅग्नेशियम, फॉस्फरस, पोटॅशियम, झिंक यासारख्या इतर अनेक पोषक तत्वांचा चांगला स्त्रोत आहे. असं असूनही कोहळ्याबद्दल फारशी माहिती नसते. कोहळ्यामध्ये कॅरोटीनॉइड्स आणि फ्लेव्होनॉइड्ससारखे अँटिऑक्सिडंट्स असतात. त्यामुळं हृदयविकार आणि मधुमेहासारख्या गंभीर आजारांचा धोका कमी होतो. आयुर्वेदानुसार कोहळा त्याच्या औषधी गुणधर्मांसाठी ओळखला जातो. ताप आणि इतर आजारांसारख्या अनेक विषाणूजन्य संसर्गांवर घरगुती उपाय म्हणून याचा पूर्वीपासूनच वापर केला जातो.आयुर्वेदात कोहळ्याचा उपयोग ब्रेन टॉनिक म्हणून केला जातो. कोहळ्यामुळं पित्त आणि वात शांत होतं. रक्तस्त्राव विकार, किडनी स्टोन, युरिनरी इन्फेक्शन, डायबिटीज यांच्या उपचारातही कोहळ्याचा खूप उपयोग होतो. आयुर्वेदानुसार कोहळा हे आपल्या मेंदूच्या आरोग्यासाठी उत्तम अन्न आहे. स्मृती तीक्ष्ण करण्यासाठी आणि संज्ञानात्मक कार्य सुधारण्यासाठी ओळखला जातो. कोहळा मन शांत करतो..आराम देतो आणि तणाव कमी करण्यात मदत करतो. कोहळ्यात पाण्याचे प्रमाण खूप जास्त आहे त्यामुळं पचायला हलका आहे. त्यात फायबरचे प्रमाण भरपूर आहे. याचा बद्धकोष्ठता आणि सूज दूर करण्यास फायदा होतो. त्यात कॅलरी खूप कमी आहे, ज्यामुळे ते वजन कमी करण्यास देखील उपयुक्त आहे.

## पंचांग

**शनिवार, २५ ऑक्टोबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, कार्तिक शु. ४, चंद्रराशी : वृश्चिक, नक्षत्र : अनुराधा, योग : शोभन, सूर्योदय ६.३८, सूर्यास्त ६.०७

## फॉरवर्डस

**तारें बदलनें लग ग़ये अब फ़ितरतें अपनीं...**

**डरतें हैं टुटनें सें क़ोई क़ुछ भीं न माँगले...!**

## वाचा तर खरं

आपण भारतात राहतो. ही अनेकांची मातृभूमी आहे. आपल्या देशाबद्दल जाणून घेताना जगात सर्वात जास्त म्हणजेच तब्बल ३० लाख मशिदी भारतात आहेत हे लक्षात घ्या. जगातील सर्वात मोठी शाळाही भारतात आहे. 'द सिटी मॉन्टेसरी स्कूल' नामक लखनौमधील या शाळेत तब्बल ४५,००० विद्यार्थी शिक्षण घेतात. दर वर्षी भारतात २.५ कोटी बालकं जन्म घेतात. म्हणजेच दर वर्षी ऑस्ट्रेलियाच्या लोकसंख्येएवढे जीव इथे जन्म घेतात.

करिअरवाटा

## स्वमूल्यांकन गरजेचं



यशस्वी आणि कुशल कर्मचारी अशी ख्याती मिळवायची असेल तर कामामधील परफेक्शन महत्त्वाचं ठरतं. कार्यपद्धतीमध्ये थोडासा बदल करून हे परफेक्शन मिळवता येतं. यातली पहिली पायरी म्हणजे विद्यार्थीदशा न सोडणं. जग सतत बदलत असतं, कार्यपद्धती बदलत असते. त्यामुळेच कार्यपद्धतीत सुधारणा घडवून आणण्यासाठी नव्या जगाचा मंत्र शिकून घ्यायला हवा. प्रगतीतील धोंडे दूर करुन कामाची नवी शैली आत्मसात करायला हवी. 'मीच बरोबर आहे' आणि 'मलाच सगळं कळतं' अशी भावना तुम्हाला प्रवाहातून बाजूला ढकलेल याची जाण ठेवायला हवी. प्रत्येक दिवशी तुमचा स्पर्धक कार्यक्षेत्रात प्रवेश करत असतो. त्याच्याकडे अनुभव नसला तरी प्रगत आणि आधुनिक ज्ञान असतं. तो बाहेरच्या जगाच्या जास्त संपर्कात असतो. वरिष्ठांवर त्याची छाप पडते. म्हणूनच कार्यक्षेत्रामध्ये टिकून रहायचं तर काम चोख करण्याबरोबरच अशा संलग्न मुद्द्यांचाही परामर्श घ्यायला हवा. यासाठी सर्वोत्तम उपाय म्हणजे स्वमूल्यांकन. जगाच्या नजरेतून स्वत:कडे पाहिल्यास आपण किती मागं आहोत याचा अंदाज येतो. ही दरी भरून काढण्याचे अनेक उपाय आहेत. मात्र, सर्वप्रथम त्याकडे सजगतेनं पहायला हवं.

खेचाखेची

## रिडेव्हलपमेंट

वेळ – दिवाळीच्या तोंडावरील

**मी छोट्या मुलाला:** काय रे, यावर्षी किल्ला नाही केलास?

.
.
.
.

**छो. मु. :** केला होता, पण आता रिडेव्हलपमेंटला गेला...

## वेगळं काही

उत्तर-पूर्व नामिबियातल्या नाकाबोलेलवा भागातल्या हत्तींच्या कळपाने दोन शिकाऱ्यांवरच हल्ला चढवला. इतकंच नाही तर त्यांना पळवून लावलं. आपल्या एका सहकाऱ्याला जखमी झालेलं पाहून सर्व हत्ती बिथरले आणि त्यांनी शिकाऱ्यांचा पाठलाग सुरू केला. हत्ती मागे लागल्याचं पाहून शिकाऱ्यांनाही दरदरून घाम फुटला आणि त्यांनी तिथून पळ काढला. शिकाऱ्यांच्या जोडीपैकी एकाने कळपातल्या हत्तीवर गोळी झाडली. गोळी लागल्यामुळे हत्ती जखमी झाला. हे बघून उर्वरित हत्ती खूप रागवले. त्यांनी शिकाऱ्यांवर हल्ला चढवला. या प्रदेशातल्या हत्तींची संख्या आता खूप कमी झाली आहे. याआधी इथे हत्तींची शिकार करायला परवानगी होती.

सौंदर्यसाधना

## अंडरटोन म्हणजे काय?



सौंदर्यतज्ज्ञ त्वचेच्या अंडरटोननुसार प्रसाधनं निवडण्याचा सल्ला देतात. अंडरटोन अर्थात त्वचेच्या आतल्या स्तराचे तीन प्रकार असतात. कूल, वॉर्म आणि न्यूट्रल. या प्रकारांमधला फरक समजून घेऊ

✻ त्वचेच्या आतल्या नसा स्पष्ट दिसतात. व्यक्तीगणिक नसांचा रंग बदलतो. निळ्या किंवा जांभळट रंगाच्या नसा असतील तर तुमचा अंडरटोन कूल आहे असं समजावं. उन्हात गेल्यावर राप जाणवत असेल आणि त्वचेवर निळसर छटा दिसत असेल तर ते कूल अंडरटोनचं लक्षण असतं. ✻ नसांचा रंग हिरवट असेल तर अंडरटोन वॉर्म आहे असं समजावं. उन्हात गेल्यानंतर त्वचा काळी पडत असेल पण रापत नसेल तर अंडरटोन वॉर्म असतो. ✻ नसांचा रंग हिरवट निळसर असेल तर ते न्यूट्रल अंडरटोनचं लक्षण समजावं. ✻ मेक अप उत्पादनांवर डब्ल्यू, सी आणि एन अशा खुणा असतात. डब्ल्यूची खूण असणारं उत्पादन वॉर्म अंडरटोनसाठी, सी खूण असणारं कूल अंडरटोनसाठी तर एन खूण असणारं उत्पादन न्यूट्रल अंडरटोनसाठी योग्य असतं. हे पाहून खरेदी अधिक योग्य ठरेल.

## सुडोकू १९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ३ | १ | | ४ | | ७ | | |
| ७ | | | ५ | | ८ | | | २ |
| | ५ | | | | | | १ | |
| | | २ | | | ३ | | ९ | |
| ६ | १ | | ४ | ८ | ७ | | ५ | ३ |
| | ८ | | ९ | | | ४ | | |
| | २ | | | | | | ३ | |
| १ | | | ३ | | २ | | | ७ |
| | | ७ | | ९ | | ५ | २ | १ |

टीप -
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १८ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ५ | १ | ९ | ८ | ६ | ३ | ४ | २ |
| ८ | ३ | २ | ५ | १ | ४ | ९ | ७ | ६ |
| ४ | ६ | ९ | २ | ३ | ७ | ५ | १ | ८ |
| ६ | २ | ४ | ७ | ९ | १ | ८ | ५ | ३ |
| ५ | ८ | ३ | ६ | ४ | २ | १ | ९ | ७ |
| १ | ९ | ७ | ८ | ५ | ३ | २ | ६ | ४ |
| २ | १ | ६ | ३ | ७ | ९ | ४ | ८ | ५ |
| ९ | ७ | ८ | ४ | २ | ५ | ६ | ३ | १ |
| ३ | ४ | ५ | १ | ६ | ८ | ७ | २ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक १९

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | | ५ | ■ | ६ | ■ | ७ | | ८ | ९ |
| १० | | | ■ | | ■ | ११ | १२ | | १३ | | ■ | १४ | |
| | ■ | १५ | | ■ | १६ | | | ■ | १७ | | १८ | ■ | |
| १९ | २० | | ■ | २१ | | | ■ | २२ | | ■ | २३ | २४ | |
| ■ | | ■ | २५ | | ■ | २६ | | | ■ | ■ | ■ | | ■ |
| २७ | | २८ | | ■ | २९ | | ■ | ३० | ३१ | ३२ | | ■ | ३३ |
| | ■ | | ■ | ३४ | | | ३५ | ■ | ३६ | | ■ | ३७ | |
| ३८ | ३९ | | ४० | | ■ | ४१ | | ४२ | | | | ■ | |
| ४३ | | ■ | | ■ | ४४ | | ■ | | ■ | ■ | ■ | ४५ | |
| ■ | ४६ | ४७ | ■ | ४८ | | | ■ | ४९ | ५० | | ५१ | | ■ |
| ५२ | ■ | ५३ | ५४ | ■ | | ■ | ५५ | | | ■ | | ■ | ५६ |
| | ■ | ५७ | | ५८ | | ■ | | ■ | ५९ | | | ६० | ■ |
| ६१ | ६२ | ■ | ६३ | | ■ | ६४ | ■ | ६५ | | ■ | ■ | | ■ |
| ६६ | | | | ■ | ६७ | | | | ■ | ६८ | | | |

**आडवे शब्द :-**
१) अचूक इलाज
७) सिंह
१०) सुसर
११) कामदेवाचे एक आयुध
१४) मगज
१५) गुलामी
१६) दिवस,वार
१७) प्रश्न
१९) धुणे
२१) ढग,लवकर
२२) न वापरलेली
२३) माल साठविण्याची जागा
२५) लहान बाळाचे चुंबन
२६) श्रीफळ
२७) अटीची भाषा
२९) मुलगी
३०) ✻✻ ✻✻ दंड भेद
३४) पायाचा कालचा भाग
३६) अरण्य
३७) निद्रा
३८) दुस-याच्या मनातील विचार जाणणारा
४१) सुंदर स्त्री
४३) होडी
४४) सूर्याचे एक नाव
४५) जवळ ( हिं.)
४६) नंतर
४८) जोराने आवळून बांधणे
४९) लोकांनी मानलेला पुढारी,नेता इ.
५३) रानरेडा
५५) वितरण
५६) गाय
५७) श्रेष्ठ पुरुष
५९) भरभराट
६१) विशेष
६३) काठ,बाजू
६५) च्या जवळ
६६) मध्यम प्रमाण
६७) गणेश
६८) जैन साधू

**उभे शब्द :-**
१) श्रीरामाचे स्तोत्र
२) नंतर
३) पोते
४) वजा
५) ठार मारणे
६) कर्णेंद्रिय
७) दावानल
८) संताप
९) अटीची भाषा
१२) किंमत
१३) पावा
१६) एक द्विदल धान्य
१८) बारीक केस
२०) मनाची फिरणारी इच्छा
२१) जास्वंद
२२) काळे ज्वालाग्रही खनिज
२४) फुगीर शेपटीचा छोटा प्राणी
२५) कट्टा,चबुतरा
२७) लोकमानस
२८) नक्षीदार ताट
२९) मूल
३१) आ.अत्रेंच्या दैनिकाचे नाव
३२) राक्षस
३३) टिंगल,टर
३४) भांड्याला पडलेली चीर
३५) मृत्युदेवता
३९) मऊ
४०) कृष्ण पक्ष
४२) अतिरेक,कड्यावरून ढकलण्याची शिक्षा
४४) रसाळ
४५) साखरेचा रस
४७) अंबर
५०) चहा पिण्याचे जोड साधन
५१) संगीतातील एक शब्दालंकार
५२) खात्रीने
५४) नियमितपणे यात्रा करणारा
५५) हिस्सा
५८) पारंब्याचा वृक्ष
६०) युवक
६२) सरळ,लांब वासा
६४) शिळा नसलेला
६५) पर्ण

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शें | डी | तु | टो | वा | पा | रं | बी | तु | टो | ■ | या | ■ | न |
| ग | र | ■ | ण | ■ | गा | ज | ■ | का | क | ■ | ता | री | ख |
| दा | ■ | न | गा | रा | ■ | क | वा | ■ | ■ | आ | या | त | ■ |
| णा | ■ | फा | ■ | त | वररा | ■ | रा | व | ण | भा | त | ■ | बा |
| ■ | ना | ■ | ■ | रा | णी | व | ■ | डी | ■ | ळ | ■ | ग | र |
| न | र | क | व | णी | ■ | ल | व | ल | व | ■ | अ | म | का |
| त | ळ | ■ | प | ■ | र | य | त | ■ | खा | न | दा | न | ■ |
| म | ■ | वा | न | व | सा | ■ | न | का | र | ■ | ल | ■ | ता |
| स्त | व | न | ■ | स | ■ | बे | दा | णा | ■ | स | त | ल | ज |
| क | द | र | दा | न | ■ | सु | र | ■ | रा | म | ■ | वा | म |
| ■ | न | ■ | मो | ■ | उ | मा | ■ | क | म | र | गा | ■ | हा |
| को | ■ | उ | द | र | भ | र | ण | ■ | रा | ■ | ज | हा | ल |
| प | व | ना | र | ■ | य | ■ | ■ | का | म | गा | र | ■ | ■ |
| रा | ■ | ड | ■ | गी | ता | र | ह | स्य | ■ | त्र | ■ | हा | त |

# कलासक्त

## विनोदवीर असरानी अनंतात विलीन



**सुमारे चार दशके हिंदी चित्रपटसृष्टीत लोकप्रिय असलेला विनोदी अभिनेता असरानी २० ऑक्टोबरला मुंबईतील जुहू येथील भारतीय आरोग्य निधी हॉस्पिटलमध्ये दुपारी ३.०० वा. आपणासर्व सिनेशौकिनांना सोडून अनंतात विलीन झाला. श्वसनाच्या त्रासामुळे त्यांना १८ ऑक्टोबरला हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. फुफ्फुसात पाणी झाल्यामुळे त्यांचा २० तारखेला मृत्यू झाला. आपल्या विनोदी अभिनयाने काही चित्रपटातील गंभीर व अंगविक्षेप न करता त्याने अनेक विनोदी भूमिका संयमाने व संवेदनशीलतेने रंगविल्या होत्या.**

गोवर्धन असरानी नामक हा सिंधी हिंदू कुटुंबात राजस्थानमधील जयपूर येथे १ जानेवारी १९४१ रोजी जन्मलेला अभिनेता पुढे निर्माता व दिग्दर्शक म्हणून नावारूपाला आला. त्याने ३५० हून अधिक चित्रपटात कामे केली. काही गुजराथी चित्रपटातून त्याने नायकाच्या भूमिका केल्या. त्याच्या वडिलांचे जयपूरमध्ये कार्पेटचे दुकान होते, पण त्यांना वडिलांच्या व्यवसायात रस नव्हता. सेंट झेवियर्स स्कूलमधून मॅट्रिक झाल्यावर त्यांनी जयपूरच्या राजस्थान कॉलेजमधून पदवी संपादन केली. कॉलेजचे शिक्षण त्यांनी जयपूरच्या ऑल इंडिया रेडिओमध्ये व्हॉईस आर्टिस्ट म्हणून नोकरी करून पूर्ण केले. नाटक व चित्रपटांची आवड असल्याने ते मुंबईला आले. १९६३ मध्ये त्यांनी थोर दिग्दर्शक व निर्माते किशोर साहू व ऋषिकेश मुखर्जी यांची भेट घेऊन त्यांनी आपणास चित्रपटात अभिनय करण्याची संधी द्यावी अशी विनंती केली. असरानी यांचा पूर्वेतिहास जाणून घेऊन साहू व मुखर्जी यांनी त्यांना तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेण्याची सूचना केली. त्यानुसार असरानी यांनी पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश घेतला व अभ्यासक्रम पूर्ण करून ते परत किशोर साहू व ऋषिकेश मुखर्जी यांना भेटले. किशोर साहू यांनी त्यांना त्यांच्या 'हरे काँचकी चुडियाँ' या१९६७ सालच्या चित्रपटात प्रथम नायक विश्वजीतच्या मित्राची भूमिका दिली. किशोर साहू यांनी कन्या नयना साहू ही या चित्रपटाची नायिका होती. हा चित्रपट तिकीट बारीवर फार यशस्वी ठरला नाही. ऋषिकेश मुखर्जी यांनी १९६९ सालच्या 'सत्यकाम' या चित्रपटात असरानी यांना धर्मेंद्रसोबत भूमिका दिली. हा चित्रपट बांधकाम व्यवसायातील भ्रष्टाचारावर व कामगार स्त्रियांच्या शोषणावर आधारीत होता. त्यात शर्मिला टागोर, संजीवकुमार, अशोककुमार यांच्या भूमिका होत्या. हा चित्रपट खूप गाजला. आर्थिकदृष्ट्याही यशस्वी झाल्याने पुढे असरानीला अनेक चित्रपटात भूमिका मिळाल्या. त्यानंतर निर्माते दिग्दर्शक गुलजार यांनी असरानी यांना त्यांच्या १९७१ मधील 'मेरे अपने' या आगळ्या विषयावरील चित्रपटात महत्वाची भूमिका दिली. दोन सुशिक्षित व बेरोजगार तरूण गुंडाच्या जीवनाची शोकांतिका गुलजार यांनी मांडली होती. विनोद खन्ना व शत्रुघ्न सिन्हा यांनी या दोन टोळ्यांमधील गुंडांची भूमिका केली होती. त्यात शत्रुघ्न सिन्हाच्या टोळीतील रघुवीर नामक तरूणाचे काम असरानी यांनी केले होते. पुढे गुलजार व ऋषिकेश मुखर्जी यांनी आपल्या सर्वच चित्रपटात असरानीला महत्वपूर्ण भूमिका दिल्या. गुलजार यांनी त्यांच्या 'परिचय' १९७३, 'कोशिश' १९७२, 'खुशबू' १९७५, आदी चित्रपटात असरानीला महत्वाच्या भूमिका दिल्या आणि वैशिष्ट्य म्हणजे या साऱ्या भूमिका विनोदी नव्हत्या तर गंभीर होत्या. ऋषिकेश मुखर्जी यांनी आपल्या 'गुड्डी' १९७१, 'बावर्ची' १९७३, 'अभिमान' १९७३, 'नमकहराम' १९७३, 'मिली' १९७५ आदी चित्रपटात असरानी यांना महत्त्वाच्या भूमिका दिल्या. 'बावर्ची' या चित्रपटाचे नायक राजेश खन्ना यांची असरानींशी मैत्री झाली व पुढे राजेश खन्ना आपल्या चित्रपटात असरानींना भूमिका देण्यासाठी आग्रही राहू लागला. राजेश खन्ना यांनी सलग २४ चित्रपटात एकत्र कामे केली.

मराठी नाटककार दत्ता केशव यांनी 'रात्र थोडी सोंगे फार' हे विनोदी नाटक लिहिले होते. ते किशोर प्रधान यांनी करून १९७२ साली रंगमंचावर आणले होते. त्यांचं नायक जत्रेला गेला असताना आकाशपाळण्यात बसतो. अचानक लाईट गेल्यामुळे पाळणा बंद होतो व नायक पाळण्यातच अडकतो, त्याच्यासोबत पाळण्यात एक सुंदर स्त्री असते. रात्रभर पाळण्यात अडकल्यामुळे नायक सकाळी घरी येतो व बायकोला थाप मारतो की, मी रात्री चंपक भूमिका नामक मित्राकडे होतो व पुढे अनेक अनपेक्षित घटना घडल्याने गोंधळ उडतो. या नाटकात स्वतः किशोर प्रधान, शोभा प्रधान, कमलाकर नाडकर्णी, नयनतारा, मंदाकिनी भडभडे, मंदा देसाई आदी कलाकार होते. मराठीत हे विनोदी नाटक खूप लोकप्रिय झाले होते. याच नाटकावरून राजेंद्र भाटिया यांनी 'आज की ताजा खबर' हा चित्रपट तयार केला होता. त्यात किरणकुमार, राधा सलुजा, असरानी, मंजू बंसल, आय.एस. जोहर यांनी भूमिका केल्या होत्या. हा चित्रपट २४ ऑगस्ट १९७३ मध्ये प्रदर्शित झाला होता. यात 'चंपक भूमिया' ची भूमिका असरानी यांनी करून धमाल उडवून दिली होती. त्यावर्षीच्या सर्वोत्कृष्ट विनोदी भूमिकेचे फिल्मफेअर ॲवॉर्ड असरानी यांना मिळाले होते. याच कथेवर आधारीत गुजराथीमध्ये 'चाकडोल' हे नाटक व पुन्हा मराठीमध्ये 'फेकाफेकी' हा चित्रपट निघाला होता. 'आजकी ताजा खबर' मधील सहाय्यक भूमिकेत असलेल्या मंजू बन्सल यांच्याशी असरानी यांनी विवाह केला.

गुजराथीमध्ये 'आमदाबादनो रिक्षावालो' हा नायक म्हणून असरानीने केलेला चित्रपट खूप लोकप्रिय ठरला. त्यानंतर 'सात कैदी', 'संसारचक्र', 'पानखीनो मोलो', 'जुगलजोडी', 'माँबाप', 'छेल छबेलो गुजराथी', आदी चित्रपटात असरानी यांनी विनोदी भूमिका केल्या आहेत. दाक्षिणात्य निर्माते डी. रामानायडू यांनी त्यांच्या १९९५ सालच्या 'तकदीरवाला' या हिंदी चित्रपटात असरानी यांना महत्वपूर्ण भूमिका दिली. डेव्हीड धवन व प्रियदर्शन या दिग्दर्शकांनी त्यांच्या अनेक चित्रपटात असरानी यांना भूमिका दिल्या. 'जो जीता वही सिकंदर', 'गर्दिश', 'घरवाली बाहरवाली', 'बडे मियाँ छोटे मियाँ', व 'हिरो हिंदुस्तानी' या १९९० च्या दशकातील चित्रपटाप्रमाणे २००० सालातील 'हेराफेरी', 'चुपके चुपके', 'हलचल', 'दिवाने हुए पागल', 'गरम मसाला', 'भागम भाग', 'भुलभुलैय्या', 'दे दणादण', 'बोल बच्चन' आदी नवनवीन चित्रपटांतही त्यांनी आठवणीत राहतील अशा भूमिका केल्या.

हिंदी दूरदर्शनमालिका 'नटखट नारद', या मालिकेचे दिग्दर्शन असरानी यांनी केले होते. यात विक्रम गोखले, प्रेमा नारायण यांचेसोबत स्वतः असरानी यांनी नारदाचे काम केले होते. ही सिरीयल १९८५-८६ मध्ये चालू होती. असरानी यांनी १९७७ मध्ये स्वतः कथा-पटकथा लिहून 'चला मुरारी हिरो बनने', या हिंदी चित्रपटाची निर्मिती केली व त्यात नायकाचे काम केले. यामध्ये गावात राहणारा एक महत्वाकांक्षी तरूण जो अभिनेता होण्याची स्वप्ने पाहत असतो व त्याचे वडील त्याला घरचा पारंपारिक उद्योग सांभाळण्याच्या सूचना देत असतात. या तरूणाचा संघर्षमय प्रवास व त्याचे उद्दिष्ट साध्य करण्याचे कष्ट व पुर्तता या चित्रपटात दाखविण्यात आली होती. या चित्रपटात स्वतः असरानी, बिंदीया गोस्वामी, अशोककुमार, प्रेमनाथ, सीमी, जगदिप व बिंदू यांच्या भूमिका होत्या. या चित्रपटात धर्मेद्र, अमिताभ बच्चन, ऋषी कपूर व सुनील दत्त यांनी पाहुणे कलाकार म्हणून हजेरी लावली होती.

असरानी यांनी रमेश सिप्पी यांच्या गाजलेल्या भव्य चित्रपटात ज्याची गणना केली जाते त्या 'शोले' मध्ये जेलरचे काम केले होते. त्यांची छबी चार्ली चॅप्लिनच्या 'ग्रेट डिक्टेटर' (हिटलर) सारखी करण्यात आली होती. त्यातील 'मै अंग्रेजोंके जमानेका जेलर हूँ' हे त्याचे लालुपद खूप प्रसिद्ध झाले होते. त्यानंतर १९७७ साली आलेल्या 'बालिका वधु' या शक्ती सामंता दिग्दर्शित चित्रपटातील 'शरत' या भूमिकेला उत्कृष्ट भूमिकेचे फिल्मफेअर असरानी यांना मिळाले होते.

असरांनी यांनी आपल्या सिनेकारकिर्दीत एकूण सहा चित्रपटांचे दिग्दर्शन केले होते. त्यात 'चला मुरारी हिरो बनने, १९७७', 'सलाम मेमलाब- १९७९', 'हम नही सुधरेंगे'- १९८९, 'दिल ही तो है'- १९९२, 'उडान'- १९७७, व 'अमदाबादनो रिक्षावाला-१९९०' (गुजराथी चित्रपट) या चित्रपटांचा समावेश आहे. •

## रुपेरी पडद्यावरील अजिंक्यतारा "अजित"

**श्रीराम शेटये**

एखाद्या चित्रपट अभिनेत्याच्या जीवनाची सुरूवात खरंच त्याच्या चित्रपटातील तो करीत असलेल्या पात्रासारखीच असेल तर? खरच 'अजित' यांची जीवन कहाणी अगदी सिनेमातल्या पात्रासारखीच आहे.

हमिद अली नावाचा एक तरूण मुंबईत येतो. आपली शाळेची पुस्तक विकून वडिलांना न सांगता घर सोडून मुंबईत पळून येतो. त्याला चित्रपटात काम करण्याचे वेड असते.

मुंबई आल्यावर महमद अली रोडवर नाल्यासाठी वापरण्यात येणाऱ्या फूटपाथ वरच्या पाईपमध्ये झोपून दिवस काढतो. तेथेही. तेथील गुंडाचा म्होरक्या हमिद अलीकडे पाईपमध्ये झोपण्याचा हप्ता मागतो. मग हमिद अली त्या गुंडाची पिटाई करतो. सगळे हमिद अलीला घाबरू लागतात. मग हमिद अली त्या म्होरक्याची जागा घेतो. ही अजितच्या आयुष्याची खरी कहाणी. पूढे जाऊन प्रसिद्ध सिने निर्माता 'महेश भट' यांचे वडील सिने दिग्दर्शन 'नानाभाई भट' हमिद अली हे नाव बदलून 'अजित' हे छोटे नाव ठेवतात. हिंदी चित्रपटसृष्टीत केवळ आपल्या संवादफेकीने ओळखले जाणारे मोजके कलाकार आहेत. त्यात खलनायक अजित म्हणजे संवादफेकीचे बादशहाच म्हणावे लागेल. २२ ऑक्टोबर अजित यांचा स्मृतिदिवस. आपल्या विशिष्ट संवादफेकीमुळे अजित ओळखले जातात. मात्र चित्रपटसृष्टीत येण्यासाठी त्यांना मोठा संघर्ष करावा लागला आहे. २७ जानेवारी १९२२ मध्ये गोवलकोंडा जन्मलेले हामिद अली खान उर्फ अजित यांना लहानपणापासून अभिनयाची आवड होती. त्यांचे वडील बशीर अली खान हैद्राबाद येथे निजामाच्या सैन्यात काम करीत होते. अजित यांचे प्रारंभिक शिक्षण आंध्रप्रदेशातील वारांगल जिल्ह्यात पूर्ण झाले. चाळीसच्या दशकात नायक बनण्यासाठी त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीकडे आपली पावले वळवली. १९४६ मध्ये त्यांना पहिला चित्रपट मिळाला शाहे मिस्त्र.

१९४६ ते १९५६ या दरम्यान अजित हिंदी चित्रपटसृष्टीत काम मिळविण्यासाठी संघर्ष करीत होते. शाहे मिस्त्र नंतर त्यांना ज्या ही भूमिका मिळत गेल्या त्या ते स्वीकारत गेले. त्यात पतंगा, जिद, सरकार, सईयां, तरंग, मोतीमहल, सम्राट और तीरंदाज असे अनेक चित्रपट केले. मात्र ते बॉक्स ऑफिसवर खास चालले नाही. दिग्दर्शक नानाभाई भट यांनी त्यांना त्यांचे नाव हामिद अली खान ठेवण्यापेक्षा एक छोटे नाव ठेवण्याचा सल्ला दिला. त्यांचे 'अजित' अस नविन नामकरण झाले.१९५७ मध्ये बी.आर. चोपडा यांचा नया दौर या चित्रपटात ग्रामीण युवकाच्या भूमिकेत अजित दिसले. ही भूमिका ग्रे शेड्स असलेली होती. चित्रपट नायक दिलीपकुमार यांच्यावर केंद्रीत होता पण दिलीपकुमार यांच्या उपस्थितीत अजित आपल्या भूमिकेमुळे प्रेक्षकांच्या लक्षात राहिले. यानंतर मात्र त्यांनी निश्चय केला की, नायक होण्यापेक्षा खलनायकाची कामे करुन आपला अभिनय प्रेक्षकांपुढे ठेवायचा. त्यानंतर ते खलनायकाची भूमिका मिळविण्यासाठी प्रयत्न करीत होते. १९६० मध्ये मुगले आजम या गाजलेल्या चित्रपटात त्यांना भूमिका मिळाली. पुन्हा समोर होते अभिनय सम्राट दिलीपकुमार मात्र या ही वेळेस अजित आपल्या छोट्या पण महत्वपूर्ण भूमिकेतून प्रेक्षकांच्या लक्षात राहिले. त्यानंतर त्यांना जिंदगी और ख्वाब, हिमालय की गोद में, सूरज, प्रिन्स, आदमी और इंसान या सारखे गाजलेले चित्रपट मिळाले. या यशाच्या जोरावर एक खलनायक म्हणून अजित आपल्या अभिनयाने प्रेक्षकांचे मनोरंजन करु लागले. १९७३ हे वर्ष अजित यांच्या सिने करियरमध्ये महत्वाचे वर्ष ठरले. या वर्षी त्यांच्या खलनायक म्हणून जंजीर, यादों की बारात, समझौता, कहानी किस्मत की आणि जुगनू हे चित्रपट आले आणि त्यांनी यशस्वीतेचे नवीन किर्तीमान स्थापन केले. अजित आता खलनायक म्हणून अशा टिकाणी पोहचले होते ज्याचे त्यांनी स्वप्न पाहिले होते.



अजित यांना त्यांच्या भूमिकांमधील सर्वात जास्त आवडणारी भूमिका म्हणजे निर्माता दिग्दर्शक सुभाष घई यांच्या १९७६ मध्ये आलेल्या कालीचरण या चित्रपटातील लॉयनची भूमिका खास आवडते. यानंतर त्यांच्या नावापुढे लॉयन जोडलेच गेले. या चित्रपटांतील त्यांचा संवाद 'सारा शहर मुझे लॉयन के नाम से जानता है' आजही लोकप्रिय आहे. या व्यतिरिक्त 'लिली डोंट बी सिली' किंवा 'मोना डार्लिंग' हे संवादही प्रेक्षकांमध्ये लोकप्रिय आहेत. कालिचरणच्या यशानंतर अजित यांच्या करियरमध्ये जबरदस्त बदल झाला. ते खलनायकांच्या दुनियेचे बेताज बादशहा झाले त्यानंतर त्यांनी मागे वळून कधी पाहिलेच नाही.

नायकाची भूमिका उठावदार होण्यामागे खलनायकाचे मोठे योगदान असते. अजित यांच्या खलनायकासमोर धर्मेंद्र नेहमीच नायक म्हणून सुपरहिट ठरले आहेत. धर्मेंद्र यांच्यासोबत यादो की बारात, जुगनू, प्रतिज्ञा, चरस, आजाद, रामबलराम, रजिया सुलतान, राजतिलक यासारखे अनेक हिट चित्रपट दिले आहेत. क्रूर खलनायकांच्या या जगात अजित यांचा स्टाइलिश खलनायक आपले वेगळेपण आणि आब राखून होता.

९० च्या दशकात अजित यांची तब्येत वारंवार खराब होत असल्यामुळे त्यांनी चित्रपटातून कामे करणे कमी केले. तरीही १९९२ मध्ये जिगर, १९९३ मध्ये शक्तिमान, आदमी, १९९४ मध्ये आतिश, आ गले लग जा, बेताज बादशहा हे चित्रपट त्यांनी केले. आपल्या संपूर्ण चित्रपटसृष्टीतील वाटचालीत २०० चित्रपटातून काम करणाऱ्या अजित यांनी २२ ऑक्टोबर १९९८ रोजी शेवटचा श्वास घेतला. अजित आपल्या अभिनयाचा ठसा चित्रपट इतिहासात अजरामर करून गेले. •

## बंगलौरचा अनुभव

**वर्षा कुवळेकर**

प्रवासाचा तिसरा टप्पा होता कुर्ग. चिकमंगळूर रिसॉर्टमधून निघायचे तर होते परंतु मन भरले नव्हते. तीन दिवस त्या सुंदर रस्त्यावरून येताना शेवटून दुसऱ्या वळणावर एक पांढरेधोप छोट्याशा मंदिरासारखे दिसणारे घर होते. त्यासमोर पांढऱ्या चाफ्याचे झाड. ते पाहून मला वाटायचे नक्कीच शिवमंदिर असेल. रोज ते घर बंदच दिसले. एकदा शुभा म्हणाली, ''देवीचे मंदिर बघ, बंदच आहे.'' म्हटलं, '' तुला कुठे दिसली ग देवी?''

''असाच अंदाज.''

हसण्याचा ठहाका. आज उगीच निघताना कोणत्या बाप्पाचे आहे हे देऊळ, का बरं बंद आहे? अशी हुरहूर लागून राहिली. असो. पुन्हा सामानाने गच्च भरलेली गाडी आणि पाच सहा तासांचा प्रवास. तेच प्लॅनिंग. वाटेत एकदोन ठिकाणे भेटी द्यायच्या आणि संध्याकाळी मुक्काम गाठायचा.

कुर्गला आम्ही दोन दिवस राहणार होतो. आज जाताना वाटेत आधी तिबेटीयन गोल्डन टेम्पल बघायचे असा बेत श्रीनिवास यांनी सांगितला. ही गावांची नावे मात्र अजिबात लक्षात राहत नाहीत. त्याही वेळी तीनतीनवेळा विचारायचं पण उच्चार चुकायचे.

या गावात भरपूर स्थलांतरित तिबेटी लोक वास्तव्याला आलेले आहेत. भारत सरकार यांना सांभाळते आहे. एक गावच जणू यांनी वसवले आहे. ठराविक पद्धतीची त्यांची ती मॉनेस्ट्री आहे. फार विशेष बघावे असे काही नाही तिथे वाटले. परिसर फार मोठा आहे. सुंदर राखलेली बाग आहे. ती फुलेच आम्ही जास्त एन्जॉय केली. त्यानंतर हे आमचे डेस्टिनेशन होते. एका छोट्याशा बोटीतून पलिकडे जंगलात जायचे होते. रांग लावून त्या हिरवट, गढूळ पाण्यातून पलिकडे उतरलो. बरेच टुरिस्ट असल्याने गर्दी होती. हत्तींच्या मानाने आकाराने लहानखोर वाटणारे हत्ती तिथे दिसले. दुपारची वेळ झाल्याने एरवी त्याची आंघोळ, खाणे असे कार्यक्रम टुरिस्टांना दिसतात त्यावर फुली पडली होती. तुरळक पाय बांधून ठेवलेले पाठमोरे काही हत्ती दिसले. काही सामोरे ही आले. लाकडी कंपाऊंड मधून आपल्या लांब सोंडा बाहेर काढून खायला काही मिळण्याची अपेक्षाच ते करत होते. मला ते बघून उगीच कसेतरी झाले. गजराज आपल्या ऐटीत चालत असतात तेच छान वाटते.. महाकाय आणि बुद्धिमान असा हा प्राणी इथे उगीच दीनवाणा वाटला. नाही आवडले मनाला.

एकूण पंधरा सोळा हत्ती दिसले. त्यांना सांभाळणारे लोकांकडे पाठ करून बसले होते. उत्तरे देतच नव्हते. भाषा इल्ले. लाकडी फळ्यांच्या बांधलेल्या घरात दुरून हत्तींची हालचाल जाणवली पण ते मुळीच बाहेर यायला तयार नव्हते. एकूण अगदीच निरुत्साही अशी ही भेट ठरली. तिथे आलेले एक तरुण जोडपे म्हणाले की कदाचित दसऱ्याला मैसुरला हत्तींची मिरवणूक असते. त्यासाठी इथून ट्रेनिंगसाठी आधीच हत्ती रवाना झाले असतील. असेलही. खात्रीपूर्वक काहीच समजले नाही त्यामुळे गाडी गाठली. हे आमचे राहण्याचे ठिकाण होते. चिकमंगळूर पेक्षा अधिक घनदाट जंगलात गाडी शिरली. गच्च रान. त्यातून सुंदर रस्ते. वरवर चढत जाणारा रस्ता. आमचे रिसॉर्ट खरोखर. तिथे पोहोचलो आणि कमालीचे खुश. सगळा स्टाफ अत्यंत अगत्यशील. सामोरे येऊन चौकशी, स्वागत. आमच्या खोल्यांमधून शिरलो. आधी विस्तीर्ण बाल्कनी. त्यातून समोर दिसणारे विहंगम दृश्य पाहून, ''आई ग , किती सुंदर,'' हाच उद्गार. नुसते अगदी नुसते घनदाट जंगल. नजर पोहोचेल तोवर नुसते सुरेख जंगल. आम्ही कितीतरी वेळ बाल्कनीतच खुर्च्या टाकून बसलो. जसजशी रात्र वाढू लागली आता, ''आई ग, किती सुंदर''ची जागा, ''बापरे'' ने कधी घेतली कळलेच नाही. अंधार गुडूप आणि समोर पसरलेले अतिविशाल जंगल. किती आणि कोणते प्राणी असतील इथे, विचाराने सुद्धा भीती वाटली. कमालीची थंडी. बाल्कनीत तर वाऱ्याचे झोत. सहन न होण्यासारखे. मुकाट्याने खोलीत आलो. डिनर सुंदर झाले. कॅम्प फायर त्या थंडीत हवेहवेसे. शेफ ने आवर्जून गरमागरम स्टार्टर्स पाठवले. जेवणही मस्त. मग रमीचे डाव रंगले. खूप दिवसांनी पत्ते खेळण्याचा मनसोक्त आनंद लुटला. दुसऱ्या दिवशी बाबा मलयंगिरी बघायला गेलो. एका विशिष्ट जागेपर्यंत आपली गाडी जाते. तिथून कम्पल्सरी जीप असतात त्यातूनच जावे लागते. पाचही जणी एका जीपमधून निघालो. पावसाने जोर धरला होताच. अतिशय अरुंद दरी डोंगराच्या रस्त्यावरून वरती जाताना धुक्यानेही वेढले आम्हाला. दहा मिनिटात तिथे पोहोचलो . तिथे साडेचारशे पायऱ्या चढून वर मंदिरात जायचे होते. चढायला लागलो खऱ्या, पण अक्षरशः ढग उतरले खाली. आम्ही ढगातून चालत होतो. तो थंड पाण्याचा स्पर्श अविस्मरणीय केवळ. ढग इतके दाट की चार फुटावरचे काही दिसेना. नसते साहस नको, पडलो बिडलो तर नसती आफत येईल असा विचार करतच होतो तेव्हढ्यात वरून खाली येणारी मंडळी, ''नका जाऊ वर, काहीच दिसत नाहीये'' सांगू लागली. शहाण्या मुलींसारख्या आपल्या परत फिरलो. ढगातून चालायचा भन्नाट अनुभव मात्र पदरी पडला. खुश झालो.

असेच एक सुबक छोटेसे मंदिर पाहिले. शिवाचे. बाहेर असलेला इथला नंदी अगदी वेगळाच. तो छानच लक्षात राहिला. त्याभोवतीचा परिसर फार फार सुंदर. पाऊस पडत होताच. त्याने आमची साथ सोडलीच नाही. प्रेक्षणीय स्थळ बघायला निघालो, गाडीतून चाललोय, पाऊस लापता. त्या त्या जागी आम्ही पोहोचलो आणि गाडीतून उतरायची वेळ आली की वर्षाव सुरू. जरा तारांबळ उडून दर्शन घेऊन पुन्हा गाडीत स्थानापन्न झालो की पाऊस गायब. हा पाठशिवणीचा खेळ सतत खेळत होतो. छत्र्या घेऊन मस्त व्हिडिओ केले. आम्ही न, उगीच रडत बसत नाही, असेल ते वातावरण मस्त एन्जॉय करतो. पाऊस तर पाऊस. फोटो येतात मस्त.

कुर्ग मध्ये अनेक कॉफी प्लांटेशन आहेत. त्यापैकी एक पाहण्याचा मोठा प्रोग्राम होताच. हे एक ट्रिपचे मोठे आकर्षण होते. श्रीनिवास अशाच एका प्लांटेशन मध्ये आम्हाला घेऊन गेले. तिथे गेल्यावर आधी गाईड लागवड दाखवायला घेऊन जातो. कॉफीचे अनेक प्रकार, त्यांची झाडे, वेलची, मसाला वेलची, पिवळ्या, लाल कोकमाची झाडे, दालचिनीची झाडे, अंजिराच्या लागवडी, अनेक प्रकारची निसर्ग संपत्ती आम्ही पाहिली. वेलचीच्या झाडाला वेलची कुठे येते हे माहितीच नव्हते कधी. जमिनीलगत खाली लगडलेली वेलची आणि मसाला वेलची पाहून खुळावलो आम्ही. वेलचीला इतके कमी उत्पन्न येते हे पाहिले. हे पदार्थ इतके महाग का याचे ज्ञान मिळाले.

त्यानंतर कॉफी तयार कशी करतात त्याचे प्रात्यक्षिक पाहिले. खरंच खूप नवीन माहिती मिळाली. कॉफीचे इतके प्रकार ऐकून अजब वाटले. त्यांचीच वायनरी सुद्धा आहे. खूप वेगळ्या तिथे उपलब्ध होत्या. टेस्ट करायचा आग्रह ही करत होते. आम्हाला त्यात काहीच गम्य नसल्याने पुढे निघालो.

कॉफी, वाइन पाहून वरच्या मजल्यावर जायचे होते. तिकडे विक्रीचे दुकान होते. कॉफीचे अनेक प्रकार, उत्तम क्वालिटीचे मसाल्याचे पदार्थ, विविध चॉकलेट्स, चंदन उदबत्ती, साबण, पावडरी अनेक गोष्टींची रेलचेल. पुन्हा नव्याने खरेदी झालीच. इथे अशा दुकानातून सर्रास कुरिअर सेवा उपलब्ध आहे. त्यामुळे खरंच सोपे जाते. अन्यथा उचलून आणणे हे आमच्या सारख्या सिनियर मंडळींना अवघड होते. खरेदी झाली की बायकांना आंतरिक समाधान मिळते हे खरं आहे बरं का!! समाधानाने पुढील प्रवासाला निघालो. या रस्त्यावर एक दोन गमती घडल्या. गाडी धावत असताना डाव्या बाजूला इवल्याशा पांढऱ्या फुलांचे दर्शन कल्पनाला झाले. ''अरे? इथे गुलछडीचे शेत आहे की काय?'' तिचा प्रकट उद्गार. तिच्या मागील सीटवरील सुलभाला फारच किरकोळ दर्शन झाले होते त्याच फुलांचे.

''अग नाही गुलछडी नाही हे तर वेलचीचे फूल.'' इति सुलभा. आम्ही बाकीच्या नुसतेच प्रश्नांकित चेहरे करून. श्रीनिवास शांतपणे म्हणाले, ''टोबॅको हैं.''

अरेच्या!. शुभाची इंस्टंट प्रतिक्रिया, '' एक म्हणते गुलछडी, दुसरीची वेलची आणि निघावा तंबाखू?'' हसून सगळ्या लोटपोट. पण आम्ही कोणीच कधीच तंबाखूचे शेत पाहिले नव्हते. गाडी तंबाखूच्या शेतासमोर न्या. निमूट गाडी परत तिथे. तंबाखूच्या झाडाला खूप सुंदर गुलाबी झाक असलेली पांढरी नाजूक फुले आली होती. मात्र तंबाखूचा दर्प असह्य होता. वाळलेली पाने गोळा करणाऱ्या बायका वावरात होत्या, काही एका जवळच उभारलेल्या शेड मधे बसून वर्गीकरण करत होत्या. याच पानांचा तंबाखू होतो. ज्ञानप्राप्ती झाली. दुसरी एक आम्हाला खूपच हसवणारी गोष्ट म्हणजे रस्त्यावर आम्हाला अनेक प्रकारची पिके असलेली भरपूर शेती दिसली. अचानक त्या शेतात मध्यभागी एका डोळे वटारलेल्या बाईचा भीती वाटेल असा फोटो दिसायचा. हा काय प्रकार कळे ना. आपल्याकडे पाखरांना घाबरवायला बुजगावणे उभे करतात. ते आठवले, पण पाखरे वटारलेल्या डोळ्यांना का घाबरतील? एखाद्या चांगल्या घरावरही हा फोटो दिसला. आम्ही अंदाज वर्तवू लागलो. नजर लागू नये म्हणून असा फोटो लावला जातो हे श्रीनिवास यांनी सांगितले. ही मॉडेल तरी कोण याचे फार कुतूहल मनात सर्वांच्याच राहिले. त्या फोटोचा फोटो घेता आला नाही याची चुटपुट लागली. जमेल तेव्हा आम्हाला तो फोटो काढून पाठवा असे श्रीनिवासना सांगून आलो आहोत. अशी मजा. कॉफी प्लांटेशन नंतर आमचा बेत होता प्रसिद्ध अनुभवण्याचा.

''खूप छान आहे, जरूर बघाच हा.'' अशी टिप मिळाली होती. खूप उत्सुक होतो. दूरवरूनच धबधब्याची गाज आम्ही ऐकत होतो. तसतशी उत्कंठा वाढत होती. धबधब्यापासून गाडी बऱ्याच अंतरावर थांबते. तिथून सत्तर पंचाहत्तर पायऱ्या उतरून खाली जावे लागते समजले. गाडीतून उतरलो आणि पावसाची सर आली. छत्र्या सांभाळत निघालो. पायऱ्या नशिबाने चांगल्या सुटसुटीत आहेत. उतरताना अजिबात त्रास झाला नाही. फक्त ओल्या असल्याने आम्हाला सावधपणे चालावे लागत होते. जसजसे उतरत होतो पाण्याचा आवाज साद घालत होता. एका वळणावरून शुभ्र फेसाळ अनावर वाहणारा हा दुधाचा प्रवाह एकदम समोर आला. प्रसन्न झाले मन. आपल्या समोरून जराशाच उंचीवरून अखंड वेगाने उडी मारणारा जलप्रपात. खूप खूप मस्त वाटले. आलो त्याचे सार्थक झाले. तिथेच रेंगाळलो. पावसाला आमची दया आली थोडी. सर ओसरली. मनसोक्त आनंद घेऊ शकलो. बाजूला असणाऱ्या तरुणीला फोटो काढशील का ग विचारल्यावर तिने इतके सुंदर फोटो काढले आमचे की बस.

कुर्ग मधील नियोजित स्थलदर्शन पूर्ण झाले खरे. आम्ही राहिलो ती रिसॉर्ट्स इतकी सुंदर होती ना की मुक्काम संपूच नये असे वाटायचे. इलाज नव्हताच.

तिसऱ्या दिवशी अत्यंत समाधानाने निरोप घेतला. ते जंगल डोळ्यात आणि मनात साठवून घेतले. आता ते आमच्याबरोबर कायम असेल. **क्रमशः**

# बालांगण

## बासरी

**वाद्यांची ओळख**

**बा**सरी हे एक प्राचीन आणि अत्यंत गोड आवाज असलेले वाद्य आहे. भारतीय तसेच पाश्चात्त्य संगीतामध्ये बासरीचे महत्त्व मोठे आहे. बासरी वायुवाद्य प्रकारात मोडते. कारण यात फुंकर मारून हवेच्या सहाय्याने सूर निर्माण केले जातात. हिंदु धर्मात बासरीला खास धार्मिक आणि सांस्कृतिक स्थान आहे कारण भगवान श्रीकृष्ण हेमुरलीधरम्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या बासरीच्या स्वरांनी लोकांना आणि गाईंना मोहून टाकल्याच्या आ'यायिका आहेत. बासरी एक पोकळ नळी असते. त्यात ठराविक अंतरावर छिद्रे पाडलेली असतात. काही बासऱ्यांना ६ छिद्रे असतात तर काहींना ७ ते ८ छिद्रे असतात. एका टोकाला फुंकण्यासाठी उघड असते. आधुनिक काळात लाकूड, धातू किंवा प्लास्टिकच्या बासऱ्या देखील बनवल्या जातात. पण भारतीय शास्त्रीय संगीतात बांबूची बासरी जास्त प्रचलित आहे.बासरी वाजवण्यासाठी श्वास नियंत्रित करून छिद्रांवर बोटांचे दाब योग्य पद्धतीने ठेवावे लागतात. प्रत्येक छिद्र झाकल्यावर किंवा उघडल्यावर स्वरांची उंची बदलते. उजवा आणि डावा हात वापरून बोटांची हालचाल करावी लागते. बासरी वाजवताना फुंकर, बोटांचे वेग आणि श्वास यांचा सुंदर ताळमेळ आवश्यक असतो. भारतीय शास्त्रीय संगीत, लोकसंगीत, नाटक-सिनेमा, भजन-कीर्तन अशा अनेक प्रकारांमध्ये बासरीचा वापर होतो. हिंदुस्तानी संगीतातपं. हरिप्रसाद चौरसियायांचे योगदान विशेष उ'खनीय आहे. त्यांनी बासरीला आंतरराष्ट्रीय स्तरावर लोकप्रिय केले.बासरीचे सूर हे निसर्गाच्या शुद्धतेशी नाते सांगणारे आहेत. तिच्या गोड स्वरांमुळे ती नेहमीच भारतीय संगीताची शान राहिली आहे.



## हॅलोविनची गोष्ट

**आयरीश लोककथा**

**आ**यर्लंडमध्ये खूप वर्षांपूर्वी स्टिंजी जॅक नावाचा धूर्त आणि कंजूष माणूस राहत होता. एके दिवशी तो आयरीश चहा पीत बसला होता. त्यावेळी सैतान त्याला घेऊन जाण्यासाठी आला. ठीक आहे, पण जाण्यापूर्वी शेवटचा कपभर चहा पिऊ दे. जॅक न घाबरता म्हणाला. हा शेवटचा चहा आहे. त्यामुळे या चहाचे पैसे म्हणून तूच एक रुपयाचे नाणे बन. नंतर चहावाल्याच्या ड्रावरमधून तू बाहेर ये आणि मला घेऊन जा. सैतानाने स्वत:ला एक रुपयाचे नाणे बनवले. पण स्टिंजी जॅकने ते नाणे आपल्या खिशातल्या क्रॉसजवळ घट्ट दाबून धरले. क्रॉसच्या भीतीमुळे सैतानाला नाण्याच्या रूपातून पुन्हा मूळ रूपात जाऊ येता येईना.



शेवटी सैतानाने जॅकला मुक्त करण्याची विनंती केली. आजपासून दहा वर्षे मला घेऊन जायचं नाहीस! जॅकने अट घातली. सैतानाला ती अट मान्य करावीच लागली.

दहा वर्षांनी सैतान पुन्हा आला. यावेळी जॅकने दुसरी युक्ती केली. मला नेण्याआधी झाडावरून एक सफरचंद तोडून दे. सैतान वर चढला. जॅकने झाडाच्या खोडावर मोठा क्रॉस कोरला. त्यामुळे सैतान झाडावरच अडकून बसला. शेवटी जॅकने त्याच्याकडून आणखी एक वचन घेतले. माझ्या मृत्यूनंतर मला नरकात नेऊ नकोस! पुढे जॅक मरण पावला. पण स्वर्गात त्याला जागा मिळाली नाही. वचन दिल्यामुळे सैतानाने त्याला नरकातही प्रवेश दिला नाही. मग तो बिचारा अंधारात अडकून पडला. दया येऊन सैतानाने त्याला एक लुकलुकती ठिणगी दिली. जॅकने ती भोपळ्यात ठेवून एक कंदील बनवला. लोक म्हणतात, नवीन कंदील मिळावा म्हणून हॅलोविनच्या दिवशी आजही जॅकचा आत्मा भोपळा शोधत फिरतो.



## सिंगल यूज प्लास्टिक करा हद्दपार !

**समाजभान**

**छो**ट्या दोस्तांनो, तुम्ही सिंगल यूज प्लास्टिकबद्दल ऐकलं असेल. सिंगल यूज म्हणजे एकदाच वापरता येणारं प्लास्टिक. प्लास्टिकचे डबे, बाटल्या तसंच इतर वस्तू कायमस्वरुपी किंवा काही वर्षं वापरता येतात. पण पिशव्या किंवा एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या वस्तू आपण टाकून देतो. हे प्लास्टिक नष्ट होत नाही. प्लास्टिकच्या पिशव्या जनावरांच्या पोटात जातात. प्लास्टिकमुळे पर्यावरणाचं प्रचंड नुकसान होतं. म्हणूनच या प्लास्टिकचा वापर टाळायला हवा. एकदाच वापरलं जाणारं प्लास्टिक 'फॉसिल फ्युअल'पासून तयार केलं जातं. अशा प्लास्टिकमुळे कार्बन उत्सर्जनाचं प्रमाण वाढतं. आपण कचरा म्हणून टाकलेलं प्लास्टिक वातावरणात १०० वर्षांपेक्षा जास्त वेळ टिकून राहतं. या प्लास्टिकचा पुनर्वापर होत असला तरी त्याचं प्रमाण खूप कमी आहे. प्लास्टिकमधल्या घातक रसायनांचा अन्न, पाणी आणि विविध पेयांशी संपर्क येतो. त्यामुळे प्लास्टिकध्ये पदार्थ फार काळ साठवून ठेऊ नयेत. प्लास्टिकमुळे शरीरातल्या हार्मोन्सवर परिणाम होतो. यामुळे कॅन्सरही होऊ शकतो. समुद्राच्या तळाशी मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक सापडतं. या प्लास्टिकमुळे समुद्राचं प्रदूषण होत आहे. सागरी जीवांचं आरोग्य धोक्यात आलं आहे. या कारणामुळे आपण सिंगल यूज प्लास्टिक हद्दपार करणं गरजेचं आहे.





## ऐतिहासिक वारसा जपणारं पाटणा

**सफर शहरांची**

**मि**त्रमैत्रिणींनो, पाटणा ही बिहारची राजधानी. आजचं पाटणा म्हणजे पूर्वीचं पाटलीपुत्र. पाटलीपुत्र ही मौर्य साम्राज्याची राजधानी होती. म्हणूनच या शहराला ऐतिहासिक महत्त्व आहे. आर्यभट्ट पाणिनी, चाणक्य, कालिदास आणि वात्स्यायन ही महान व्यक्तिमत्त्वं मुळची पाटण्याची. इथे महात्मा गांधींचा ७० फूट उंच पुतळा आहे. हा गांधीजींचा जगातला सर्वात उंच पुतळा आहे. बोधगया हे स्थान बौद्ध धर्मियांच्या दृष्टीने खूप महत्त्वाचं मानलं जातं. गौतम बुध्द यांनी याच ठिकाणी बोधीवृक्षाखाली बसून तपश्चर्या केली. इथेच त्यांना ज्ञानाची प्राप्ती झाली. बोधगया हे स्थान जगभरातल्या पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र आहे. देश-विदेशातले पर्यटक इथे मोठ्या संख्येने येतात. इथे गोलघर नावाचं ठिकाण आहे. १७८६ मध्ये हे गोलघर बांधण्यात आलं.

पाटणा शहरात चार नद्या आहेत. गंगा, सोन, गंडक आणि पुनपुन अशा चार नद्या या शहरातून वाहतात. देशाच्या स्वातंत्र्य चळवळीतही पाटण्याने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. चंपारण आणि 'भारत छोडो' या दोन्ही आंदोलनांमध्ये पाटण्याने मोठं योगदान दिलं होतं. असं हे पाटणा अनोखं शहर आहे.

## ठिपके जुळवा



## भारताची देवनदी - गंगा

**नद्यांची गोष्ट**

**गं**गा नदी भारतातील सर्वांत पवित्र आणि महत्त्वाची नदी मानली जाते. भारताच्या उत्तर भागात हिमालयातून तिचा उगम होतो. उत्तराखंड राज्यातील गंगोत्री हिमनदीपासून गंगा नदीला सुरुवात होते. सुरुवातीला तिला 'भागीरथी' म्हणतात. अलकनंदा नावाच्या दुसऱ्या प्रवाहाशी ती देवप्रयाग येथे मिळते आणि त्या नंतर तिला गंगा हे नाव मिळते. हिमालयातून खाली उतरून ती गंगेच्या मैदानात प्रवेश करते. हा प्रदेश खूप सुपीक आहे आणि त्यामुळे येथे मोठ्या प्रमाणावर शेती केली जाते.गंगा नदी सुमारे २५०० किलोमीटर लांबीची आहे. ती भारत आणि बांगलादेश या देशांतून वाहते. भारतात गंगा नदी उत्तराखंड, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड आणि पश्चिम बंगाल या राज्यांतून जाते. पुढे ती बांगलादेशात प्रवेश करते. तिथे तिला 'पद्मा' म्हणून ओळखतात. गंगा आणि ब'ह्मपुत्रा यांच्या संगमातून 'सुंदरबन डेल्टा' म्हणतात. हा डेल्टा जगातील सर्वांत मोठा डेल्टा मानला जातो.अखेरीस गंगा बंगालच्या उपसागरात मिळते.वाराणसी, प्रयागराज, हरिद्वार ही गंगेच्या काठावरील महत्वाची शहरे आहेत. पौराणिक समजुतीनुसार गंगेत स्नान केल्याने पापांचा नाश होतो. त्यामुळे भक्त गंगेत स्नान करून पुण्य मिळवतात. गंगेच्या काठी अनेक मोठी मंदिरे आणि धार्मिक स्थळे आहेत. पण आज गंगा नदीसमोर प्रदूषण ही मोठी समस्या आहे. शहरातील सांडपाणी, कारखान्यांचा कचरा आणि प्लास्टिक यामुळे गंगेचे पाणी दूषित झाले आहे. सरकारने 'नमामी गंगे' सारखी योजना सुरू केली आहे. ज्यातून नदी शुद्ध करण्याचा प्रयत्न चालू आहे. लोकांनीही गंगा स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करणे आवश्यक आहे.

## धिटुकला आदित्य

**छोटे उस्ताद**

**मु**लांनो, तुम्ही लहान मुलं खूप हुशार असता. शूरही असता. कठीण प्रसंगांमध्ये तुम्ही प्रसंगावधान दाखवता. अनेकांचे प्राण वाचवता. अशी धाडसी कामगिरी करणाऱ्या मुलांना सरकारतर्फे विशेष पुरस्कार दिला जातो. काही वर्षांपूर्वी अशा काही मुलांना पुरस्कार जाहीर झाला. त्यातल्या आदित्य या बालवीराविषयी...

आदित्य के. हा अवघ्या १५ वर्षांचा मुलगा. केरळचा आदित्य नेपाळला गेला होता. आदित्य आपल्या कुटुंबासह बसमध्ये बसला. बसच्या प्रवासाला सुरूवात झालं. पण या बसला अचानक आग लागली. सगळे प्रवासी घाबरून गेले. बसचा चालक प्रवाशांना त्याच अवस्थेत सोडून पळून केला. आदित्यसह बसमधल्या ४० प्रवाशांचा जीव धोक्यात होता. पण आदित्यने प्रसंगावधान दाखवलं. त्याने डोळे मिटले. शांतपणे विचार केला आणि बसची मागची काच फोडली. मग या खिडकीतून बसमधले प्रवासी बाहेर पडले. या मुलामुळे ४० लोकांचे प्राण वाचले. आदित्यला भारतीय वायूदलात जायचं आहे. देशाची सेवा करायची आहे. तो मुळातच शूर आहे. अशा शूर मुलांची आपल्या देशाला गरज आहे. आदित्यलाही हा पुरस्कार जाहीर झाला. पुरस्कार म्हणून मिळालेली रक्कम त्याने अभ्यासासाठी वापरली.



## चित्र रंगवा



## ओळखा पाहू

**जिज्ञासा**

१) व्हॉलीबॉलचा जन्म कोणत्या देशात झाला?
२) झुंबा काय आहे?
३) दिवसा चंद्रावरचं तापमान कमी असतं का जास्त?
४) पहिल्या महायुद्धाची सुरूवात कधी झाली?
५) आईस हॉकीच्या संघात किती खेळाडू असतात?
६) हवेची गती मोजण्यासाठी कशाचा वापर केला जातो?
७) एलपीजी हे कोणत्या दोन वायूंचं मिश्रण असतं?
८) जगातला सर्वात उष्ण खंड कोणता?
९) जगातला सर्वात लोकप्रिय खेळ कोणता?
१०) पाब्लो पिकासो कोण होता?

उत्तरं : १) अमेरिका २) नृत्याचा प्रकार ३) जास्त ४) १९१४ ५) सहा ६) अॅनेमोमीटर ७) प्रोपेन आणि ब्युटेन ८) आफ्रिका ९) सॉकर १०) चित्रकार



## क्रेझ कलीनरी आर्टसची

**कोण होणार?**

**छो**ट्यांनो, कलीनरी आर्टसबद्दल तुम्ही ऐकलं असेल. तुमच्यात कल्पकता असेल, रुचकर स्वयंपाक करायची आणि पदार्थ छान सजवून सादर करण्याची कला अवगत असेल तर तुम्ही कलीनरी आर्टसकडे वळू शकता. पेस्ट्री मेकिंग आणि बेकरी प्रोडक्ट्सच्या माध्यमातून कलीनरी आर्टसमध्ये करिअर करता येईल. पेस्ट्री आणि बेकरीचं क्षेत्र प्रचंड विस्तारलं आहे. त्यामुळे या क्षेत्रात येण्याआधी सगळ्या गोष्टींचा नीट विचार करा. तुम्हाला कशात रस आहे हे जाणून घ्या. बेकरीमध्ये वेगवेगळी उत्पादनं तयार होतात. तुम्ही केक, पेस्ट्री, बिस्किटं असे काही पदार्थ बनवू शकता. बेकरी उत्पादनाच्या क्षेत्रात प्रवेश करताना दीर्घकालीन उद्दिष्ट ठेवा. तुम्हाला केक आणि पेस्ट्री शेफ बनायचं आहे, स्वत:ची बेकरी सुरू करायची आहे का एखाद्या रेस्टॉरंटमध्ये काम करायचं आहे हे ठरवा. यासाठी थोडा वेळ घ्या. संशोधन करा. ऑनलाईन सर्च हा खूप चांगला मार्ग आहे. कलीनरी आर्टसचं प्रशिक्षण देणाऱ्या अनेक संस्था आहेत. तुम्ही चांगल्या संस्थेची निवड करा. यासाठी गूगल सर्च करता येईल. विविध संस्थांची, तिथल्या अभ्यासक्रमांची माहिती घेता येईल. यानंतरच प्रवेशाचा निर्णय घ्या. तुमच्या आवडीचं किंवा छंदाचं रुपांतर करिअरमध्ये करायचं असेल तर हा पर्याय अगदी चांगला आहे.

**दोस्त हे मस्त**

### 'द बंगाल कॅट'



छोट्यांनो, आपल्या घरात छानशी मनीमाऊ असावी, असं तुम्हाला वाटतं ना? मांजरांच्या अनेक प्रजाती आहेत. यापैकी एक म्हणजे बंगाल कॅट. या जातीची मांजरं खूप खेळकर असतात. त्यांना पळायला, झाडावर चढायला, खेळायला खूप आवडतं. या मांजरांची सारखी हालचाल सुरू असते. खूप गोंडस अशी ही मांजरं १२ ते १६ वर्षं जगतात.

**खादाडी**

### फ्रोजन बनाना सिरिअल पॉप्स



दोस्तांनो, नुसती केळी खाण्यापेक्षा थोडं ट्विस्ट देता आलं तर... मग फ्रोजन बनाना सिरिअल पॉप्स बनवून बघा. यासाठी पाऊण कप स्ट्रॉबेरी योगर्ट, दोन कप सिरिअल्स, चार मध्यम आकाराची केळी, आठ लाकडी पॉप स्टिक्स हे साहित्य घ्या. दोन वाट्या घ्या. एका वाटीत दही आणि दुसऱ्या वाटीत सिरिअल्स घ्या. केळ्यांचे दोन भाग करून घ्या. आता पॉप स्टिक्सना केळं अडकवा. ही केळी दह्यामध्ये बुडवा. केळ्यांना दही नीट लागायला हवं. यानंतर केळी सिरिअल्समध्ये घोळवा. आता ही सर्व केळी वॅक्स पेपरमध्ये गुंडाळा. तासभर फ्रीजमध्ये ठेवा. मग ही केळी हवाबंद कंटेनरमध्ये ठेवा. काही काळ ती फ्रीझरमध्ये ठेवा. गारेगार खा.

**स्टडी टिप्स**

### आत्मविश्वास बाळगा



छोट्यांनो, तुम्हाला एखादा विषय किंवा धडा नीट समजत नसेल तर अजिबात निराश होऊ नका. एखादा विषय येत नाही म्हणून अभ्यासच करायचा नाही, असं अजिबात करू नका. गणिताची भीती वाटत असली तरी तुम्हाला विज्ञानात गती असू शकते. तुमचं मराठी, इंग्रजी चांगलं असू शकतं. त्यामुळे या विषयांचा अभ्यास करा. गणिताची भीती का वाटते, हे समजून घ्या. गणिताचा सराव करा. भरपूर सरावानेच गणितातल्या भीतीवर मात करता येते, हे कायम लक्षात ठेवा. यामुळे तुमची भीती कमी होईल आणि भरपूर गुणही मिळतील.

**योगा टाईम**

### उंची वाढवायचीये...



मुलांनो, तुम्हाला उंची वाढवायची आहे का? मग काही योगासनं करा. भुजंगासनामुळे उंची वाढायला मदत होते. मेरूदंडासनही खूप उपयुक्त आहे. मेरूदंडासनामुळे पाठीचा कणा लवचिक होतो. यामुळे उंची वाढायला मदत होते. सर्वांगासन केल्यामुळेही उंची वाढायला मदत होते. मग काय, करणार ना ही आसनं?

# भारताचा किवींवर दणदणीत विजय

## • विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्यफेरीत धडक • प्रतिका-स्मृतीची तुफान फटकेबाजी

**| मुंबई | प्रतिनिधी |**

नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर खेळण्यात आलेल्या आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या २४ व्या सामन्यात भारताने न्यूझीलंडचा पराभव केला. भारताच्या उत्कृष्ट फलंदाजी आणि गोलंदाजीसमोर डीएलएस पद्धतीने न्यूझीलंडला ५३ धावांनी पराभव पत्करावा लागला. या विजयाने भारतीय महिला संघाचे उपांत्य फेरीत स्थान निश्चित झाले आहे.



न्यूझीलंडच्या हॅलिडेने ८४ चेंडूत ८१ धावा केल्या तर गेजने एक छोटीशी खेळी केली. ४४ षटकांत ३२५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या न्यूझीलंडने ८ बाद २७१ धावा केल्या. स्मृती मानधना (९५ चेंडूत १०९) आणि प्रतीक रावल (१३४ चेंडूत १२२) यांच्या शतकांच्या आणि जेमिमा रॉड्रिग्जच्या ५५ चेंडूत नाबाद ७६ धावांच्या जोरावर भारतानं ४९ षटकांत ३ बाद ३४० धावा केल्या. भारताच्या डावातील ४८ व्या षटकानंतर अचानक आलेल्या पावसामुळे सामना दोनदा विस्कळीत झाला. पहिला सामना भारताच्या डावातील ४८ व्या षटकानंतर झाला होता. मैदान ओले असल्याने एक तासाचा घेऊन सामना ४९ षटकांपर्यंत कमी करण्यात आला. १० मिनिटांच्या मध्यांतरात पुन्हा एकदा व्यत्यय आल्यानंतर सामना ४४ षटकांपर्यंत कमी करण्यात आला. त्यानंतर न्यूझीलंडला ३२५ धावांचे सुधारित लक्ष्य देण्यात आलं. पण, न्यूझीलंडला हे लक्ष्य पूर्ण करता आले नाही. क्रांती गौडने दुसऱ्या षटकात सलामीवीर सुझी बेट्सला १ धावेवर माघारी पाठवित न्यूझीलंडच्या फलंदाजीला खिंडार पाडले.

डकवर्थ लुईस नियमानुसार न्यूझीलंडसमोर ४४ षटकात ३२५ धावांचे सुधारित आव्हान ठेवण्यात आले. या धावांचा पाठलाग करताना न्यूझीलंडने शेवटपर्यंत झुंज दिली. पण धावांचे अंतर खूपच जास्त असल्याने न्यूझीलंडचा पराभव निश्चित होत गेला. न्यूझीलंडचा संघ ८ विकेट गमवून २७१ धावा करू शकली. भारताने हा सामना ५३ धावांनी जिंकला. या विजयासह भारताने उपांत्य फेरी गाठली आहे. पण अजूनही एक चमत्कारीक समीकरण आहे. पण हे समीकरण जुळून येणं कठीण आहे.

भारताने दिलेले आव्हान गाठताना न्यूझीलंडला सुरुवातीलाच धक्का बसला. दुसऱ्या षटकातील तिसऱ्या चेंडूवर सुजी बेट्स बाद झाली. अवघी एक धाव करून तिला तंबूत परतावे लागले. त्यानंतर एमेलिया केर आणि जॉर्जिया डिव्हाईन यांच्यात अर्धशतकी भागीदारी झाली. ही जोडी रेणुका सिंगने फोडली. सोफी डिव्हाई मैदानात आली पण काही खास करू शकली नाही. ६ धावांवर असताना रेणुका सिंगने तिचा त्रिफळा उडवला. पण चौथ्या विकेटसाठी भारतीय संघाला खूपच झुंज द्यावी लागली. एमलिया केर आणि ब्रूक हालिडे यांनी ५६ धावांची भागीदारी केली. स्नेह राणाने एमेलिया केरची विकेट काढली आणि भारतीय क्रीडाप्रेमींचा जीव भांड्यात पडला.

मॅडी ग्रीनही काही खास करू शकली नाही. १८ धावांवर असताना बाद झाली आणि न्यूझीलंडला पाचवा धक्का बसला. विकेट पडल्यानंतर धावांचे अंतर वाढत गेले. तसेच न्यूझीलंडवरील दबाव वाढत गेला. ब्रूक हालिडेने ८४ चेंडूत ९ चौकार आणि १ षटकार मारत ८१ धावांची खेळी केली. पण तिची विकेट पडली आणि सामना भारताच्या हातात पूर्णपणे गेला.

भारताची उपांत्य फेरीतील जागा निश्चित झाली आहे. पण अजूनही न्यूझीलंड आणि श्रीलंकेकडे संधी आहे. न्यूझीलंडचा शेवटचा सामना इंग्लंडशी, श्रीलंकेचा शेवटचा सामना पाकिस्तानशी आणि भारताचा शेवटचा सामना बांगलादेशसोबत होणार आहे. भारताने बांगलादेशविरुद्धचा सामना गमावला तर या दोन संघांना चमत्कारीक संधी मिळू शकते. शेवटचा सामना या दोन्ही संघांनी जिंकला तर भारत, न्यूझीलंड आणि श्रीलंकेचे प्रत्येकी ६ गुण होतील. पण नेट रनरेटच्या आधारावर चौथा संघ भारतच असू शकतो असे समीकरण आहे. भारताचा नेट रनरेट चांगला आहे. त्यामुळे भारताने सामना गमावला तरी नेट रनरेटच्या आधारावर तिकीट मिळेल.

### दमदार पुनरागमन

**भारताने श्रीलंका आणि पाकिस्तानविरुद्ध सलग विजयांसह स्पर्धेची सुरुवात केली. परंतु नंतर दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडविरुद्ध सलग तीन पराभवांना सामोरं जावे लागले. न्यूझीलंडविरुद्धचा हा सामना करो या मरो अशी परिस्थिती होती. या निर्णायक सामन्यात, भारताने प्रथम फलंदाजीने उत्कृष्ट कामगिरी केली आणि नंतर उत्कृष्ट गोलंदाजी शिस्त दाखवत न्यूझीलंडला हरवून दोन महत्त्वाचे गुण मिळवले. अशा प्रकारे, भारताने उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे.**

## दमदार पंचसाठी युवा बहरीनला रवाना

**| मुंबई | प्रतिनिधी |**

भारताचा २३ सदस्यीय युवा बॉक्सिंग संघ तिसऱ्या आशियाई युवा क्रीडा स्पर्धेत भाग घेण्यासाठी बहरीनची राजधानी मनामा येथे रवाना झाला आहे. या स्पर्धांचा शुभारंभ २३ ऑक्टोबरपासून होणार असून भारताने खेळाडू या मंचावर आपली ताकद दाखवण्यास सज्ज झाले आहेत.



संघात अलीकडेच आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रभावी कामगिरी करणारे ध्रुव खरब, उधमसिंह राघव, खुशी चंद, अहाना शर्मा आणि चंद्रिका भोरशी पुजारी यांसारखे प्रतिभावान खेळाडू सामील आहेत. जुलै २०२५ मध्ये झालेल्या आशियाई अंडर-१७ चॅम्पियनशिपमध्ये भारताने गाजवलेल्या ऐतिहासिक यशाची पुनरावृत्ती करण्याची या संघाकडून अपेक्षा आहे. स्पर्धेत भारताने तब्बल ४३ पदके जिंकत गुणतालिकेत दुसरे स्थान पटकावले होते. संघाची निवड या वर्षाच्या सुरुवातीला झालेल्या सहाव्या अंडर-१७ राष्ट्रीय बॉक्सिंग चॅम्पियनशिपमधील कामगिरीच्या आधारे करण्यात आली. सुवर्णपदक विजेत्यांना थेट संघात स्थान देण्यात आले, तर रौप्यपदक विजेत्यांची राखीव खेळाडू म्हणून निवड झाली.

भारताचा संघ अंडर-१७ वयोगटातील १४ वजन गटांमध्ये आपली दमदार आव्हानं उभी करणार आहे.

## विराज धावण्याच्या स्पर्धेत प्रथम

**| तळा | प्रतिनिधी |**

रातवड हायस्कूलच्या इयत्ता दहावीतील विराज संजय पवार या विद्यार्थ्याने ३००० मीटर धावणे स्पर्धेत रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. छत्रपती शिक्षण मंडळ कल्याणच्या माध्यमिक विद्यामंदिर रातवड येथील इयत्ता दहावीचा विद्यार्थी असलेल्या विराजने जिल्हा स्तरावरील क्रीडा स्पर्धेत जिल्ह्यात सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळवित शाळेसह गुरुजन-आईवडिलांचे नाव उज्वल केले आहे. जिल्हास्तरावर यश मिळविल्यामुळे आता त्याची विभाग स्तरावरील स्पर्धेत निवड झाली आहे. त्याने मिळविलेल्या यशाबद्दल अनेकांनी त्याचे अभिनंदन केले आहे.



## आशियाई तायक्कांदो स्पर्धेसाठी ६ खेळाडूंची निवड

**| डोंबिवली | प्रतिनिधी |**

तायक्कांदोच्या क्षेत्रात महाराष्ट्राने एक अभूतपूर्व इतिहास रचला आहे. राज्यातील ६ खेळाडूंची आशियाई युवा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धा २३ ते २६ ऑक्टोबर दरम्यान बहरीन येथे संपन्न होणार आहेत. महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रासाठी हा अत्यंत अभिमानाचा क्षण मानला जातो. कारण राज्यातील प्रथमच अशी लक्षणीय कामगिरी तायक्कांदोच्या ६ खेळाडूंनी नोंदविली आहे. राष्ट्रीय स्तरावरील अत्यंत कठोर आणि स्पर्धात्मक निवड प्रक्रियेनंतर या युवा खेळाडूंनी भारतीय संघात आपले स्थान निश्चित केले आहे. निवड झालेल्या खेळाडूंमध्ये प्रिशा शेट्टी, धनश्री पवार, किसारा थानोजी साई रेड्डी, अक्षरा शानबाग, आर्यन जोशी, समर्थ गायकवाड यांचा समावेश आहे. गेल्या दोन महिन्यांपासून हे युवा खेळाडू उत्तरप्रदेश राज्याच्या लखनऊ येथील भारतीय क्रीडा प्राधिकरण केंद्रात प्रशिक्षण घेत आहेत. या सर्व खेळाडूंचा प्रवास, निवास, भोजन आणि प्रशिक्षणाचा सर्व खर्च भारत सरकारच्या युवा क्रीडा मंत्रालयाकडून केला जात आहे. भारतीय ऑलिम्पिक संघटना आणि भारतीय क्रीडा प्राधिकरणाने नवी दिल्ली येथे निवड झालेल्या खेळाडूंचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. या सोहळ्यात महाराष्ट्रातील खेळाडूंच्या उत्कृष्ट कामगिरीचे विशेष कौतुक करण्यात आले. महाराष्ट्रातील दोन प्रशिक्षकांचीही आशियाई युवा क्रीडा स्पर्धांसाठी निवड झाली आहे. प्रणव निवांगुणे, राजन सिंग हे दोघे प्रशिक्षक म्हणून काम पाहणार आहेत. या यशात इंडिया तायक्कांदोचे अध्यक्ष नामदेव शिरगावकर आणि तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष संदीप ओंबासे यांचीही मोलाची भूमिका राहिली आहे.



## यू मुंबावर युपी योद्धाज पडले भारी

### पराभवामुळे टॉप-४ ची संधीही हुकली

**| मुंबई | प्रतिनिधी |**

प्रो कबड्डी लीग २०२५ स्पर्धेत गुरुवारी दुसरा सामना युपी योद्धाज आणि यू मुंबा या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात युपी योद्धाजचा संघ यू मुंबावर भारी पडला आहे. यू मुंबाने हा सामना ३५-३२ च्या गुणांसह ३ गुणांनी आपल्या नावावर केला. हा या हंगामातील युपी योद्धाजचा यू मुंबावर सलग दुसरा विजय आहे. या पराभवासह यू मुंबाची टॉप ४ मध्ये जाण्याची संधी हुकली आहे. या सामन्यात यू मुंबाने पकड करत संघाचं खातं उघडलं. त्यानंतर अजित चौहानने चढाईत १ गुण घेत संघाच्या खात्यात भर घातली. पूर्वार्धातील २० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर दोन्ही संघ १७-१७ गुणांनी बरोबरीत होते. उत्तरार्धातील सुरुवातीच्या काही मिनिटांमध्ये दोन्ही संघांमध्ये अटीतटीचा सामना रंगला. उत्तरार्धातील सुरुवातीच्या ५ मिनिटांचा खेळ झाल्यानंतर युपी योद्धाजचा संघ २१-१९ गुणांसह २ गुणांनी आघाडीवर होता. सामन्यातही शेवटची ५ मिनिटे शिल्लक असताना युपी योद्धाजचा संघ ३१- २५ गुणांसह ६ गुणांनी आघाडीवर होता. शेवटी युपी योद्धाजने यू मुंबावर ३५-३२ गुणांसह ३ गुणांनी विजय मिळवला.



## भारतात फिडे चेसचे आयोजन




**| पणजी | वृत्तसंस्था |**

तब्बल २३ वर्षांनंतर पुन्हा एकदा फिडे बुद्धिबळ वर्ल्डकपचे भारतात (गोव्यात) आयोजन होत आहे. त्यामुळे प्रत्येक भारतीयाचे स्वप्न साकार झाले आहे. मंगळवारी वर्ल्डकपचा लोगो आणि गीताचे अनावरण मुख्यमंत्री डॉ. सावंत व क्रीडामंत्री डॉ. रमेश तवडकर यांच्या हस्ते झाले. आयोजनामुळे गोव्याच्या पर्यटनाला चालना मिळून आंतरराष्ट्रीय मैत्री संबंध मजबूत होतील. तसेच, स्थानिकांना रोजगार मिळेल, असे मुख्यमंत्री डॉ. सावंत म्हणाले. बुद्धिबळ वर्ल्डकप यावर्षी ३१ ऑक्टोबर ते २७ नोव्हेंबर या काळात हडफडे बार्देश येथील रिसॉर्ट रिओ येथे होणार असून, ८२ देशांतील २०६ खेळाडू यात सहभागी होतील.

### स्पर्धेने दिले अनेक कोहिनूर | २०० पेक्षा अधिक संघ होणार सहभागी

# मुंबईचे शालेय क्रिकेट रचणार नवा इतिहास

**| मुंबई | प्रतिनिधी |**

**हॅरिस शील्ड हे मुंबईतील एक प्रतिष्ठित आंतरशालेय क्रिकेट स्पर्धा आहे, १८९७ पासून मुंबई स्कूल गेम्स असोसिएशनद्वारे आयोजित केली जाते. ही स्पर्धा अनेक प्रसिद्ध क्रिकेटपटूंना घडवण्यासाठी ओळखली जाते. यात भाग घेणाऱ्या संघांसाठी ही एक मोठी संधी आहे. या स्पर्धेमुळे तरुण खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर खेळण्याची संधी मिळते.**

क्रिकेट विश्वातील सर्वाधिक जुनी आणि प्रसिद्ध असलेली मुंबई शालेय क्रीडा संघटनेची (एमएसएसए) हॅरिस शील्ड आणि गाईल्स शील्ड ही आंतरशालेय क्रिकेट स्पर्धा नवा इतिहास रचणार आहे. या वर्षी प्रथमच हॅरिस शील्डमध्ये २०० पेक्षा अधिक शालेय संघांनी सहभाग नोंदवत सर्वोच्च संघांच्या विक्रमाची नोंद केली आहे. तसेच गाईल्स शील्डमध्येही विक्रमी संघांनी सहभाग नोंदवल्याची माहिती



एमएसएसएचे क्रिकेट सचिव नदीम मेमन यांनी दिली. एमएसएसएच्या हॅरिस आणि गाईल्स शील्ड क्रिकेटला जगभरात मानाचे स्थान आहे. मुंबईच्या क्रिकेट संस्कृतीचा अभिमान जागतिक पातळीवर झळकवताना या शालेय स्पर्धांमधून क्रिकेट जगताला अनेक कोहिनूर दिले आहेत.

या वर्षी हॅरिस शील्डमध्ये तब्बल २०० शाळांच्या संघांनी भाग घेतला असून शालेय क्रिकेटच्या इतिहासात हा एक विश्वविक्रमच आहे. तर गाईल्स शील्डलाही १९७ उत्साही शाळांनी सहभाग दिला असून, मुंबईच्या गल्ल्यागल्ल्यांतील क्रिकेटच्या मुळाशी असलेल्या जोशाला आणखी बळ मिळाले आहे. स्पर्धेच्या या यशामागे क्रिकेट सचिव नदीम मेमन यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या पुढाकारामुळे शालेय क्रिकेटला आज प्रतिष्ठेचे मैदान आणि सुविधा लाभल्या आहेत. यंदाही या स्पर्धांचे सामने वानखेडे, बॉम्बे जिमखाना, पारशी, हिंदू, इस्लाम आणि पोलीस जिमखाना तसेच सर्व प्रमुख मुंबईच्या मैदानांवर खेळविले जाणार आहेत. तसेच खेळाडूंना पुरस्कार देण्याची प्रथाही गेल्या वर्षापासून सुरू करण्यात आली आहे.

मुंबईतील हॅरिस शिल्ड स्पर्धेतून खेळाडूंनी भारतीय संघामध्ये प्रवेश केला आहे. क्रिकेटचा दिग्गज सचिन तेंडुलकर येथून उदयास आला आणि त्याने भारतीय संघामध्ये स्थान मिळवले. या स्पर्धेत प्रभावी कामगिरी केल्यानंतर विनोद कांबळी, सरफराज खान आणि पृथ्वी शॉ यांनीही भारतीय संघामध्ये स्थान मिळवले. आता या यादीत आणखी एक प्रतिभावान खेळाडू जोडला गेला आहे. हॅरिस शिल्ड स्पर्धेत जनरल एज्युकेशन अकादमीकडून खेळताना आयुष शिंदेने नाबाद ४१९ धावा केल्या. आयुषने मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा विक्रमही मोडला. सचिन आणि विनोद कांबळी यांनी या स्पर्धेत मिळून ६६४ धावांची विक्रमी भागीदारी केली, ज्यामध्ये सचिनने नाबाद ३२६ धावा केल्या होत्या.

गुणवंत हो, यशवंत हो
कु.प्रज्ञेश अक्षय पवार
दिनांक २५-१०-२०२३
पत्ता - वाल्हे मुकदमवाडी, तालुका पुरंदर, जिल्हा-पुणे
यांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा


## निवडक

### बुद्धिबळ स्पर्धेमध्ये वसंतचे यश

**सावंतवाडी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व क्रीडा परिषद सिंधुदुर्गद्वारा ओरोस क्रीडा संकुल येथे झालेल्या शालेय जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत १७ वर्षांखालील विद्यार्थी गटात सेंट्रल इंग्लिश स्कूलच्या वसंत गवस याने तिसरा क्रमांक मिळवून विभागस्तरावर धडक मारली. त्याला प्रशालेच्या क्रीडा शिक्षिका मारिया आल्मेडा तसेच त्याच्या पालकांनीही मार्गदर्शन केले. सावंतवाडी मर्कझी जमात, बॉम्बे संस्थेचे पदाधिकारी, प्रशालेच्या मुख्याध्यापिका निर्मला हेशागोळ, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक-शिक्षक संघ कार्यकारिणी समितीचे पदाधिकारी यांनी वसंत याचे अभिनंदन केले व सातारा येथे होणाऱ्या विभागस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



### राष्ट्रीय स्पर्धेसाठी प्रज्योतीची निवड

**कणकवली :** माध्यमिक विद्या मंदिर कनेडी तथा कनिष्ठ महाविद्यालायाच्या विद्यार्थीनीने यावर्षी राज्यस्तरीय वैयक्तिक क्रीडा प्रकारात राज्यात आपला दबदबा कायम ठेवत नावलौकिक मिळवला आहे. प्रशालेतील १२ वी विज्ञान शाखेतील प्रज्योती जाधव हिने छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या शालेय राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले असून तिची जम्मू काश्मीर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि जिल्हा क्रीडा परिषद, छत्रपती संभाजीनगरतर्फे झालेल्या राज्यस्तरीय शालेय तायक्कांदो क्रीडा स्पर्धा झाली. यास्पर्धेत ज्युनियर कॉलेज कनेडी प्रशालेने यावर्षी राज्यस्तरीय वैयक्तिक क्रीडा प्रकारात राज्यात आपला दबदबा कायम ठेवत नावलौकिक मिळवला आहे. प्रज्योतीने राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेत सुवर्णपदक पटकावेल. जम्मू काश्मीर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे. याबद्दल कनेडी गट शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सतीश सावंत, संस्था पदाधिकारी, शालेय समिती चेअरमन, शालेय समिती पदाधिकारी तसेच मुख्याध्यापक यांनी तिचे अभिनंदन केले.

### पाक फलंदाजांचे लोटांगण



**नवी दिल्ली :** पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात रावळपिंडीच्या मैदानावर मालिकेतील दुसरी कसोटी लढत सुरू आहे. प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानचा संपूर्ण संघ ३३३ धावा काढून सर्वबाद झाला. यजमान संघ एकवेळ मोठ्या धावसंख्येच्या दिशेने वाटचाल करत होता, परंतु केशव महाराजच्या फिरकी गोलंदाजीने सामन्याचे चित्र पालटले. महाराजचे जाळे केशव महाराजने एकट्याने पाकिस्तानच्या सात फलंदाजांना तंबूचा रस्ता दाखवला. यासह त्याने पाकिस्तानच्या भूमीवर अशी कामगिरी केली ज्यामुळे त्याचे नाव इतिहासाच्या पानांवर सुवर्ण अक्षरांनी कोरले गेले आहे. महाराजने त्याच्या ४२.४ षटकांच्या स्पेलमध्ये १०२ धावा देत एकूण ७ बळी मिळवले. यासह त्याने पाकिस्तानच्या भूमीवर द. आफ्रिकेकडून सर्वोत्तम गोलंदाजी करण्याचा विक्रम आपल्या नावावर नोंदवला. महाराजच्या फिरकीपुढे यजमान संघाच्या फलंदाजांनी लोटांगण घातले.

### गो. जो. महाविद्यालय विजयी

**रत्नागिरी :** गोगटे-जोगळेकर महाविद्यालयाच्या महिला व्हॉलीबॉल संघाने मुंबई विद्यापीठ अंतर्गत झालेल्या कोंकण विभागाच्या महिला व्हॉलीबॉल स्पर्धेत सुवर्णपदक आणि सांघिक विजेतेपद पटकावले आहे.विभागीय स्पर्धा १६ ते १८ ऑक्टोबर २०२५ दरम्यान जीआयटी घरडा इंजिनिअरिंग महाविद्यालय, लवेल यांच्या सहकार्याने झाली. या उल्लेखनीय यशाबद्दल सोसायटीच्या शिल्पा पटवर्धन, सतीश शेवडे, डॉ. चंद्रशेखर केळकर, संस्थेचे सर्व सदस्य तसेच प्राचार्य डॉ. मकरंद साखळकर, उपप्राचार्य डॉ. विवेक भिडे, सर्व प्राध्यापकांनी संघाचे अभिनंदन केले आहे. या विजयी संघात मधुरा राऊत, सानिका लिंगायत, प्रसिद्धी सोनावणे, श्वेता खोडे, कृणाली सावंत, श्रेया सारंग, प्रियंका भोंगले, तनिष्का शिरधनकर, स्वरा शिंदे, श्रावणी शिंदे, शृजेश्वरी आवळकर, स्नेहा कदम, समीक्षा धनवे, श्रावणी शेलार यांचा समावेश होता.



### निकम विद्यालयाचे वर्चस्व

**सावर्डे :** जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत सावर्डे येथील गोविंदराव निकम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या खेळाडूंनी ११ खेळ प्रकारांमध्ये यश मिळवले असून विभागस्तरावर रत्नागिरी जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. क्रीडा व युवक सेवा संचालनालय आणि रत्नागिरी जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने डेरवण येथील एसव्हीजेसीटी क्रीडा संकुल झालेल्या जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत सावर्डे येथील गोविंदराव निकम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने भरारी घेतली. यामध्ये इच्छा राजभर हिने १४ वर्षे वयोगटात ४०० मीटर आणि ६०० मीटर धावण्यात प्रथम क्रमांक पटकावला, तर ४ बाय १०० मीटर रिले मुली संघाने तृतीय क्रमांक मिळवला. १९ वर्षे वयोगटात अर्ष अडरेकर गोळाफेक द्वितीय, अजिंक्य भायजे थाळीफेक प्रथम, सलोनी नाचणकर ४०० मीटर द्वितीय, सलोनी घाणेकर २०० मीटर द्वितीय, तसेच ४ बाय १०० मीटर मुली रिले संघाने तृतीय क्रमांक मिळवला. १७ वर्षे वयोगटात वेदिका बामणे उंच उडी प्रथम, पृथ्वी राजभर ८०० मीटर आणि १५०० मीटर प्रथम, तर हुमेरा सय्यद ८०० मीटर आणि १५०० मीटर प्रथम क्रमांकावर चमकल्या. तसेच ४ बाय ४०० मीटर मुली रिले संघाने द्वितीय क्रमांक पटकावला. सावर्डे विद्यालयाने या स्पर्धेत उल्लेखनीय वर्चस्व प्रस्थापित करून प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. खेळाडूंना प्रशिक्षण आणि मार्गदर्शन दादासाहेब पांढरे, रोहित गमरे, अमृत कडगावे आणि प्रशांत सकपाळ यांनी दिले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२१९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)